Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# महासागर
e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com
* वर्ष ५४ * अंक २३४ * * नागपूर *
रविवार, दिनांक १ डिसेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## पदयात्रेत केजरीवाल यांच्यावर द्रव फेकले

**■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :**
दिल्लीतील ग्रेटर कैलास भागात शनिवारी माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर एका व्यक्तीने द्रव फेकले. काही मीडिया रिपोर्ट्समध्ये त्याचे वर्णन शाई असे केले जात आहे तर काहींमध्ये त्याचे वर्णन पाणी असे केले आहे.
मात्र, समर्थकांनी आरोपींना जागीच बेदम मारहाण केली. सुरक्षा कर्मचारी त्याची चौकशी करत आहेत. यापूर्वी छतरपूर-नांगलोई येथेही केजरीवाल यांच्यासोबत अशा घटना घडल्या होत्या. दिल्लीचे मंत्री सौरभ भारद्वाज म्हणाले की, भाजपचे नेते सर्व राज्यांमध्ये आमच्या रॅली काढतात, त्यांच्यावर कधीही हल्ला होत नाही.

# फडणवीसच फायनल !

### नव्या सरकारचा ५ तारखेला शपथविधी ▪ पीएम मोदी उपस्थित राहणार ▪ आझाद मैदानावर होणार सोहळा

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**
राज्यातील महायुती सरकारच्या शपथविधीला अखेर मुहूर्त मिळाला आहे. नव्या सरकारचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वा. मुंबईतील आझाद मैदानावर होणार आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका ट्विटद्वारे ही माहिती दिली. पण त्यांनी मुख्यमंत्री कोण होणार? हे स्पष्ट केले नाही. त्यामुळे राज्यशकट कोण हाकणार? याचा सस्पेन्स अद्याप कायम आहे.
तत्पूर्वी, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचीच वर्णी लागणार असल्याची माहिती भाजपचे एका ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्र्यांनी दिली होती. देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी ५ डिसेंबर रोजी आझाद मैदानावर होणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. या संदर्भात सर्व तयारी ही पूर्ण झाल्याचेही ते म्हणाले होते.



### भाजपचाच मुख्यमंत्री दोन पक्षांचे दोन उपमुख्यमंत्री

राज्यात भाजपचा मुख्यमंत्री होणार असल्याचे आमच्या बैठकीत निश्चित झाले आहे. तसेच उर्वरित दोन पक्षाचे दोन उपमुख्यमंत्री असतील, हे देखील निश्चित झाले असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.
राज्यात सरकार स्थापन होईल, त्याचवेळी राज्य मंत्री पदांच्या नावाची देखील घोषणा केली जाईल, या माध्यमातून राज्य सरकार स्थापनेची सर्व चर्चा पूर्ण झाली असल्याचे संकेत अजित पवार यांनी दिले आहेत. मात्र भाजपचा मुख्यमंत्री कोण असेल याचा निर्णय हा भारतीय जनता पक्ष घेणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

## अमित शहा साधणार राज्यातील नेत्यांशी संवाद

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**
विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. त्यानंतर राज्यात तत्काळ सरकार स्थापन होईल असा दावा केला जात होता. पण आता काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कथित नाराजीमुळे अद्याप सरकार स्थापन करता आले नाही. या पार्श्वभूमीवर भाजपच्या गोटातील हालचाली वाढल्या असून, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा लवकरच राज्यातील भाजप नेत्यांशी संवाद साधणार आहेत.
भाजपला सर्वाधिक १३२ जागा मिळाल्या. यामुळे साहजिकच शिंदे यांच्या ताब्यातील मुख्यमंत्रीपद भाजपच्या दिशेने गेले. आता भाजपने या पदावर देवेंद्र फडणवीस यांची निवड केल्याची माहिती आहे. या घटनाक्रमामुळे एकनाथ शिंदे नाराज झाल्याची चर्चा आहे. त्यांच्या नाराजीमुळेच राज्यात अद्याप सरकार स्थापन झाले नसल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर भाजपच्या गोटातील हालचालींत मोठी वाढ झाली आहे.
सूत्रांच्या माहितीनुसार, महायुती सरकार स्थापन करण्याचा तिढा अद्याप सुटला नसल्यामुळे भाजपच्या गोटात अस्वस्थता वाढली आहे. यामुळे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा लवकरच राज्यातील नेत्यांशी संवाद साधणार असल्याची माहिती आहे.
दुसरीकडे, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही आपल्या पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची ऑनलाईन बैठक घेतली. भाजप आमदारांची येत्या २ किंवा ३ डिसेंबर रोजी गटनेता निवडण्यासाठी बैठक होणार असल्याचीही माहिती आहे.

## थोडक्यात..

### बस दरीत कोसळली मुलासह चौघांचा मृत्यू



**■ खरगोन :** मध्य प्रदेशच्या खरगोन जिल्ह्यात शनिवारी एका प्रवासी बसचे नियंत्रण सुटले आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या दरीत कोसळली. या अपघातात तीन महिला आणि एका बालकाचा जागीच मृत्यू झाला. तर २१ प्रवासी जखमी झाले आहेत. बरवानी जिल्ह्यातील जिरतपुरा गेटवर हा अपघात झाला. पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह व जखमींना जिल्हा रुग्णालयात पाठवले.

### कॅन्ट स्टेशनला आग

**■ वाराणसी :** वाराणसीच्या कँट रेल्वे स्थानकाच्या पार्किंगमध्ये रात्री उशिरा भीषण आग लागली. २०० वाहने जळून खाक झाली. बाईकच्या टाक्या ९० मिनिटे फुटत होत्या. स्फोटाच्या आवाजाने रेल्वे स्थानकात चेंगराचेंगरी झाली.

### सुरतमध्ये तीन मुलींचा संशयास्पद मृत्यू

**■ सुरत :** सुरतच्या सचिन पाली गावात मजूर कुटुंबातील तीन मुलींचा संशयास्पद मृत्यू झाला. आईस्क्रीम खाल्ल्यानंतर या तीन मुलींची प्रकृती खालावली. तिघींनाही जोरदार उलट्या होऊ लागल्या. कुटुंबीयांनी त्यांना रुग्णालयात नेले, मात्र तिघींचाही मृत्यू झाला.

## ठाकरे गटाचा स्वबळाचा नारा

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा पराभव झाला. महाविकास आघाडी अजूनही सावरलेली नाही. एकीकडे या पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडले जात आहे. दुसरीकडे स्थानिक पातळीवरील मतभेद समोर येत आहे.
आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार असल्याचा निर्णय ठाकरे गटाने घेतल्याची माहिती हाती आली आहे अनेक मतदारसंघात ठाकरे गटाच्या उमेदवाराविरोधात कुरघोडी झाल्याचा या गटाचा आरोप असल्याने स्वबळाचा निर्णय ठाकरे गटाने घेतल्याचे समजते.

## शिंदे मोठा निर्णय घेणार?

### संजय शिरसाट यांचा इशारा

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
महाराष्ट्र निवडणुकीचा निकाल येऊन आठवडा उलटला, तरी नव्या सरकारबाबतचा मुद्दा अजूनही अडकलेलाच आहे. शुक्रवारी मुंबईत होणारी महायुतीची महत्त्वाची बैठक पुढे ढकलून काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अचानक साताऱ्याला गेले.
यानंतर ते नाराज असल्याची चर्चा सुरू झाली. मात्र, पक्षाने सर्व चर्चा फेटाळून लावल्या. दरम्यान, शिवसेना आमदार संजय शिरसाट म्हणाले की, शिंदे यांना कोणताही मोठा निर्णय घ्यायचा असेल तेव्हा ते त्यांच्या मूळ गावी जातात. उद्या संध्याकाळपर्यंत ते मोठा निर्णय घेतील. शिंदे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारतील असे मला वाटत नाही, असे शिरसाट यांनी यापूर्वी म्हटले होते.
त्याचवेळी महायुतीची बैठक १ डिसेंबरला होण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले. त्यासाठी भाजपचे २ निरीक्षक मुंबईत येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक होऊन मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा केली जाणार आहे.
मुख्यमंत्रिपद सोडायचे झाल्यास शिवसेनेने गृह आणि अर्थ मंत्रालयावर दावा केल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. मात्र, भाजपला गृह आणि अजित पवार यांना अर्थमंत्रालय सोडणे पसंत नाही. एकनाथ सरकारमध्ये गृहखाते उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे होते, असा शिवसेनेचा युक्तिवाद आहे. त्यानुसार शिंदे उपमुख्यमंत्री झाले तर त्यांना गृहमंत्रालय मिळावे.
सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपने शिंदे यांना उपमुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली आहे. फडणवीस मुख्यमंत्री राहिलेले असतानाही शिंदे मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री होते, असा पक्षाचा तर्क आहे. त्याचवेळी शिंदे व त्यांचे निकटवर्तीय याला पदावनती मानत आहेत. शिरसाठ यांच्या वक्तव्यानंतर पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे.

## अदानींसाठी वेगळा कायदा

### राहुल गांधींचा आरोप

**■ वृत्तसंस्था, वायनाड, दि. ३० :**
खासदार झाल्यानंतर प्रियांका गांधी आज पहिल्यांदाच वायनाडमध्ये पोहोचल्या. त्यांच्यासोबत राहुल गांधीही होते. येथील सभेला संबोधित करताना राहुल यांनी पुन्हा एकदा अदानींचा मुद्दा उपस्थित केला.



राहुल म्हणाले, संविधान सांगते की सर्व लोकांना समान वागणूक दिली पाहिजे. पण, अदानी यांना वेगळी वागणूक दिली जात असून त्यांच्यासाठी कायदाही वेगळाच आहे.

## एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडली

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**



एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्याची तयारी दर्शवली असली तरी ते गृह मंत्रालयावर ठाम आहेत. दिल्लीत गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन शिंदे मुंबईत परतले आणि सर्व कार्यक्रम रद्द करून त्यांच्या गावी रवाना झाले. आता त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती आहे. मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करण्यासाठी साताऱ्याला गेले आहे.
वृत्तानुसार, काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ताप आला आहे. यामुळे ते आज दिवसभर घराबाहेर पडले नाहीत. डॉक्टरांनी त्यांना घरातच सलाईन लावली आहे. शिंदे यांची प्रकृती बिघडल्यामुळे महायुती सरकारचा प्रस्तावित शपथविधी सोहळा आणखी लांबतो की काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## पवारांकडून पुन्हा निवडणुकीवर प्रश्नचिन्ह

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**



देशामध्ये ज्या निवडणुका झाल्या त्यासंबंधीची अस्वस्थता ती सर्व भागात दिसून येत आहे. या निवडणुकीच्या निकालाबद्दल जनमत हे बाबा आढाव यांनी घेतलेल्या भूमिकेतून व्यक्त होत असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे.
ज्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकीमध्ये सत्तेचा गैरवापर आणि पैशाचा महापूर दिसून आला. तो यापूर्वी कधीही बघितला नव्हता. स्थानिक पातळीवरील निवडणूक असतात, त्यामध्ये अशा तक्रारी कुठे न कुठे ऐकायला मिळतात. मात्र संपूर्ण राज्याची आणि देशाची निवडणूक असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात पैसा आणि सत्तेचा गैरवापर हा करून निवडणुकीची सर्व यंत्रणा हातात घ्यायची, असे चित्र यापूर्वी कधीही दिसले नव्हते, असेच काही या निवडणुकीत महाराष्ट्रात घडले आहे आणि त्याचा परिणाम होऊन लोकांची अस्वस्थता वाढली असल्याचे पवार यांनी म्हटले आहे.
मला जे लोक भेटले त्या सर्वांना जयप्रकाश नारायण यांची आठवण आली. बाबा आढाव यांनी पुढाकार घेतला आहे. राष्ट्रीय कर्तव्य आणि देशाची आवश्यकता असल्यामुळे त्यांनी ही भूमिका घेतली. या विरोधात जनतेने उठाव करणे आवश्यक असल्याचे पवार यांनी म्हटले आहे.

## चीनमध्ये सापडला मोठा सोन्याचा साठा

**■ वृत्तसंस्था, बिजींग, दि. ३० :**
चीनच्या हुनान प्रांतात जगातील सर्वात मोठा सोन्याचा साठा सापडला आहे. सिन्हुआ न्यूजनुसार, हुनानच्या पिंग्झियांग काउंटीमध्ये 1000 मेट्रिक टन उच्च दर्जाचे सोने असू शकते. त्याची किंमत 83 अब्ज डॉलर्स (7 लाख कोटी रुपये) पेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे.
तज्ज्ञ चेन रुलिन म्हणतात की, अनेक छिद्रित खडकांच्या गाभ्यामध्ये सोने स्पष्टपणे दिसत आहे. कोर नमुने दर्शवतात की 1 मेट्रिक टन धातूमध्ये 138 ग्रॅम (सुमारे 5 औंस) सोने असू शकते.
हा जगातील आतापर्यंतचा सर्वात मोठा सोन्याचा साठा मानला जातो. दक्षिण आफ्रिकेच्या दक्षिण खोल खाणीत हे 900 मेट्रिक टनापेक्षा जास्त सोने आहे.
अहवालानुसार, पिंगजियांग काउंटीमध्ये 40 हून अधिक सोन्याच्या खाणी सापडल्या आहेत. येथे 300 मेट्रिक टन सोने असल्याचा अंदाज भूवैज्ञानिकांनी पूर्वी व्यक्त केला होता. तथापि, नंतर 3ऊ मॉडेलिंग वापरून असे आढळून आले की सोन्याच्या विवरांची खोली 3000 मीटरपर्यंत आहे. यामध्ये अंदाजे 700 मेट्रिक टन जास्त सोने आहे.
चिनी अधिकारी येथे अधिक संशोधन करत आहेत. याचा शोध लावणाऱ्या हुनान गोल्ड कॉर्पोरेशनचे म्हणणे आहे की, प्रचंड खोलीमुळे खाणीत किती सोने आहे हे कळू शकले नाही. यामुळे अजून किंमत सांगता येणार नाही.

## १२ प्रवाशांवर उपचार सुरू

**■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. ३० :**
भंडारा येथून गोंदियाकडे जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या शिवशाही बस अपघातात गंभीर जखमी झालेल्या १२ प्रवाशांवर येथील केटीएस शासकीय मेडिकल कॉलेज रूग्णालयात उपचार सुरू आहेत . त्यातील १ जखमी आयसीयुमध्ये दाखल असल्याचे समजते.
भंडारा येथून गोंदियाकडे निघालेल्या शिवशाही बस शुक्रवारी दुपारी डव्वा गावानजिक उलटली होती . या अपघातात ११ प्रवाशांचा दुर्देवी मृत्यू झाला तर २९ प्रवासी जखमी झाले होते. किरकोळ जखमींना उपचार करून सुटी देण्यात आली. तथापि, गंभीर जखमी झालेल्या १२ प्रवाशांना गोंदियाच्या शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले असून, उपचार सुरू आहे . त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात येते. बसचालकाला शुक्रवारीच अटक करण्यात आली असून, तपास सुरू आहे.

## राक्षसी बहुमत मिळूनही महाराष्ट्रात आनंद का नाही?

### उद्धव ठाकरेंची शिंदेंवर टीका

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका केली.



राक्षसी बहुमत मिळूनही महाराष्ट्रात आनंद का साजरा होत नाही? बहुमत मिळूनही या लोकांवर शपथ घेण्यासाठी राजभवनात जाण्याऐवजी शेतात जाऊन पूजाअर्चा करण्याची वेळ आली आहे, असे ते म्हणालेत.
ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांनी गत ३ दिवसांपासून पुण्यात विधानसभा निवडणुकीतील कथित गैरव्यवहाराप्रकरणी उपोषण सुरू केले होते. हे उपोषण त्यांनी शनिवारी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत सोडले. यावेळी त्यांनी उपोषण सुटले असले तरी आपले आंदोलन सुरूच राहणार असल्याचे ठणकावून सांगितले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी भाजप विशेषतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका केली.
वणवा पेटवण्यास एक ठिणगी पुरेशी असते. बाबा आढाव यांचे हे आंदोलन ती ठिणगी आहे, असेही ठाकरे यावेळी म्हणाले.



# फडणवीसांना मुख्यमंत्री करणे भाजपला भारी पडणार?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३०:

महायुतीला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठं बहुमत मिळाले. पण मुख्यमंत्री पदावरून घोडं अडलं आहे. महायुतीमध्ये भाजपाच्या 132 जागा आल्या आहेत. त्यामागे देवेंद्र फडणवीस यांची रणनीती असल्याचा दावा आहे.

दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या लोक कल्याणकारी धोरणाना सुद्धा श्रेय दिल्या जाते. आता अडचण ही आहे की, राज्यात एकाच वेळी दोन मुख्यमंत्री करता येत नाही. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला पाठिंबा दिला आहे. तर शिंदे सेना बिहार मॉडेलची चर्चा करताना दिसत आहे.

शिवसेनेच्या खासदार आणि आमदारांनी एकनाथ शिंदे यांचे नाव लावून धरले आहे. तर देवेंद्र फडणवीस हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपा श्रेष्ठींचे पहिली पसंत आहे. त्यामुळे त्यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ पडण्याची दाट शक्यता आहे. पण तसं करताना या तीन मुद्दांना भाजपाला दुर्लक्ष करून चालणार नाही.

**ओबीसी मतांची बिदागी आणि ब्राह्मण मुख्यमंत्री**

भारतीय जनता पक्ष गेल्या दशकापासून सोशल इंजिनिअरिंगला अधिक महत्त्व देत आला आहे. त्यामुळे मुख्य पदावर ओबीसी चेहरा असणे सर्वात चांगले, अशी एक धारणा आहे. महाराष्ट्रात राष्ट्रपतीपासून ते राज्यपालांपर्यंत अनुसूचित जाती-जमातींना प्राधान्य दिले आहे.

सध्या जातनिहाय जनगणनेविषयी राहुल गांधी आक्रमक दिसत असताना



ओबीसी मतांवर ब्राह्मण मुख्यमंत्री पदावरून विरोधक हल्लाबोल करू शकतात. विरोधक अगोदरच भाजपाला सवर्ण आणि श्रीमंतांचा पक्ष म्हणून निशाणा करत आहे. ज्या समाजाची जितकी लोकसंख्या, तितका त्याचा अधिकार अशी चर्चा सुरू आहे. आता बिहार आणि दिल्लीतील निवडणुका तोंडावर असताना महाराष्ट्राचा मुख्यमंत्री पदावर फडणवीस यांचे नाव पुढे करताना भाजपाला हा मुद्दा अडचणीचा ठरण्याची चिन्हं आहेत.

**एकनाथ शिंदे यांना नाराज करून कसं चालेल?**

महायुतीचं सरकार येण्यासाठी लावेलीचे शिवसेनेतील बंड महत्त्वाचे ठरले होते. सध्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने 57 जागांवर यश मिळवले आहे. तर अजित पवारांकडे 41 आमदारांचं संख्याबळ आहे. जर बाटाघाटी सामोपचाराने झाल्या नाही तरी भाजपाकडे अजितदादांच्या भरवशावर सत्ता स्थापनेला अडचण नाही. पण राजकीय तज्ज्ञांच्या मते हा धोका भाजपा स्वीकारणार नाही.

एकनाथ शिंदे यांना डावलून अथवा त्यांची नाराजी ओढवून सत्ता वाटेकरी होण्याचा मार्ग भाजपाला अडचणीचा ठरेल. दुसरीकडे बाटाघाटी फिसकटल्या तर शिंदे यांचे 57, अजितदादांचे 41 आणि महाविकास आघाडीचे 46 असे मिळून सत्ता स्थापन केल्यास हा आकडा 144 पर्यंत येतो. 288 आमदारांच्या विधानसभेत बहुमतासाठी या नवीन आघाडीला सुद्धा एक जागा कमी पडू शकते.

**मराठा समाजाची नाराजी**

लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाची नाराजी एकदम समोर आली. मराठा पट्ट्यात भाजपाला मोठा फटका बसला. मराठा समाजाची नाराजी देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात दिसून आली. मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीस यांच्याविरोधात उघड मोर्चा उघडला. मराठा आणि ओबीसी असा सामना सर्वांनीच पाहिला आहे. फडणवीस यांना मुख्यमंत्री पदावर बसवल्यास हा धोका समोर येऊ शकतो. तथापि, सद्याची स्थिती पाहता फडणवीसच राज्याचे मुख्यमंत्री होतील, असे दिसते.

### मॉडेल ते तरूण मुख्यमंत्री संघांचे विश्वासू आणि प्रशासनावर पकड

नव्या मंत्रिमंडळाच्या शपथविधीकडे सर्वांच्या नजरा आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राज्याची धुरा गेली तर ते दुसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री म्हणून कारभार सांभाळतील.

नागपूर महापालिकेतून देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय करिअरला सुरुवात झाली. नागपूर महापालिकेत नगरसेवक म्हणून त्यांनी राजकीय जीवनात पाय रोवले. अवघ्या २२ व्या वर्षी ते नगरसेवक झाले होते. मग सर्वात तरूण महापौर असल्याची नोंद फडणवीसांच्या नावावर आहे.

नंतर ते नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे ते आमदार झाले. भाजपचं प्रदेशाध्यक्षपद देखील देवेंद्र फडणवीस यांनी सांभाळलं आहे. २०१४ ला ४४ व्या वर्षी ते पहिल्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. कमी वयात मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे शरद पवारांनंतर ते दुसरे नेते ठरले. २०१९ ला महाविकास सरकारच्या काळात त्यांनी





विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी देखील सांभाळली आहे.

२०२२ पासून त्यांनी उपमुख्यमंत्रिपद आणि गृहमंत्री म्हणून काम केलं आहे. त्यांची प्रशासनावर पकड आहे. भाजपच्या राजकीय वाटचालीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची महत्वाची भूमिका आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विश्वासू नेत्यांच्या यादीत देवेंद्र फडणवीस यांचा नंबर वरचा आहे. शिवाय प्रशासनाचा अनुभव असल्याने मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत देवेंद्र फडणवीस वरचढ ठरतात.

**देवेंद्र फडणवीस यांनी केलं होतं मॉडेलिंग**

फडणवीस यांची पर्सनॅलिटी पाहून त्यांचे बालपणीचे मुख्यमंत्री विवेक रानडे यांनी मॉडेलिंग करण्याचा सल्ला दिला. फडणवीसही तयार झाले. 2006 ला त्यांनी नागपुरातील एका कपड्याच्या दुकानासाठी फोटोशूट केलं होतं.

# महाविकास आघाडीकडे दलित मतदारांची पाठ

## 'एससी' राखीवच्या २० सीटवर महायुती



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३०:

विधानसभा निवडणुकीत राज्यातल्या 'एससी'साठी राखीव असलेल्या 29 मतदारसंघात मतदारांनी महाविकास आघाडीकडे पाठ फिरवत भाजपला मत दिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे महायुतीच्या पारड्यात 20 जागा पडल्या. भाजपने 10, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने 5, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 5 जिंकल्या.

'एससी'साठी राखीव मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीने 9 जागा जिंकल्या. त्यात काँग्रेसला 4, ठाकरेंच्या शिवसेनेला 2, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 2 आणि 1 जागा जनसुराज्य पक्षाने पटकावली.

लोकसभा निवडणुकीत संविधान धोक्यात आल्याचा प्रचार राहुल गांधींनी केला. त्यामुळे विधानसभेच्या 29 पैकी 21 मतदारसंघांत महाविकास आघाडीने मताधिक्क्यात आघाडी घेतली. राज्यातल्या पाचांच्या पाची राखीव जागी महाविकास आघाडीने बाजी मारली. विधानसभा निवडणुकीतही संविधान आणि अदानी या दोन मुद्यांभोवती महाविकास आघाडीचा प्रचार फिरत राहिलेला दिसला. मात्र, विधानसभेत राखीव मतदारसंघातले मताधिक्क्य महाविकास आघाडीला टिकवता आले नाही.

**'अनुसुचित'बहुल जागीही विजयी**

भाजपने अनुसूचित समाजाची लोकसंख्या जास्त असलेल्या मतदारसंघातही आघाडी घेतल्याचे दिसते. राज्यात असे 67 मतदारसंघ आहेत. तिथे अनुसूचित समाजाची जवळपास 15 टक्केपेक्षा जास्त लोकसंख्या आहे. या मतदारसंघात भाजपने 42 जागा पटकावल्या. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 8, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने 6 जागांवर बाजी मारली. तर या ठिकाणी महाविकास आघाडीला केवळ 8 जागांवर समाधान मानावे लागले.

**'वंचित'कडे मतदारांची पाठ**

वारंवार भूमिका बदलणाऱ्या वंचित बहुजन विकास आघाडीकडे विधानसभा निवडणुकीत मतदारांनी पाठ फिरवल्याचे दिसले. यंदा प्रकाश आंबेडकरांनी तब्बल 200 जागा लढवल्या. मात्र, एकही उमेदवार विजयी झाला नाही. त्यांना 14 लाख मते पडली. विशेष म्हणजे 2019 च्या तुलनेत वंचितचे मताधिक्क्य तब्बल 11 लाखांनी कमी झाल्याचे दिसले. तेव्हा त्यांना 25 लाखांपेक्षा जास्त मते मिळाली होती. यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीतही त्यांना 15 लाख मते मिळाली. मात्र, त्यातही घसरण झाल्याचे दिसले. दुसरीकडे रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे हे दोघेही या निवडणुकीत महायुतीच्या बाजूने होते. मात्र, जागावाटपात त्यांच्या पक्षालाही एकही जागा मिळाली नाही. त्यामुळे त्यांचे उमेदवार या निवडणुकीत नव्हतेच.

**काँग्रेसला सडेतोड उत्तर**

लोकसभा निवडणुकीत भाजपकडून संविधानावर घाला घालण्यात येत असल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. हातात संविधानाची प्रत घेऊन प्रचार केला. असाच प्रचार महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत केला. मात्र, भाजपने हे फेक नॅरेटिव्ह असल्याचा प्रचार केला. त्याला यश आल्याचे दिसले. राहुल गांधींनी राज्यात फक्त 4 प्रचारसभा घेतल्या. तर नरेंद्र मोदींनी प्रचारफेरीसह 11 प्रचारसभा घेतल्या. अमित शहांनीही महाराष्ट्रात प्रचार केला. त्याचा परिणाम झाल्याचे दिसले.

**दलित मतदारांना जवळ केले**

लोकसभेत जागा घटल्याने भाजपने विधानसभेसाठी ताकदी फुंकून पिले. दलित मतदारांना आपलेसे केले. त्यांच्यासाठी खास संपर्क अभियान राबवले. या मतदारसंघामध्ये जवळपास तीन हजारांवर बैठका घेतल्या. त्यातही हिंदू दलितांना जवळ केले. संविधान बदलाचा मुद्दा खोटा आहे, हे त्यांना पटवून दिले. महायुती सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. दलित महिला मतदारांवर या योजनेने जादू केली. याचा लाभही यावेळी झाला.

**मुस्लीमबहुल मतदारसंघातही जादू**

मुस्लीमबहुल मतदारसंघातही महायुतीने 21 जागा जिंकल्या. त्यात भाजपचा उमेदवार 14 जागांवर विजयी झाला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने 5, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला 2 जागा जिंकता आल्या.

मुस्लीमबहुल मतदारसंघात महाविकास आघाडीने 14 जागा जिंकल्यात. त्यात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने 6, काँग्रेसने 5, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 3 जागा जिंकल्यात. उर्वरित 2 ठिकाणी समाजवादी पक्ष, तर मुस्लीमबहुल मतदारसंघातली 1 जागा 'एमआयएम'ने जिंकली आहे.

# भाई जगतापांची जीभ घसरली निवडणूक आयोगाला म्हणाले कुत्रा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३०:

महाराष्ट्र निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेस पक्षाकडून निवडणूक आयोग आणि ईव्हीएमवर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहे. शुक्रवारी काँग्रेसचे आमदार भाई जगताप यांनी निवडणूक आयोगाबाबत वादग्रस्त वक्तव्य केले.

आयएएनएस या वृत्तसंस्थेशी बोलताना जगताप म्हणाले, निवडणूक आयोग हा कुत्रा आहे, जो पंतप्रधान मोदींच्या बंगल्याबाहेर बसलेला असतो. दुर्दैवाने, लोकशाही बळकट करण्यासाठी निर्माण केलेल्या सर्व यंत्रणांचा वापर देशभर घोटाळे करण्यासाठी केला जात आहे.

जगताप यांच्या वक्तव्यावर शनिवारी भाजप नेते किरीट सोमय्या म्हणाले की, हा घटनात्मक संस्थेचा अपमान आहे. हे खपवून घेतले जाणार नाही. मी जगताप यांच्याविरोधात निवडणूक आयोग आणि मुंबई पोलिसांकडे तक्रार केली आहे.

**माफी मागण्यास नकार**

जगताप यांनी आपल्या वादग्रस्त वक्तव्याबद्दल माफी मागण्यास नकार दिला आहे. जगताप म्हणाले की, निवडणूक आयोगाच्या चापलुसीमुळे देशातील लोकशाही बदनाम झाली आहे. कुत्र्याच्या कमेंटवर ते म्हणाले, मी अजिबात माफी मागणार नाही. जर ते पंतप्रधान आणि इतर मंत्र्यांच्या दबावाखाली काम करत असतील तर मी जे बोललो ते बरोबर आहे.

निवडणूक आयोग देशाची लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी आहे, कोणाची सेवा करण्यासाठी नाही. मी माझ्या शब्दावर ठाम आहे. जगताप पुढे म्हणाले की, काँग्रेसने ईव्हीएम तंत्रज्ञान आणले कारण ते फ्रान्स आणि अमेरिकेत वापरले जात होते, पण 2009 नंतर त्याच्या वापराबाबत शंका निर्माण होऊ लागल्या आहेत.

**भाजपची पोलिसात तक्रार**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणी प्रक्रियेत गंभीर निष्काळजीपणाचा आरोप काँग्रेसने शुक्रवारीच केला. पक्षाने निवडणूक आयोगाला पत्र लिहून वैयक्तिक सुनावणीची मागणी केली होती.

**काँग्रेसचे मुद्दे**

मनमानी पद्धतीने मतदार जोडले आणि काढले गेले. त्यामुळे जुलै 2024 ते नोव्हेंबर 2024 दरम्यान महाराष्ट्रात सुमारे 47 लाख नवीन मतदारांचा मतदार यादीत समावेश करण्यात आला. 50 विधानसभा मतदारसंघात सरासरी 50 हजार नवीन मतदारांची भर पडली, त्यापैकी सत्ताधारी आघाडी आणि मित्रपक्षांनी 47 जागा जिंकल्या.

21 नोव्हेंबर 2024 रोजी संध्याकाळी 5 वाजेपर्यंत, महाराष्ट्रातील मतदानाची टक्केवारी 58.22% होती, जी रात्री 11:30 पर्यंत 65.02% झाली. अंतिम अहवालात 66.05% मतदान झाले. ज्याची घोषणा मतमोजणी सुरू होण्याच्या काही तास आधी करण्यात आली. एका तासात म्हणजे संध्याकाळी 5 ते 6 या वेळेत सुमारे 76 लाख मतदान झाले.

मतदानाच्या आकड्यांमध्ये फेरफार केल्याच्या काँग्रेसच्या आरोपांना उत्तर देताना निवडणूक आयोगाने शनिवारी सांगितले की, मतदानाच्या आकडेवारीत कोणतीही अनियमितता नाही. निवडणूक आयोगाने काँग्रेसच्या शिष्टमंडळाला 3 डिसेंबरला भेटायला बोलावले आहे.

संध्याकाळी 5 वाजताचा मतदानाचा डाटा आणि अंतिम मतदानाच्या डाटामधील फरकाबाबत, निवडणूक आयोगाने सांगितले की, पीठासीन अधिकारी मतदानाचा डाटा अपडेट करण्यापूर्वी मतदानाच्या समाप्तीशी संबंधित इतर आवश्यक कार्यवाही पूर्ण करतात. त्यामुळे मतदानाचा अंतिम डाटा उशिरा अपडेट होतो.

# धरसोडीच्या भूमिकेमुळे वंचितचा व्होट शेअर घसरला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३०:

महाविकास आघाडीतील नेत्यांना धडकी भरवणाऱ्या वंचित बहुजन आघाडीच्या व्होट बँकेची ४ निवडणुकांमध्ये चांगलीच पडझड झाली आहे.

२०१९ च्या तुलनेत मताधिक्य निम्म्याने कमी झाले. या वेळी विरोधी पक्षाच्या १९ उमेदवारांची शिकार करण्यात वंचितला यश आले, तर वंचितमुळे महाविकास आघाडीचेही ४ उमेदवार विजयी झालेत. २०१९ च्या विधानसभेत २५ लाख मते होती. या वेळी १२ लाख घटून फक्त १३ लाखांपर्यंत आले आहेत. धीरज देशमुख, दिलीप सानंदा, वसंत पुरके आणि इम्तियाज जलील यांनाही ह्यवंचितह्णमुळेच पराभावाचे तोंड पाहावे लागले आहे.

१९८४ पासून म्हणजेच ४० वर्षांपासून प्रकाश आंबेडकर राजकारणात आहेत. ४० पैकी ३६ वर्षे त्यांच्या पक्षाचे नाव भारिप-बहुजन महासंघ होते. पण १ जानेवारी २०१८ रोजी कोरेगाव भीमाप्रकरणी उसळलेल्या दंगलीतील त्यांच्या भूमिकेमुळे अचानक त्यांचा जनाधार वाढला. त्यानंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगरात २ ऑक्टोबर २०१८ रोजी जबिंदा लॉन्सला सभा घेतली. तिथे एमआयएमचे सर्वेसर्वा असदुद्दीन ओवेसीसमवेत आघाडी केली. तेव्हापासून त्यांनी भारिपऐवजी २ लोकसभा आणि २ विधानसभेच्या निवडणुका वंचिततर्फे लढवल्या.

आधी एमआयएम, नंतर महाविकास आघाडीने त्यांना साद घातली. पण त्यांनी त्यांना दूर सारले. ह्यएकला चलो रेह्णच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीचे नुकसान तर झालेच, पण स्वतःचीही व्होटबँक घसरली.

# शिवसेना नेत्यांची स्पेशल डिमांड

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३०:

सोमवारी २ डिसेंबरला राज्यातील सत्तास्थापनेचा निर्णय घेतला जाणार आहे. पुढील दोन दिवस महाराष्ट्रात महायुतीच्या कोणत्याही बैठका होणार नाहीत. त्यामुळे राज्यातील जनतेला सत्तास्थापनेसाठी अजून वेट अँड वॉच करावं लागणार आहे. त्यातच आता शिवसेना नेत्यांकडून भाजपकडे अनोखी मागणी केली जात आहे.

महाराष्ट्रात गृहमंत्रीपद कोणाकडे असणार यावरून राजकारण सुरु आहे. फडणवीसांच्या नावावर मुख्यमंत्री म्हणून शिक्कामोर्तब करण्यात आल्याचे सांगण्यात येते तर एकनाथ शिंदे यांनी गृहमंत्रिपदासह तब्बल १२ मंत्रिपदाची मागणी केली आहे. पण महायुतीच्या केंद्रीय नेतृत्वाकडून एकनाथ शिंदे यांना गृहमंत्रिपद देण्यास नकार दिला.

त्या बदल्यात भाजपकडून एकनाथ शिंदे यांना थेट उपमुख्यमंत्रीपदासह केंद्रीय मंत्रिपदाची ऑफर देण्यात आली. या ऑफरवर शिवसेना नेत्यांनी एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री स्वीकारण्याची विनंती केली. पण आता यात मोठा ट्विस्ट आला आहे.

एकनाथ शिंदे यांनी गृहमंत्रिपद मिळणार की नाही यावर सध्या राजकारण सुरु आहे. तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गटातील एका नेत्याने याबद्दल मोठे वक्तव्य केले आहे.

गेल्यावेळी फडणवीस उपमुख्यमंत्री असताना त्यांच्याकडे गृहमंत्रीपद होतं. त्याप्रमाणे आता एकनाथ शिंदेंना जर उपमुख्यमंत्रीपद मिळणार असेल तर त्यासोबत गृहमंत्रीपदही असावं, असं आता आम्हाला वाटतंय. मग त्यात चुकीचं काय? असा सवाल शिंदे गटातील नेते भरत गोगावले यांनी केला आहे.

उपमुख्यमंत्रीपद स्वीकारायचं की नाही हा निर्णय एकनाथ शिंदे घेतील. ते जो काही निर्णय घेतील, त्या निर्णयाशी आम्ही सर्व बांधील आहोत. मग तो निर्णय काही का असेना, असेही भरत गोगावले म्हणाले. परिणामी, महायुतीत पेंच निर्माण झाला आहे.

# अटक केलेल्या सर्व आरोपींवर मकोका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३०:

एनसीपी नेते बाबा सिद्दीकी यांची 12 ऑक्टोबर रोजी मुंबईत भर रस्त्यावर गोळीबार करून हत्या करण्यात आली. या प्रकरणी आतापर्यंत 26 जणांना अटक करण्यात आली असून सर्व आरोपींवर मकोकाची लावण्यात आला आहे.

**सिद्दीकी हत्या प्रकरण**



दरम्यान बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील काही दिवसांपूर्वी मुंबई क्राइम ब्रँचने म्हटले होते की, पंजाबच्या फाजिल्का येथून अटक करण्यात आलेल्या आकाशदीप गिलने मास्टरमाइंड अनमोल बिश्नोई आणि इतर शूटर्सशी बोलण्यासाठी मजुराच्या मोबाइल हॉटस्पॉटचा वापर केला होता.

# शरद पवारांना मानणाऱ्या गावात भाजपला मताधिक्य

## मारकवाडी गावाची स्वखर्चाने बॅलेट पेपरवर फेर मतदानाची मागणी

■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. ३०:

सोलापूर जिल्ह्यातील मारकवाडी गावच्या ग्रामस्थांनी प्रशासनाकडे स्वखर्चाने गावात बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी केली आहे. या गावातील बहुतांश नागरिक हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विचारांना मानणारे होते. पण प्रत्यक्ष निवडणुकीत येथे भाजपला मताधिक्य मिळाले. यामुळे या गावकऱ्यांनी फेरमतदानाची मागणी केली आहे.



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले. तर विरोधी बाकावरील महाविकास आघाडीचा मानहाणीकारक पराभव झाला. या निकालावर अनेकजण आश्चर्य व्यक्त करत आहेत.

विरोधकांनी या प्रकरणी ईव्हीएमवर संशय व्यक्त करत मतदानाची वेळ संपल्यानंतर वाढलेल्या तब्बल 75 लाख मतदानावर संशय व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर मारकवाडीच्या ग्रामस्थांनी गावात बॅलेट पेपरवर फेरमतदान घेण्याची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी प्रशासनाला खर्च देण्याचीही तयारी दर्शवली आहे.

सोलापूरच्या माळशिरस तालुक्यातील मारकवाडी गावात एकूण 2300 मतदार आहेत. त्यापैकी 1905 मतदारांनी आपला मताधिकार बजावला.

त्यात भाजप उमेदवार राम सातपुते यांना मताधिक्य (1000) मिळाले. हे गाव राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार उत्तम जानकर यांना मानणारे आहे. त्यानंतरही तिथे सातपुते यांना मताधिक्य मिळाल्यामुळे गावातील प्रत्येक जण आश्चर्य व्यक्त करत आहे. यातूनच गावकऱ्यांनी बॅलेट पेपरवर फेरमतदान घेण्याची मागणी केली आहे.

**गावकरी देणार मतदानाचा संपूर्ण खर्च**

उल्लेखनीय बाब म्हणजे बॅलेट पेपरवर मतदान घेण्यासाठी येणारा संपूर्ण खर्च उचलण्याची तयारी गावकऱ्यांनी दर्शवली आहे. त्यांनी यासंबंधी माळशिरसच्या तहसीलदारांकडे रितसर निवेदन दिले आहे.

दुसरीकडे, सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील माकपचे उमेदवार नरसय्या आडम यांनी आपल्या मतदारसंघातील निवडणूक रद्द करण्याची मागणी केली आहे. त्यांनीही यंदाच्या निवडणूक प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचा आरोप करीत फेरमतदानाची मागणी केली आहे.

# त्या व्यक्तीने शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष संपवला..

## गुलाबराव पाटील यांची सडकून टीका

■ वृत्तसंस्था
जळगाव, दि. ३०:

मागच्या दोन अडीच वर्षांत राष्ट्रवादी आणि शिवसेना या दोन पक्षांमध्ये उभी फूट पडली आहे. हे पक्ष फोडण्यामागे मोठ्या नेत्याचा हात असल्याचं शिवसेनेचे वरिष्ठ नेते माजी मंत्री गुलाबराव पाटील यांनी म्हटलं आहे.



सर्वात पहिले तर संजय राऊतला अॅडमिट केले पाहिजे. या माणसाने शिवसेना संपवली.. शरद पवारांची राष्ट्रवादी संपवली आता उद्धव ठाकरेंना संपवलं. राहिला सुरुवात आता तो स्वतः संपणार आहे. त्यामुळे तो मेंटल झाला आहे पागल झाला आहे, त्याच्या हातात दगड द्या.. अशा शब्दात माजी मंत्री गुलाबराव पाटील यांनी संजय राऊत यांच्यावर खोचक टीका केली आहे.

एकनाथ शिंदे यांनी स्वतः सांगितला आहे की माझा कुठलाही अडचणीचा विषय नाही. हा विषय त्यांनी संपून टाकलेला आहे. वापुढे एकनाथ शिंदे साहेबांना सर्व अधिकार शिवसेना पक्षाचे वतीने देण्यात आले आहे. त्यामुळे वापुढे जेही निर्णय होतील.. ते सर्व एक छत्री.. एकनाथराव शिंदे साहेब घेतील.. असा निर्णय आमच्या पक्षाने घेतलाय, असं म्हणत गुलाबराव पाटील यांनी मुख्यमंत्रिपदावाबत विधान केलं आहे.

एकनाथ शिंदे हेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत, असं मत पाटलांनी मांडलं. सर्वसमावेशक काम एकनाथ शिंदे साहेबांनी केल्यामुळे.. सगळ्या घटकांची कामे केल्यामुळे सहाजिकच जनतेची भावना आहे की त्यांनी मुख्यमंत्री व्हावं.

मात्र या विषयात स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझा कुठलाही अडचणीचा विषय नाही या शब्दात हा विषय खोडून टाकला आहे. नरेंद्र मोदी, अमित शाह यांना अडचणीचा असं कुठल्याही पद्धतीचे वक्तव्य मी करणार नाही. ते जे निर्णय घेतील. ते मला मान्य राहणार आहे असे त्यांनी सांगितलं असल्याचं गुलाबराव पाटील म्हणाले.

गुलाबराव पाटील यांच्या नावाने जळगावमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून बॅनर लावले आहेत. त्यावर शेवटी कार्यकर्ते उत्साही असतात.. शेवटी आमचा नेता एकच आहे आणि त्यांचं नाव एकनाथराव शिंदे आहे त्या आदेश करतात त्या पद्धतीने आम्ही काम करत असतो.. पुढच्या काळातही आम्ही त्याच पद्धतीने काम करत राहू, अशी प्रतिक्रिया गुलाबराव पाटील यांनी दिली आहे.

# ..ते दोन नेतेच ठरवतील

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३०:

विधानसभा निवडणुकीतील हाराकिरीनंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे पुन्हा एकदा एकत्र येण्याची चर्चा सुरू झाली आहे.

हे दोन्ही बंधू एकत्र येण्याची हीच योग्य वेळ असल्याचे मानले जात आहे. त्यावर ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी भाष्य केले आहे. एकत्र यायचे की नाही हे ते दोन नेतेच ठरवतील. आम्ही त्यावर काहीही बोलू शकत नाही, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी विधानसभा निवडणुकीत राज ठाकरे सरकारच्या विरोधात होते की समर्थनार्थ होते हेच कळले नाही, अशी टीकाही केली.

विधानसभा निवडणुकीत भाजप प्रणित महायुतीचा प्रचंड बहुमत मिळाले. तर काँग्रेस प्रणित महाविकास आघाडीची मोठी हाराकिरी झाली. त्यातही राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची पार धुळधाण उडाली. राज ठाकरे यांच्या सुपुत्र अमित ठाकरे यांनाही माहीम विधानसभा मतदारसंघात पराभव स्वीकारावा लागला.

ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे याविषयी बोलताना म्हणाले की, निवडणुकीचे पराभव झाल्यानंतर ही अशा चर्चा सुरू होते. निकालानंतर काही दिवस अशी चर्चा रंगते. पण त्यानंतर ती मागे पडते. मात्र एकत्र यायचे की नाही, याचा निर्णय ते दोन नेतेच घेऊ शकतात. त्यात आम्ही काहीच बोलू शकत नाही.

# थकबाकीमुळे वीज कनेक्शन तोडलेल्या ग्राहकांसाठी अभय योजनेला मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजना 2024 ला ग्राहकांच्या मागणीनुसार 31 डिसेंबर 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी केले.

राज्यातील महावितरणच्या 31 मार्च 2024 पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) ग्राहकांसाठी 1 सप्टेंबरपासून अभय योजना सुरू केली होती. योजनेचा कालावधी 30 नोव्हेंबर रोजी संपत असून सदर योजनेस एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.



राज्यातील 65,445 वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून 86 कोटी रुपयांचा भरणा झाला असून त्यांना 44 कोटी 35 लाख रुपयांचे व्याज व विलंब आकार माफ झाला आहे. नागपूर परिमंडळातील 7592 वीज ग्राहकांनी योजनेचा लाभ घेतला असून हे परिमंडळ पहिल्या क्रमांकावर आहे. कोल्हापूर परिमंडळ (6101 ग्राहक) आणि पुणे परिमंडळ (5893 ग्राहक) ही परिमंडळे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. विभागांमध्ये नागपूर विभाग 20,400 लाभार्थी ग्राहकांसह पहिल्या क्रमांकावर आहे. त्या नंतर कोकण विभाग (17,798), पुणे विभाग (17,448) व छत्रपती संभाजीनगर (9,818) यांचा क्रम लागतो. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे वीज ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेऊन चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. अभय योजनेत मूळ बिलाच्या 30 टक्के रक्कम भरून ऊर्वरित 70 टक्के रक्कम सहा हफ्त्यात भरायची सवलत ग्राहकांना देण्यात आली आहे. जे घरगुती, व्यावसायिक इत्यादी लघुदाब ग्राहक एक रकमी थकित बिल भरतील त्यांना दहा टक्के तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत आहे. भिवंडी, मालेगाव, मुंब्रा, शीळ व कळवा या महावितरणच्या फ्रांचायजी क्षेत्रातील वीज ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

### असा लाभ घ्या

संबंधित वीज ग्राहकांना ऑनलाईन पद्धतीने अभय योजनेचा लाभ घेता येईल. महावितरणच्या मोबाईल ॲपवरून योजनेचा लाभ घेता येईल. वीज ग्राहक 1912 किंवा 18002333435 किंवा 18002123435 या टोल फ्री क्रमांकावर फोन करूनही माहिती घेऊ शकतात. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित वीज ग्राहकाला पुन्हा एकदा नियमित वीज कनेक्शन घेता येईल.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त धावणार अनारक्षित विशेष रेल्वेगाड्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वे नागपूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान अनारक्षित विशेष गाड्या चालवणार आहे.



नागपूर ते मुंबई एकेरी विशेष गाड्या धावणार आहेत. विशेष गाडी क्रमांक ०१२६२ नागपूर येथून ०४ डिसेंबर रोजी २३.५५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२६४ नागपूर येथून ०५ डिसेंबर रोजी ०८.०० वाजता सुटेल आणि मुंबई येथे त्याच दिवशी २३.२० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१२६६ नागपूर येथून ०५ डिसेंबर रोजी १५.५० वाजता सुटेल आणि मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १०.५५ वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०२०४० नागपूर येथून ०७ डिसेंबर रोजी १३.२० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी ०४.१० वाजता पोहोचेल. या गाड्यांना अजनी, सेवाग्राम, वर्धा, पुलगांव, धामणगांव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, जलंब, मलकापुर, भुसावल, जळगांव, चाळिसगांव, मनमाड, नासिक रोड, इगतपुरी, कसारा, कल्याण आणि दादर येथे थांबे राहील. दोन गार्ड ब्रेक व्हॅनसह १६ सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे अशी गाडीची संरचना राहणार आहे.

विशेष गाडी क्रमांक ०१२४९ मुंबई येथून ६ डिसेंबर रोजी १६.४५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १०.०५ वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२५१ मुंबई येथून ६ डिसेंबरला १८.३५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १२.१० वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२५३ दादर येथून ७ डिसेंबर रोजी ००.४० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल.

विशेष गाडी क्रमांक ०१२५५ मुंबई येथून ७ डिसेंबर १२.३५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ०३.०० वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२५७ मुंबई येथून ८ डिसेंबर १८.३५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १२.१० वाजता पोहोचेल.

विशेष गाडी क्रमांक ०१२५९ दादर येथून ८ डिसेंबर ००.४० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल. या गाडीला दादर, कल्याण, कसारा, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगांव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, जलंब, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव, पुलगांव, वर्धा, सेवाग्राम आणि अजनी येथे थांबा राहील. दोन गार्ड ब्रेक व्हॅनसह १६ सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे अशी गाडीची संरचना राहणार आहे.

# पार्टीलाइझर नाटकाचे उत्कृष्ट सादरीकरण



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

महाराष्ट्र शासन राज्य नाट्य स्पर्धा नुकतीच नागपुरात याची प्राथमिक फेरी सुरू झाली आहे. यात श्री पिराजी बाहुदेशी संस्था नागपूर आणि सहाय्यक उत्तुंग महिला भजन मंडळ नागपूर व ऑरेंज सिटी बहुदेशी संस्था विहिरगाव यांच्या निर्मितीने नितीन शेंगावकर लिखित मराठी दोन अंकी नाटक "पार्टीलाइझर" नाटक दिनांक 27/११/2024 रोजी बुधवारला वसंतराव देशपांडे सभागृहात सादर झाले.

या नाटकाचे दिग्दर्शन किशोर येळणे यांनी केलं होते तर रंगमंच व्यवस्था निशिगंधा राऊत यांनी केली. प्रकाश योजना सपन राऊत यांनी केली.

संगीत योजना प्रणय बुरडकर यांनी केली. या नाटकात शेतकरी त्याची व्यथा आणि फर्टि या सर्वात शेतकऱ्याची कशी गुसमट होते, हेच या नाटकांतून दिसून येते. यात कलाकार वैभव सोनवणे, प्रार्थना गोडबोले, रुपेश गोंगाल, आणि मिलिंद वरघणे यांनी भूमिका साकारल्या. आशा प्रकारे हे नाटक पूर्णत्वास आलं. लवकरच प्रेक्षकांना याचा दुसरा प्रयोग बघायला मिळेल, अशी आशा निर्माते सपन राऊत यांनी व्यक्त केली आहे.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

दिव्यांग जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या वतीने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जि.प. व रोटरी क्लब ऑफ नागपूर व्हिजनच्या संयुक्त विद्यमाने १ ते ४ डिसेंबर दरम्यान उमंग हा संगीतमय कार्यक्रम सिव्हील लाइन्स येथील सेंट उसुर्ला शाळेच्या होणार आहे. येत्या ३ डिसेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता गांधीबाग ते चिटणीस पार्क मार्गावर जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. शहर व ग्रामीण भागातील ८३ शाळेतील १२०० दिव्यांग विद्यार्थ्यांचा रॅलीत सहभाग राहणार आहे.

याप्रसंगी जवळपास ५०० दिव्यांग विद्यार्थी सहभागी होईल. जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे चिटणीस पार्क येथे होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्वेन्शन सेंटर येथे सुध्दा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# विदर्भ गौरव पुरस्कार-२०२४ पुरस्कार वितरण समारंभ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने मागील २५ वर्षांपासून स्व माणिकलाल गांधी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'विदर्भ गौरव पुरस्कार' देण्यात येत असतो. विदर्भातील ज्या मान्यवराने विविध क्षेत्रात देदीप्यमान काम केले असेल किंवा विदभार्चा लौकिक बृहत्विदर्भात वाढविला असेल अशा मान्यवर व्यक्तीचा सन्मान करण्यात येत असतो, रोख एक लक्ष रुपए, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

२०२४ चा "विदर्भ गौरव पुरस्कार" प्रसिद्ध शेफ श्री, विष्णू मनोहर यांना देऊन गौरविण्यात येणार आहे. विष्णू मनोहर यांच्या नावावर आजवर २५ विश्वविक्रम असून, त्यांच्या "विष्णूजी की रसोई" ची संपूर्ण जगात एकुण ७ ठिकाणी व्यावसायिक केंद्रे आहेत. यासोबतच महाराष्ट्र शासनाच्या शालेय पोषण आहार समितीचे अध्यक्ष आहेत व प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण बोर्ड नवी दिल्लीचे सदस्य आहेत.

हा कार्यक्रम रविवार दि. १ डिसेंबर, २०२४ रोजी सायं. ७.०० वा. इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स सभागृह, अंबाझरी रोड, रामदासपेठ, नागपूर येथे संपन्न होईल.

पुरस्कार वितरण समारंभ भारत सरकारचे रस्ते, महामार्ग व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते व सुप्रसिद्ध मेंदू विकार तज्ज्ञ, वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरोलॉजीचे विश्वस्त, पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होईल.

याप्रसंगी राष्ट्रीय पातळीवरील ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखडे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील, या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे.

# रेल्वेच्या ऑनलाईन तिकीट बुकिंगची नवी शक्कल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

रेल्वे तिकीटांचा काळाबाजार टाळण्यासाठी प्रशासनाने अनेक उपाययोजना केल्या असून ऑनलाईन तिकीट विक्रीतही काही निर्बंध घातले आहेत. परंतु त्यातून काही मार्ग काढत ई-तिकीट खरेदी-विक्रीचा गोरखधंदा सुरू असल्याचे दिसून आले आहे. ई-तिकीट बुकिंगसाठी लढवलेली शक्कल बघून तर रेल्वे सुरक्षा दल, लोहमार्ग पोलीस थक्क झाले.

सर्वसामान्य नागरिकांना सर्वात परवडणारा प्रवास रेल्वेचा आहे. त्यामुळे सदासर्वदा रेल्वेगाड्यांना गर्दी असते आणि कन्फर्म तिकीट मिळवणे फारच जिकरीचे काम झाले आहे.

त्यामुळे तिकिटांचा काळाबाजार होण्याचे प्रकार वाढले आहेत. हे टाळण्यासाठी अनेक उपाय देखील करण्यात आले. आता तर ऑनलाईन तिकीट विक्रीतही काळाबाजारासाठी नवीन नवीन क्लृप्ती करण्यात येत आहे. या प्रकाराद्वारे अनेकदा कन्फर्म तिकीट मिळत असल्याचा दावा केल्या जात आहे. रेल्वेच्या ई-तिकिटाचे अवैध आरक्षण करून मिळविलेल्या तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्या एका आरोपीला रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून ५४ ई- तिकिटे तसेच मोबाइल जप्त करण्यात आला.

रेल्वेच्या काळाबाजार करणारे एक मोठे रॅकेट अनेक वर्षांपासून नागपुरात सक्रिय आहे. हे आरोपी त्यांच्या संपकार्तील लोकांच्या युजर आयडीचा वापर करून वेगवेगळे शहर आणि वेगवेगळ्या रेल्वे गाड्याची तिकीटे खरेदी करतात आणि गरजू प्रवाशांना त्या विकतात. त्याबदल्यात ते एका तिकिटावर तिनशे ते पाचशे रुपये जास्त घेतात. नागपूर शहरातील जरीपटका, सदर, लकडगंज, धरमपेठ, खामला, सीताबर्डी, वर्धमाननगर, गांधीबागसह अन्य काही भागांत अशा दलालांचे मोठे रॅकेट सक्रिय आहे.

लोहमार्ग पोलिसांच्या एका पथकाला गुरुवारी ई- तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्या आरोपीची माहिती मिळाली. त्यावरून सहायक पोलीस उपनिरीक्षक अश्विन पवार, मुकेश राठोड, सचिन दलाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आरोपींना आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून रेल्वेचे सहा लाइव्ह तिकीट तसेच ४८ जुने तिकीट तसेच मोबाइल जप्त करण्यात आला. एका तिकिटामागे २०० ते ३०० रुपये जास्त घेऊन हे तिकीट अवैधपणे रेल्वे प्रवाशांना विकत असल्याचे आरोपीने पोलिसांना सांगितले.

त्याच्याविरुद्ध रेल्वे कायद्याच्या कलम २४३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे. आरोपीचे नाव शुभम कमलाकर सूर्यवंशी असून तो बिनाकी ले-आऊटमधील यादवनगरात राहतो, असे तपास अधिकाऱ्यांनी सांगितले.

# रामनगर व्यायाम शाळेतर्फे रमेश माटे यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

पश्चिम नागपूर नागरिक संघद्वारा संचालित रामनगर व्यायाम शाळेचे आधारस्तंभ व गतकाळातील प्रसिद्ध मल्ल आ. चैनसूख संचेती यांनीं व पश्चिम नागपूर नागरिक संघाचे अध्यक्ष रवी वाघमारे व सचिव राजीव काळेले यांनी रामनगर व्यायामशाळेचे मल्ल रमेश माटे यांचा सत्कार केला. रमेश माटे यांनी गोवा इथे भारोतोल्लन स्पर्धेत वेटर्न ग्रुप मध्ये ८० किलो वजन उचलून ६९ व्या वर्षी चौथा क्रमांक पटकावला. याप्रसंगी सुरेश काळभूत, नारायण निघोट, शाम खंडागळे आदिंची उपस्थिती होती.

# 'शिवबा ते छत्रपती' 'जीवन गाथा शिवरायांची' संकल्पनेवर वार्षिक स्नेहसंमेलन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

रविनगर नागपूर येथे प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये 'शिवबा ते छत्रपतीह 'जीवनगाथा शिवरायांची 'या संकल्पनेवर आधारित या वार्षिक स्नेहसंमेलन उत्साह, जोश आणि शिस्तबद्धतेने साजरे करण्यात आले. या कार्यक्रमाने शाळेच्या इतिहासात एक नवीन अध्याय जोडला.



विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान कार्यांची आणि त्यागाची प्रभावी आठवण उपस्थितांना करून दिली. कार्यक्रमाची सुरुवात भारत माता पूजन करून तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पांजली अर्पण आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

या कार्यक्रमाच प्रमुख पाहुणे एअर व्हॉइस मार्शल सूर्यकांत तसेच धरमपेठ हायस्कूल इतिहास विभागाचे डॉ.सतीश चाफले. तसेच संस्थेचे अध्यक्ष ॲड.अशोक बन्सोड, संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद फडणवीस, उपाध्यक्ष भालचंद्र कागभट, संस्थेचे सचिव विजय कागभट, सी.पी.अँड बेरार एमबीए डिपार्टमेंटचे भावे, प्रहार मिलिटरी स्कूलच्या प्राचार्या वंदना कुलकर्णी, संस्थेतर्गत येणाऱ्या शाळांचे प्राचार्या रसिका काळे, कृष्णा रंधाई,विजया दहिकर, लीना नागरिकर व पूजा गांगुली यांच्यासह विविध शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांनी त्यांच्या स्वागत भाषणात महाराजांच्या अद्वितीय नेतृत्व गुणांवर आणि त्यांच्या जीवनातील मूल्यांवर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की शिवाजी महाराजांचा आदर्श फक्त इतिहासापुरता मर्यादित नसून, आजच्या काळातही तो तितकाच महत्त्वाचा आहे.

विद्यार्थ्यांनी प्रस्तुत केलेल्या कर्नल सुनील देशपांडे यांचे अनुभव असा एक प्रसंग, 'शिवरायांचा जन्म' 'शिवरायांचे बालपण' 'रायरेश्वर मंदिरातील प्रतिज्ञा' 'तोरणा किल्ला' शिवाजी महाराजांचेसरदार तानाजी मालुसरे, बाजीप्रभू'शाहिस्तेखानाची फजिती' 'प्रतापगडचा पराक्रम' 'अफजलखान वध' 'शिवाजी महाराजांची युद्धनीती' आणि 'शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा' यांसारख्या नाट्यमय प्रसंगांनी तसेच बहारदार नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. कलाकारांच्या वेशभूषा, अभिनय आणि संवादफेकीमुळे इतिहास जणू प्रत्यक्ष उभा राहिला होता. नृत्यगायन सादरीकरणांनी कार्यक्रमाला रंगत आणली. विशेषतः,पारंपरिक मराठी पोवाड्यांनी उपस्थितांना भारावून टाकले.

कार्यक्रमाच्या समारोपाला शाळेच्या संचालक मंडळांनी तसेच मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांच्या कलेचे आणि मेहनतीचे कौतुक केले.

त्यांनी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांचा आदर्श अंगीकारण्याचा संदेश दिला. प्रमुख पाहुण्यांनीही या कलाप्रदर्शना बद्दल समाधान व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. पालकांनी आणि उपस्थितांनी शाळेच्या व्यवस्थापनाचे व शिक्षकांचे अभिनंदन करत, विद्यार्थ्यांच्या कौशल्यांची प्रशंसा केली.

कार्यक्रमाच्या शेवटी, शाळेच्या आवारात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण पाहायला मिळाले. 'जीवनगाथा शिवरायांची' हा स्नेहसंमेलनाचा विषय विद्यार्थ्यांच्या स्मरणात कायमचं कोरलं गेलं. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन शाळेच्या शिक्षिका शोमा पाल यांनी केले.

# निवडणूक गैरप्रकार ईव्हीएम व पैशाचा महापूर विरोधात बीआरएसपी लढा उभारणार : डॉ. सुरेश माने

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या राज्य विधानसभा निवडणूकीत अमाप पैशांचा महापूर, निवडणूकीतील लोकांचा स्वतंत्र व निःपक्ष निवडणूका यावरील विश्वास कमी होत असून निवडणूकामध्ये काळपैशांचा महापूर व निवडणूक प्रक्रियेतील अनेक गैरवापर यांना रोखण्यात भारतीय निवडणूक आयोग यंत्रणा संपूर्णपणे अपयशी ठरलेली असून या विरोधात राज्यघटना व लोकशाही रक्षणासाठी बीआरएसपी तर्फे राज्यात व दिल्लीत आगामी दिवसात पक्षातर्फे उग्र जन आंदोलन केले जाईल अशा प्रकारचा जाहीर ईशारा बीआरएसपीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. डॉ. सुरेश माने यांनी नागपूर येथे दि. ३० नोव्हें. २०२४ रोजी बीआरएसपी विदर्भ वतीने आयोजीत निवडणूक आढावा बैठकीत जाहीर केले आहे. ही बैठक नागपूरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मिशन हॉन आवळे चौक, लष्करीबाग नागपूर येथे संपन्न झाली.




बीआरएसपी चा निवडणूकीतील सहभाग व अपयश याची समीक्षा करतांना ॲड. डॉ. सुरेश माने यांनी असमाधान व्यक्त करून पक्ष संघटना यंत्रनेची पुनर्रचना करून आगामी निवडणूकांना सामोरे जाण्याचे सर्व बीआरएसपी पदाधिकारी-कार्यकर्ते यांना आवाहन केले.

याशिवाय निवडणूकीतील गैरप्रकाराचे विश्लेषण करताना राज्यात महाविकास आघाडीला फाजील आत्मविश्वास नडला तर लहान-लहान राजकीय पक्षांना या निवडणूकीत महायुती व महाविकास आघाडी या दोघांनी मिळून संपविण्याचे कटकारस्थान केले असाही आरोप ॲड. डॉ. माने यांनी केला. राज्यातील निवडणूक आयोग यंत्रणा व पोलीस यंत्रणा यांनी लोकहीतासाठी जाहीर करण्याचे आवाहन ॲड. डॉ. सुरेश माने यांनी केले. देश व राज्यात भाजपा-मोदी कोंद्र सरकार व्दारा नोटबंदी नंतर काळा पैशाचा गैरवापर थांबेल या भाजपाच्या दाव्याची राज्य विधानसभा निवडणूकीतील पैशाच्या महापुराने पुरेपुर वस्त्रहरण केलेले आहे. असे ही ॲड. डॉ. सुरेश माने यांनी स्पष्ट केले. याशिवाय राज्यातील ईव्हीएम निवडणूक आकडेवारी, एकुण मताची टक्केवारी व महायुतीला मिळालेले अनपेक्षीत यश याबाबत प्रश्न चिन्ह निर्माण करून भारतीय निवडणूक आयोग आपल्या घटणात्मक जबाबदारीचे पालन करीत नसून त्याला केंद्र व राज्य सरकार यंत्रण्धा खतपाणी घालत असून याप्रकारे भारतीय लोकशाही व राज्यघटना या दोन्हीची हत्या केली जात असल्याचा आरोप ॲड. माने यांनी केला.

# रामकृष्ण जुनघरे लिखित इंद्रधनुषी काव्यसंग्रहाचे प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची हिम्मत कवीने दाखविली असून जनतेच्या लोकशाहीची स्वप्ने पाहणारा हा कवी आहे असे प्रतिपादन जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. प्रशांत राऊत यांनी केले. स्थानिक उमरेड येथील जिचकार सभागृहात जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद उमरेड आणि जुनघरे मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व.बेबीताई जुनघरे स्मृतीत रामकृष्ण जुनघरे लिखित इंद्रधनुषी काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी प्रकाशनपर भाष्य करताना डॉ.राऊत बोलत होते. जगद्गुरू तुकोबाराय आणि संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विचार पिठावरील उपस्थित मान्यवरांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभाकर तांडेकर म्हणाले की, जुनघरे यांची कविता उत्स्फूर्त भावनांचा सहज आविष्कार आहे.याप्रसंगी प्रमुख अतिथी पुरुषोत्तम भिसिकर, ज.तू.सा.प. विभागीय अध्यक्ष डॉ. संजीव कोंडेकर, ज.तू.सा.प. नागपूर जिल्हाध्यक्ष जयंत झंझाड, बाबुराव जुनघरे, बळवंत मोरघडे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी रामकृष्ण जूनघरे यांनी केले. याप्रसंगी गिरीश अग्नीहोत्री, रतन मेश्राम व कैवल्य मेश्राम यांनी जुनघरे यांच्या तीन कवितांचे श्रोत्यांसमोर संगीतबध्द गायन केले. याप्रसंगी उमरेड नगरीतील जूनघरे मित्र परिवारांचे कवीची त्यांच्याप्रति कुतज्ञता म्हणून सत्कार करण्यात आले. विनोद मेश्राम, हरिश्चंद्र झाडे, बळवंत मोरघडे, अनिल धनविजय, रमेश देवघरे, धनराम गुंडलवार, निशिकांत चौधरी, श्रीमती सुमनताई इटनकर, मधुकर लांजेवार, बंडूभाऊ शिंदे, प्रमोद कुलकर्णी, डॉ.अरविंद पंडित, बळवंत भुसारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेत. कार्यक्रमला असंख्य वाचक रसिकांची प्रचंड उपस्थिती होती.

मध्य रेल्वे
ई-निविदा सूचना
ई-निविदा सूचना क्रमांक NGP/C/NFR/PUX/Canteen/24-3, दिनांक: 29.11.2024. कामाचे नाव: परासिया रेल्वे स्थानकाच्या गुड्स शेडमधील कामगारांसाठी पाच वर्षांच्या कालावधीसाठी कर्मचारी कॅन्टीन सुविधांची तरतूद. राखीव किंमत (वार्षिक): रु. १,१३,४००/-. एकूण निविदा मूल्य: रु. ६,०२,१५४/- एकूण निविदा मूल्याच्या २% अर्नेस्ट मनी डिपॉझिट: रु. १२,१००/-. निविदा दस्तऐवजाची किंमत: रु. २०००/- (नॉन रिफंडेबल). निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: २०.१२.२०२४ रोजी (१५.३० वाजता बंद). निविदांची वैधता: निविदा उघडल्यापासून ६० दिवस. टीप: सविस्तर माहिती www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे
एसीएम (कॉग)
DE/381 मध्य रेल्वे, नागपूर
रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

मध्य रेल्वे
ई-निविदा सूचना
ई- निविदा सूचना क्र. NGP/C/NFR/AQ/Canteen/24-9, तारीख: 29.11.2024. कामाचे नाव: अजनी सी अँड डब्ल्यू यार्डमध्ये कॅन्टीन सुविधा म्हणजेच चहा आणि नाश्ता साठी ५ वर्षांच्या कालावधीची तरतूद. राखीव किंमत (वार्षिक): रु. ५,८७,८८०/-. एकूण निविदा मूल्य: रु. ३१,२१,६४३/-. एकूण निविदा मूल्याच्या २% अर्नेस्ट मनी डिपॉझिट: रु. ६२,५००/-. निविदा दस्तऐवजाची किंमत: रु. ३०००/- (नॉन रिफंडेबल). निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: २०.१२.२०२४ रोजी (१५.३० वाजता बंद). निविदांची वैधता: निविदा उघडल्यापासून ६० दिवस. टीप: सविस्तर माहिती www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे
एसीएम (कॉग),
DE/386 मध्य रेल्वे, नागपूर
रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

# महाराष्ट्राच्या राजकारणात एकाकी 'एकनाथ'!

**अडीच वर्षांपूर्वी शिवसेनेला 'दे धक्का' कार्यक्रम करून एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर 'पन्नास खोके एकदम ओके' यासह 'गद्दार' या शब्दांनी संपूर्ण शिंदे समर्थक घायाळ होत होते. परंतु विधानसभा निवडणुकीत यश मिळवूनही एकनाथ शिंदे 'एकाकी' पडल्याचे स्पष्टपणे जाणवू लागले आहे. त्यांना कोणत्याही परिस्थितीत भाजपला झुकवता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. कारण शिंदेंव्यतिरिक्त भाजपचे काहीही अडू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु मुख्यमंत्री पदावरून खाली उतरताना पुन्हा त्याच पदावर जाण्यासाठी त्यांनी ज्या काही अटी शर्ती टाकायला सुरुवात केली, त्यावरून हिंदुत्व वगैरे हा काहीही प्रकार नसून 'मला किंवा माझ्या मुलाला' काहीतरी मिळावे, हा जो त्यांनी आक्रोश सुरू केला आहे, त्यामुळे त्यांच्या प्रतिमेलाही प्रचंड तडे गेले आहेत. त्यामुळे त्यांची 'बॉडी लँग्वेज' संपूर्ण महाराष्ट्र निरखून पाहत आहे. सध्या एकनाथ शिंदेंचा गंभीर चेहरा नेमकं काय दर्शवतो, यावर अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. काहींनी यामागे मुख्यमंत्रीपद न मिळण्याची नाराजी असल्याचं म्हटलं आहे. मात्र, महाराष्ट्राच्या राजकारणातील सध्याची स्थिती पाहता, एकनाथ शिंदे यांचा हा गंभीर चेहरा भविष्यातील मोठ्या बदलांचे संकेत देत असल्याचं काहींना वाटतं. महाराष्ट्रातमहायुतीलाप्रचंड बहुमत मिळाल्यानंतरही मुख्यमंत्री कोण होणार यावरून सस्पेन्स कायम आहे.**



विधानसभा निवडणुकीत महायुतीने एकूण २३९ जागा जिंकल्या असून, यामध्ये १३२ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. शिवसेनेने ५७ जागा जिंकत दुसऱ्या क्रमांकावर स्थान मिळवलं आहे. त्याशिवाय, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटाने ४१ जागांवर विजय मिळवला आहे. मात्र, यानंतरही मुख्यमंत्रीपदावर कोणाची निवड होणार, याबाबत महायुतीत चर्चेचा घोळ सुरूच आहे. दिल्लीत झालेल्या बैठकीत एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि अमित शाह यांची भेट विशेष चर्चेत आली. या बैठकीतील एका फोटोनं विशेष लक्ष वेधलं आहे. या फोटोत महायुतीतील सर्व नेते हसत-खेळत दिसत असले, तरी एकनाथ शिंदे मात्र गंभीर मुद्रेत दिसले. हा फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत असून, त्यांच्या चेहऱ्यावरील भाव विविध चर्चांना उधाण देत आहेत. भाजपने देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला पसंती दिल्याची बातमी समोर आली आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. मात्र, पत्रकार परिषदेत शिंदेंनी त्याचा इन्कार करताना सांगितलं की, मी नाराज नाही. माझ्याकडून सत्तास्थापनेत कोणताही अडसर ठरणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह जो निर्णय घेतील तो मला मान्य असेल. पण त्यांचे हे मनोगत त्यांना व्यक्त करावेच लागणार आहे. ते नाराज झाले काय किंवा पुन्हा एकदा कुठे निघून गेले काय, भाजपला त्यामुळे काहीही फरक पडणार नाही. मात्र, एकनाथ शिंदे यांचे गंभीर भाव त्यांच्या नाराजीचे संकेत देत असल्याचं स्पष्ट होतयं.

महायुतीने मोठ्या बहुमताने निवडणूक जिंकली असली तरी मुख्यमंत्रीपदावर सहमती घडवून आणणे हे आव्हान आहे. भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्या असल्याने देवेंद्र फडणवीस यांचे नाव पुढे आहे. या सर्व गडबडीत एक निरीक्षण नोंदवले गेले आहेत. महायुतीच्या संपूर्ण प्रचार प्रवासात, सतत एकनाथ शिंदे यांचा चेहरा प्रोजेक्ट केला गेला. फडणवीसांना कुठेच पिक्चरमध्ये आणले गेले नाहीत. जिथे जिथे जरांगे फॅक्टर होता, तिथे तिथे फक्त एकनाथ शिंदे हाच चेहरा वापरला गेला. एवढेच काय तिथे अजित पवारांचा चेहरा पण लांब ठेवला गेला. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या दर्दभरी आवाजात आले का पैसे? माझ्या लाडक्या बहीणी वगैरे स्टेटमेंट वापरली गेली. नंतर निकाल आला. दुस-याच क्षणी एकनाथ शिंदे यांना भिरकावले गेले आणि संघ मैदानात उतरला. फडणवीस काय चिज कळली का? भाजपचे दणदणीत यश, भाजपच्या नितीचे यश, फडणवीस यांना शिव्या देणे लोकांना आवडले नाही, अशा प्रकारच्या हेडलाईन्स, पोस्ट, युट्यूबर यांच्या न्यूज याचा सेकंदा सेकंदाला मारा केला गेला आणि एका फटक्यात एकनाथ शिंदे हा चेहरा भिरकावला गेला. उद्धव ठाकरे हे बेरकी आहेत. भाजप काय चिज आहे त्यांना अगोदरच कळले आहे. राज ठाकरेंना आत्ता कळलं आहे.



येत्या काही दिवसांत अनेकांना कळेलच. महाराष्ट्रातही बिहारप्रमाणेच सरकार स्थापन करावे अशी शिंदे समर्थकांची इच्छा आहे. बिहारमध्ये नितीशकुमार यांच्या आमदारांची संख्या कमी असली तरी भाजपनं त्यांना मुख्यमंत्री केलंय हे खरंय. मात्र तिथंली परिस्थिति वेगळी होती. तिकडं भाजप समोर पर्याय नव्हता किंवा नाही. भाजपनं मुख्यमंत्री केलं नसतं तर नितीशभाऊ विरोधी पक्षात जाऊन मुख्यमंत्री झाले असते. तेवढी सदस्य संख्या विरोधी पक्षाकडे देखील होती. नितीशकुमार कशीही, केव्हाही कूस बदलण्यात पटाईत आहेत, याची भाजपला कल्पना आहे. बिहार विधानसभेचं गणितच असे आहे की, बिहारमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी १२३ आमदारांची गरज लागते. सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपकडे ८४ आमदार होते. त्यांना जवळपास ४० आमदारांची गरज होती. ती त्यांनी नितीशकुमार यांना बरोबर घेऊन भागविली. पर्याय नव्हता म्हणून भाजपला मुख्यमंत्री पदावर पाणी सोडावं लागलं.




आज केंद्र सरकार नितीशबाबूंच्या जिवावर टिकून आहे. म्हणजे नितीशकुमार यांची भाजपला दुहेरी गरज होती व आहे. तडजोडीचं कारण हे असं होतं. महाराष्ट्रातही असं होईल किंवा व्हावं म्हणून एकनाथ शिंदे देव पाण्यात ठेऊन होते. म्हणजे भाजप ७५ ते ८५ जागांवर आटोपेल, अन मग बिहार सारखी परिस्थिती निर्माण होऊन आपण पुन्हा मुख्यमंत्री होऊ अशी शिंदे यांची अटकळ होती व तसा प्रयत्नही होता. शिंदे यांच्या दुर्दैवाने तसं झालं नाही. भाजप थेट १३२ वर पोहोचला. आणखी पाच अपक्षांनी भाजपची वाट धरली तर तो आकडा १३७ वर गेला. सरकार स्थापन करण्यासाठी १४५ आमदार लागतात. आठ आमदार जमा करणं भाजपला कठीण नाही. अजित पवार यांनी हे ओळखलं आणि देवाभाऊंच्या नावाला पाठिंबा दर्शविला. एकनाथ शिंदे यांचं महत्व शुन्यावर आलं. आज परिस्थिती अशीय की, एकनाथ शिंदे आणि अजित पवारही बरोबर नसले तरी भाजप सरकार स्थापन करू शकते. याचं कारण असं की, मुळचे भाजपचे असलेले पण एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षाच्या तिकिटावर विजयी झालेले किमान बारा आमदार असे आहेत की, ते भाजपचेच आहेत. केव्हाही मुळ तंबूत परतू शकतात. म्हणजे भाजप सेफ आहे. परिणामतः भाजप देईल ती 'ऑफर' स्वीकारण्याशिवाय एकनाथ शिंदे यांच्यासमोर पर्याय नाही. समजा एकनाथ शिंदे यांनी केंद्रातील भाजप सरकारचा पाठिंबा काढून घेतला, तरी मोदी सरकार पडत नाही. म्हणजे दोन्हीकडे शिंदे यांची भाजपला गरज नाही. थोडक्यात शिंदेंची उपयुक्तता संपलीय हे लक्षात घ्यावे लागणार आहे. गरज होती तेव्हा कमी संख्या असतानाही एकनाथ शिंदेंना भाजपनं मुख्यमंत्री केलंच होतं. आज त्यांची गरज संपली आहे. मग भाजपनं का तडजोड करावी? एकनाथ शिंदे यांना पून्हा मुख्यमंत्री करून किंवा त्यांना मोठं करून भाजपला काय मिळणार? एकनाथ शिंदेचे पंख छाटणे सुरू झालंय व हतबल शिंदेंजवळ आता पर्यायही शिल्लक नाही.

शिंदे आणि त्यांच्या समर्थकांनी हे लक्षात घेतले पाहीजे. शिंदे राजकारणात कितीही चाणक्य असले, तरी प्रत्येकवेळी फासे आपल्या मनासारखे पडतीलच असं नाही. ५७ आमदार निवडून आल्यानंतरही एकनाथ शिंदेंच्या हाती काहीच राहिलं नाही, हे त्यांच्या समर्थकांनी एकदाचे मान्य करून टाकावे. शिंदेंनी आपल्या पक्षाशी धोकेबाजी करून व पक्ष प्रमुखाच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा इतिहास निर्माण केला आहे. ज्या शिवसेनेने २० वर्षे आमदारकी, मंत्रीपद दिले,

मुलाला खासदारकी दिली तीही एकदा नव्हे तर दोन वेळा असे असतांनाही त्यांच्याशी द्रोह करून मुख्यमंत्री पदासाठी ते बाहेर पडले, हा इतिहास भाजप कसा विसरेल? एकनाथ शिंदे यांना शिवसेना व धनुष्यबाण मिळवून देऊन त्यांच्यावर उपकार करून ठेवले आहे. पण भाजपची कुटनीती शिंदेंना कळायला उशीरच झाला. 'मी मुख्यमंत्री पदाचा दावा करत नाही,' असे जाहीर करूनही भाजपा समोर पत्करलेली ती हारच समजली जात आहे. कारण 'भाजपचे वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील तो आमच्यासाठी अंतिम असेल' हे त्यांचं वाक्य गुलामगिरीच्या दिशेने जाणारे वाटते त्यातच मला काही देता येत नसेल तर माझ्या मुलाला केंद्रात मंत्री किंवा राज्यात उपमुख्यमंत्री पद त्यांनी मागितले, यावरूनच त्यांची स्वत:साठीची भूमिका त्यांच्या पक्षाला व महाराष्ट्राच्याही लक्षात आली. अजितदादांना वैतागून शिवसेनेतून बाहेर पडलो, हिंदुत्वाला वाचविण्यासाठी बाहेर पडलो, या सर्व काही वल्गना होत्या हे काळानेच सिद्ध केले!

# वेद ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मितच!

**(कालच्या अंकावरून पुढे)**

-------

मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल? त्याकरिता कशा प्रकारचा वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे? हे जोतीराव फुलेंनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्म संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडले आहे-

*धर्म राज्य भेद मानवा नसावे।*
*सत्यानें वर्तावे। ईशासाठीं।।*
*सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों।*
*मनुजा सांगतो। जोती म्हणें।।*

*(महात्मा फुले समग्र वाङ्मयः* सार्वजनिक सत्य धर्म पुस्तकः अखंड- पृ.क्र.५५९.)

बहुजन समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील मुलांपर्यंत शिक्षण पोहचवणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. वेदांना झुगारून जोतिबांनी हे कार्य करण्यास सुरवात केली.

त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरूवात केली. तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीमाई फुले यांनी केले. त्यांच्याबरोबर १९ स्त्रिया सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होत्या. त्याचवेळी त्या एका कन्याशाळेच्या शिक्षिकाही होत्या. त्यानंतर मुख्याध्यापिकाही झाल्या.

छ.शाहू महाराजांनी या सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला होता. न्याय, अत्याचार व गुलामगिरी यांपासून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता व त्यांना हक्काची जाणीव करून देणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. या समाजाने पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. तेही स्वरचित मंगळाष्टके उच्चारून-

देवाचे नियमां प्रमाण धरुनी,
चालें तुझें कूळ गे।।
सत्यानें अवघ्यांत श्रेष्ठ असशी,
तैसेच हे त्वत्सगे।।
अज्ञान्या समदृष्टिनें शिकविशी,
तूं ज्ञान त्या दाविशी।।
प्रीतीनें वरितों तुला अजि तुझी,
ऐकून कीर्ति अशी।। ....
शुभमंगल सावधान।।१।।

(महात्मा फुले समग्र वाङ्मयः सत्यशोधक समाजोक्त पूजा-विधीः मंगळाष्टक- वरः पृ.क्र.४३४.)

जोतिबा फुलेजींना मुंबईच्या जनतेनेच महात्मा ही पदवी बहाल केली होती. ही पदवी त्यांना इ.स.१८८८ साली मिळाली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाज सुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात.

दि.२४ सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी आपल्या अनुयायांसह सर्व जातीतील लोकांना समान हक्क मिळवण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. यात सर्व जाती धर्मातील लोकांनीं एकत्रित येऊन उत्पीडित वर्गाच्या उन्नतीसाठी काम केले. तर-

सर्वसाक्षी जगत्पती।
त्याला नकोच मध्यस्ती॥

हे या समाजाचे घोषवाक्य होते.

सर्वसामान्यांचे कैवारी शिक्षणसम्राट महात्मा जोतीराव फुले हे दि.२८ नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे निर्मिकांकी कायमचे विसावले. आज सर्वत्र त्यांचा पावन स्मृतिदिन खरा शिक्षकदिन मानून बहुजन समाजातर्फे गावोगावी आठवडाभर विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. तो आता शासन दरबारीही लागू होण्याची प्रतिक्षा आहे, हे येथे उल्लेखनीयच!

**कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे**
**पिसेवडधा, पो. देलनवाडी,**
**ता. आरमोरी, जि. गडचिरोली.**
**९४२३७१४८८३.**

●●●●●

## गोळी घेताना किती पाणी प्यायलं पाहिजे?

आजारी पडल्यानंतर आपण डॉक्टरकडे जातो. डॉक्टर आपल्याला औषध देतात. आपण ते पाण्यासोबत घेत असतो. काही वेळा गोळ्यांची संख्या अधिक असते. त्यामुळे आपण आपल्या अंदाजाप्रमाणे गोळी घेताना पाणी घेतो.

काही लोक गोळी घशात उतरवण्यासाठी आवश्यक पाणीच घेतात, तर काही लोक पाणी न घेता गोळी गिळून टाकतात. पण हे हानिकारक ठरू शकते. गोळी घेताना पाणी पिणं अत्यंत महत्त्वाचं आहे. गोळी आणि पाणी एकत्र होऊन गोळी वेगाने घासाच्या पचनसंस्थेत विरघळते आणि शरीरात जलद पोहोचते. त्यामुळे गोळीचे फायदे योग्यरित्या होतात.

पाणी न घेता गोळ्या घेतल्यास पचनाच्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. यामुळे अल्सरसारख्या समस्या होण्याची शक्यता वाढते. आपला आजार आणि गोळीच्या प्रकारानुसार पाण्याचे प्रमाण निश्चित करणे आवश्यक आहे.

औषधे घेत असताना नेहमीच जास्त पाणी पिणे चांगले असते. किंवा थोडं कोमट पाणी देखील घेऊ शकता. कोमट पाणी घेतल्यास गोळी वेगाने विरघळते आणि परिणाम लवकर मिळतात. मात्र, अत्यंत गरम पाणी पिणे टाळा. तसेच, अत्यंत थंड पाणी देखील चांगले नाही.

# उद्धव - राज, अहंकार सोडा!

**(कालच्या अंकावरून पुढे)**

त्याचवेळी वांद्रयाच्या कला नगरातून वाघाने डरकाळी फोडत, जर ते शिवसैनिक असतील तर मला त्यांचा अभिमान आहे, असे ठणकावून सांगितले. हा वाघ दुसरा तिसरा कोणी नसून ते होते हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे. हेच बाळासाहेब ठाकरे यांचे कडवे हिंदुत्व.

१९९२-९३ च्या दंगलीत, बॉम्बस्फोटाच्या वेळी मुंबई महाराष्ट्रातील मराठी माणसाला, समस्त हिंदूंना संरक्षण देण्याचे शिवधनुष्य पेलण्याचे काम शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे यांनी केले. शिवसेनेची कॉंग्रेस होऊ देणार नाही, अशा आशयाचे फलक आणि जाहिराती देऊन लोकांना संभ्रमित करण्याचे काम शिवसेना द्वेष्ट्यांनी, उद्धव द्वेष्ट्यांनी केले. परंतु शिवसेनेचा जन्म झाला तेंव्हा ही माणसे कुठे होती ?

१९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना झाल्यानंतर १९६७ साली कॉंग्रेसचे स. गो. बर्वे यांना बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता. हे स. गो. बर्वे सनदी अधिकारी होते. त्यांना यशवंतराव चव्हाण यांनी कॉंग्रेस मध्ये आणून इशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघात उमेदवारी दिली होती. याच स.गो. बर्वे यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली होती. याच आधारावर गुजरातमध्ये जीआयडीसी स्थापन करण्यात आली. स. गो. बर्वे यांच्या दुर्दैवी निधनानंतर त्यांच्या भगिनी ताराबाई सप्रे यांनाही इशान्य मुंबई लोकसभा निवडणुकीत बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता.

ज्या आदित्य ठाकरे यांच्या विरोधात वरळीतून एकनाथ शिंदे यांनी राज्यसभेवर निवडून आलेल्या माजी केंद्रीय मंत्री मिलिंद देवरा यांना उभे केले होते त्याच मिलिंद देवरा यांचे तीर्थरूप मुरली देवरा (२२ वर्षे मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष राहिलेले) यांना महापौर बनविले ते बाळासाहेब ठाकरे यांनीच.

१३ ऑगस्ट १९६० रोजी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांच्या कुंचल्याने भल्या भल्यांना वठणीवर आणणाऱ्या मार्मिक या जागतिक कीर्तीच्या पहिल्या मराठी व्यंगचित्र साप्ताहिकाचे प्रकाशन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते झाले होते. पहिल्या महिला मराठी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता.

कॉंग्रेसचेच प्रणव मुखर्जी यांनाही राष्ट्रपती पदासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता. या दोन्ही वेळा शिवसेना ही भारतीय जनता पक्ष प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीत होती. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे राष्ट्रपती आणि अटलबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान असतांना डॉ. मनोहर गजानन जोशी हे लोकसभेचे अध्यक्ष होते आणि याच काळात संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे चित्रकर्ती सौ. चंद्रकला कुमार कदम यांनी तयार केलेले भव्य तैलचित्र लावण्यात आले.

**उत्तरार्ध**

या अभूतपूर्व ऐतिहासिक कार्यक्रमाच्यावेळी 'राम' म्हणून ओळखण्यात येणाऱ्या अटलबिहारी वाजपेयी यांचे 'लक्ष्मण' प्रमोद व्यंकटेश महाजन हे कां उपस्थित नव्हते आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे सुपूत्र विश्वासराव सावरकर आणि त्यांच्या सहधर्मचारिणींना कशा परिस्थितीमध्ये दिल्लीत नेण्यात आले याचा साद्यंत वृत्तांत ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम आणि शिवसेना नेते सुभाष देसाई यांच्या कडून जाणून घ्यावा.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे सहकारी असलेल्या शिवसेनेशी युती २४ सप्टेंबर २०१४ रोजी एकनाथ खडसे यांनी कुणाच्या सांगण्यावरून तोडली हेही जाणून घ्या आणि २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वतंत्र लढले.

पण शरद पवार यांच्या अदृष्य हातांनी देवेंद्र फडणवीस यांचे अल्पमतातील सरकार वाचल्यानंतर २२ वर्षात जेवढी बदनामी सहन करावी लागली नाही तेवढी बदनामी १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ या २२ दिवसांत सहन करावी लागली, असे सांगून धर्मेंद्र प्रधान आणि चंद्रकांत पाटील यांना मातोश्रीच्या दरवाजावर पाठविण्याचे काम करीत आणि उद्धव ठाकरे यांचा पाठिंबा मिळवून २०१९ पर्यंत पाच वर्षे निर्धोक सत्ता देवेंद्र फडणवीस यांनी राबविली.

५ डिसेंबर २०१४ रोजी सकाळी विरोधीपक्षनेते असलेले एकनाथ संभाजी शिंदे उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दिल्याने सायंकाळी मंत्री झाले. २०१९ ला राजकीय समीकरणे बदलली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केवळ उद्धव ठाकरे यांना विरोध करण्यासाठी आपल्या इंजिनाची दिशा फिरती ठेवली? मग कधी भारताच्या राजकीय क्षीतिजावरुन मोदी शाह यांना हद्दपार करण्यासाठी राज गर्जना झली तर कधी हिंदुत्ववादी शाल पांघरून नरेंद्र मोदी यांच्या व्यासपीठावर जाऊन महायुतीची सहानुभूती मिळविली.

२८ नोव्हेंबर २०१९ रोजी ज्या उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या शपथविधीसाठी मातोश्री कुंदाताई उर्फ मधुवंती ठाकरे यांच्या सह राज ठाकरे सहकुटुंब उपस्थित राहिले त्याच राज ठाकरे यांनी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षातून बाहेर पडल्याचे विस्मरण होत यंदाच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांचा 'खरा गद्दार' असा केलेला उद्धार मातोश्री कुंदाताईंसह तमाम मराठी आणि हिंदूंना घायाळ करुन गेला.

आज उद्धव आणि राज ठाकरे या दोघांनी समोरचा गारदी ओळखून हातात हात घालून, खांद्याला खांदा मिळवून, तंगड्यात तंगड्या न घालता शिवसैनिक आणि महाराष्ट्र सैनिक यांना सोबत घेत महाराष्ट्र धुंडाळून काढण्याची गरज आहे, काळाची मागणी आहे, मराठी माणूस, हिंदू बांधव वाट पहातोय.

शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या उमेदवारांना मिळालेल्या मतांची बेरीज विजयी उमेवारापेक्षा जास्त होते याचे ठसठशीत उदाहरण ठाणे विधानसभा मतदारसंघात मिळालेल्या राजन विचारे (शिवसेना) आणि अविनाश जाधव (मनसे) यांच्या मतांची बेरीज संजय केळकर यांच्या मतांपेक्षा जास्त दिसून येते.

दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा फायदा होतो. हे टाळण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या भल्यासाठी उद्धव आणि राज ठाकरे यांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. बेगडी हिंदुत्ववादी राजकारण्यांचा बुरखा टराटरा फाडून, राजकीय पर्यटन करणाऱ्या वाचाळवीरांना खड्यासारखे बाजूला टाकून पुनश्च हरी ओम करीत उभे रहा.

ठाकरे बंधूंनी एकमेकांना साद घालण्याची, टाळी देण्यासाठी कोण पुढाकार घेईल याची वाट न पाहता मातोश्री ते शिवतीर्थ हे अंतर तोडून छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील त्यांच्या पायाशी विसावलेल्या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकावर त्यांच्या आवडत्या चाफ्याच्या फुलांचा वर्षाव करीत चांदा ते बांदा कूच करावी.

आई तुळजाभवानीचे आणि आई एकवीरेचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेत. उचला तो बेल भंडार आणि चला जनतेचा आशीर्वाद घेण्यासाठी. बांधावरच्या शेतकऱ्यापासून तर चक्र चालवणाऱ्या मजूरापर्यंत आणि दीन दलित, दुबळ्या, रंजलेल्या, गांजलेल्या समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत, आदिवासी, महिला सर्वांना तुमची आस आहे, सर्वांना तुमच्यावर विश्वास आहे तो सार्थ ठरविण्यासाठीची हीच योग्य वेळ आहे. मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या वेळी सेनापती बापट म्हणाले होते,

महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले
महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले
खरा वीर वैरी पराधीनतेचा
महाराष्ट्र आधार हा भारताचा
हेच लक्षात ठेवून करु या वाटचाल.
जय महाराष्ट्र !

**योगेश वसंत त्रिवेदी**
**मुंबई.**
**९८९२९३५३२१.**
**(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)**

●●●●●

# कोणते उत्पन्न शेतीचे आहे आणि कोणते उत्पन्न शेतीचे नाही?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना**

आपण गेल्या तीन आठवड्यापासुन शेतीच्या उत्पना बद्दल चर्चा करत आहोत. शेतीतून मिळालेले उत्पन्न नेहमीच शेतीचेच उत्पन्न म्हणून कायद्यात मानले जात नाही. आज याचे कारण आपण सउदाहरण बघणार आहोत, जे नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोतर रुपात राहणार आहेत.

**प्रश्न** - अनिवासी यांचे शेती चे उत्पन्न असु शकते का ?

● अनिवासी यांची शेती जर भारतात असेल तर ते उत्पन्न म्हणून धरले जाते. या साठी अनिवासी यांची जमीन भारतात असणे आवश्यक आहे.

**प्रश्न** - करदाता हा भारतीय आहे. भारताचा रहिवासी पण आहे,परंतु त्याची शेती ही भारताच्या बाहेर आहे तर भारताच्या बाहेरील झालेल्या शेतीच्या उत्पन्नावर करमाफी मिळेल का ?

● करदाता हा जरी भारतीय नागरीक असला आणि भारतात राहणारा असला तरी ते शेती चे म्हणून उत्पन्न धरले जाणार नाही. याचे कारण असे की इन्कमटॅक्स कायदा 1961 अनुसार शेती ही भारतात असली पाहिजे तरच ती शेती म्हणून धरली जाते अन्यथा नाही.

**प्रश्न** - शेत जमिनीपासुन भाडे मिळत असेल तर ते भाडे शेतीचे उत्पन्न म्हणून धरले जाईल का?

● राजा मुस्तफा आली खान विरुद्ध कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स [1948] 16 ITR 330 या केस मध्ये पटना हाय कोर्ट ने निर्णय दिला की शेतीच्या जमिनी पासुन मिळालेले भाडे हे शेतीचे उत्पन्न म्हणून धरले जाईल.

**प्रश्न** - जर भारतीय नागरिकाची शेती भारताबाहेर म्हणजेच परदेशात असेल तर त्या जमिनीपासुनचे शेतीचे उत्पन्न म्हणून धरले जाईल का?

● नाही, कारण शेतीचे उत्पन्न धरण्यासाठी शेती ही भारतातच असणे आवश्यक आहे. परदेशातील जमिनी पासून चे उत्पन्न शेती चे उत्पन्न म्हणून धरले जाणार नाही.

**प्रश्न** - शेतीमध्ये मस्यपालनाचे काम होत असेल तर त्याचे उत्पन्न शेतीचे उत्पन्न म्हणून कायद्यात धरले जाईल का?

● मस्यपालन जरी शेतीत होत असेल तरी त्यास इन्कमटॅक्स कायद्यात शेती मध्ये धरले जात नाही म्हणून त्याचे उत्पन्न ही शेतीचे उत्पन्न म्हणून धरले जाणार नाही. असेच निर्णय कलकत्ता हायकोर्ट ने एम्परर विरुद्ध प्रोभात चंद्र बरुआ डल्ली कळफ 284 (उंर) या केस मध्ये दिला आहे.

**प्रश्न** - शेतात फुलशेती आणि लता शेती उत्पन्न मिळत असेल तर या फुलशेती चे उत्पन्न शेती चे उत्पन्न म्हणून धरले जाईल का ?

● लता शेती तथा फुलांची शेती पासून मिळालेले उत्पन्न हे शेती चे उत्पन्न म्हणून धरले जाईल.

**प्रश्न** - Replantation Of Tree म्हणजेच झाडांचे पुनरोपन करून मिळालेले उत्पन्न शेतीचे उत्पन्न आहे का?

● कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स विरूद राजा बेनॉय कुमार साहस रॉय [ 1957] 32 ITR 466 (SC) या केस मध्ये मा. सुप्रीम कोर्टाने स्पष्ट सांगितले आहे की रिप्लान्टेड झाडांचे उत्पन्न हे शेतीचे उत्पन्न म्हणून धरले जाईल.

पुढील आठवड्यात आपण शेती बद्दल ची नवीन माहिती बघणार आहोत.




●●●●●

## अशोकायन

### एडस् निर्मुलन दिन

**क्षणिक लैंगिक स्वैराचार**
**जीवनात करेल अंधकार..**

**क्षणभराची मौजमजा**
**आयुष्यभराची देई सजा.**

**जर एडस् पासून हवे संरक्षण**
**एकपत्नी व्रताचे करा आचरण.**

**दुषित रक्त दुषित सुई**
**एडसचे जीवाणू वाहून नेई**

**सुरक्षित समागमाची दक्षता**
**एडसूपासुन देईल सुरक्षितता..**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# प्रयत्नाची जोड मिळाल्यास ईच्छा पुर्णत्वास जाते : विदुर महाजन

■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. ३० :

सीतार -(वीणेच्या) तारेतून मानसिक ताण तणाव कमी करण्याचे एक माध्यम आहे. मानसिक स्वास्थ्य सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी सीतारे (वीणा वादन)चा संपूर्ण राज्यात व देशात प्रचार व प्रसार करण्यासाठी शाळा/ महाविद्यालये व अन्य सामाजिक व संगित संस्थांचे मध्यातून संपुर्ण राज्यात नेण्याचे उद्दिष्ट असल्याचे सुप्रसिद्ध सीतार वादक -विदुर महाजन यांनी नागपूर जिल्ह्यातील लाखोटीया भुतडा हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय व सीबीएसई हायस्कूल येथे व्यक्त केले.



यावेळी सुमारे २४०० विद्यार्थी विद्यार्थिनींना सीतार वादातून जीवनात मिळणाऱ्या मानसिक समाधान, त्यातून दैनंदिन कमी होणारा ताण तणाव त्यांनी सीतार वादनाचे प्रत्यक्षितातून समजावून सांगितले. संगीत व वीणा वादातून मिळणारा भाव त्या भावाचा? भावार्थ त्यातून उत्पन्न होणारी संगीत ईच्छा शक्ती क्षमता व उत्सुकता या बाबतीत मोलाचे मार्गदर्शन केले. त्याच प्रमाणे सीतार व संगीत, त्या बाबतीत विविध पहलूंची उकल करवून दाखवली. सितार जग विख्यात कसे झाले, देशी संगीत आणि पाश्चिमात्य संगीताची विस्तृत माहिती दिली.

शिक्षणात संगीत व संगीताचे महत्त्व, राग व त्याचे अर्थ प्रात्यक्षिक करून समजावून सांगितले. तसेच आपणच आपले जीवन आनंदमय कसे ठेवू शकतो. याची जाणीव व जागृती केली. अभिनय संगीत शैक्षणिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सुधीर बुटे यांच्या, प्रमुख उपस्थिती सामाजिक कार्यकर्ते दुर्गा प्रसादजी पांडे, उपमुख्याध्यापक कैलास थुल, सीबीएसई हायस्कूलचे उपप्राचार्य योगेश चौधरी, पर्यवेक्षक मनोज ढाले हरिष राठी परिक्षा प्रमुख प्रिया धारपुरे, सुनिल सोलव, यांचे उपस्थिती होती.

प्रसिद्ध सितार वादक -विदुर महाजन पुणे, अद्वित देशपांडे वर्धा व त्यांच्या सहकाऱ्यांनी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय व सीबीएसई हायस्कूल चे हजारों विद्यार्थ्यांसमक्ष सीतार वादानातून संगीता विषयी महत्वाची माहिती सादर केली. याप्रसंगी सीतारवादनाला हजारो विद्यार्थ्यांनीटाळ्यांच्या कडकडाटात उत्तम साद दिली. सीतार वादक- विदुर महाजन व त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पालकत्व दुर्गाप्रसादजी पांडे यांनी अभियांनाची मार्गदर्शनात प्रसंशा केली. आयोजनास यशोदा नासरेसहकार्य लाभले कार्यक्रमांचे संचलन पर्यवेक्षक हरिष राठी तर आभार प्रा.वादाफळे यांनी मानले. आयोजनास सामाजिक उत्सव समिती प्रमुख यशोदा नासरे, ध्वनीक्षेपण शुभम राऊत, रवींद्र जायभाये आदिंची उपस्थिती होती.

# घराला आग लागून २० हजाराची मालमत्ता खाक

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ३० :

मोवाड शहरातील वॉर्ड क्र. १ येथे राहणारे तोताराम नथुजी बालपांडे याच्या घरी दि.३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११:३० च्या दरम्यान अचानक आग लागली माहिती मिळतात पुण्यनगरीचे मोवाड प्रतिनिधी राजेंद्र बागडे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

बालपाडे हे शेतात गेले होते. घरची परिस्थिती अतिशय बिकट असल्यामुळे चुलीवर नेहमी स्वयंपाक करायचे अशातच स्वयंपाक झाल्यावर पूर्णपणे विस्तव विजवण्यात आला नव्हता आणि घरचे सगळे लोक शेतात गेले होते. त्यामुळे चुलीत विस्तव वाढत गेल्याने आजूबाजूला आग वाढण्याचे साहित्य होते.

त्यामुळे आग मोठ्या प्रमाणात



लागली घरातील सर्वत्र सामान जळून खाक झाले. नगरपरिषद प्रशासनाने याची दखल घेत अग्निशामक गाडीने आग विझविण्यात आली. यामध्ये जीवित हानी कोणतीही झाली नसून मात्र घरातील संपूर्ण सामान जळून अंदाजित २० हजाराचे नुकसान झाले असल्याची माहिती आहे. नुकसानीची संपूर्ण माहिती पटवारी यांना सादर करण्यात आली व नुकसान भरपाई तात्काळ मिळण्यात यावी अशी मागणी पीडित तोताराम बालपांडे यांनी शासनाला केली.

## डॉ.हरिवंशराय बच्चन यांना भावपूर्ण श्रद्धांजली



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३० :

साई इंटरनॅशनल स्कूल, शितलवाडी, रामटेकचे विद्यार्थी आणि कर्मचारी सदस्यांनी प्रख्यात कवी डॉ. हरिवंशराय बच्चन यांची जयंती साजरी केली आणि त्यांच्या प्रसिद्ध कवितांचे पठण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. विद्यार्थ्यांनी भाषणे दिली आणि हिंदी साहित्याच्या विकासात दिग्गज कवींच्या योगदानावर प्रकाश टाकला.त्यांनी कविता.. अग्निपथ.. अग्निपथ.. अग्निपथ वाचली. प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी दिग्गज कवी डॉ.हरिवंशराय बच्चन यांच्या महान योगदानावर प्रकाश टाकला आणि त्यांच्या कवितेचे विशेषतः "मधुशाला"चे महत्त्व थोडक्यात सांगितले. शाळेचे संचालक डॉ. विठ्ठलराव नागपूरे यांनी शाळेच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि सर्व सहभागींना शुभेच्छा दिल्या.

# गुडघ्यातील वंगण संपतेय, गुडघेदुखीने नागरिक बेजार..

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. ३० :

वाढते वजन, व्यायाम, आहारात सकसतेचा अभाव आदी कारणांमुळे ज्येष्ठांसह तरुणांमध्येही गुडघेदुखीचे प्रमाण वाढले आहे. अनेकांच्या गुडघ्याच्या सांध्याची झीज झाल्यामुळे हा त्रास होतो.

सांधा म्हणजे गुडघा हासुद्धा तीन हाडे, गुडघ्यांची वाटी आणि संधीबंधांनी तयार होतो. प्रामुख्याने गुडघ्याचा वापर अधिक प्रमाणात केला जातो. मांडी घालून बसणे, पाय दुमडून बसणे आदी अनेक क्रियांमुळे गुडघ्यांच्या हालचाली अधिक होऊन तेथील हाडे झिजणे, तेथील वंगण कमी होणे किंवा अतिउष्णतेमुळे गुडघ्याला सूज येते. त्यामुळे गुडघ्याची समस्या सुरू होते. संधिवातामुळे सांध्यातील वेदना सुरू होतात. हाडांची झीज झाल्यामुळे गुडघेदुखीही निर्माण होते, असे अस्थिरोग तज्ज्ञांनी प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

सांध्यांमधून वेगवेगळ्या प्रकारचे आवाज येणे सामान्य वाटत असले, तरी सामान्य समस्या मानून त्याकडे दुर्लक्ष करू नये. सांध्यांमधून अनेक प्रकारचे आवाज येतात. या आवाजाचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे असे आवाज जे सामान्य आहेत, परंतु त्यामध्ये वेदना होत नाहीत.

साधारणपणे, सांध्याच्या आत एक द्रव पदार्थ असतो, ज्याला आपण सायनोव्हीयल फ्लुइड म्हणतो आणि त्यात गॅस असतो. दुसरा प्रकार आहे ज्यात कट-कट आवाज होतो आणि हाडांमध्ये वेदना होऊन सूज येते.

आवाजासोबत वेदना होत असतील आणि सांध्याच्या भागात सूज येत असेल, लालसरपणा दिसत असेल तर ही चिंतेची बाब आहे. तरुणपणात अशा प्रकारच्या आवाजासोबत वेदना आणि सूज येत असेल तर औषधोपचार करणे आवश्यक आहे.

### अस्थिरोग तज्ञ म्हणतात...



स्थूलपणा, अतिरिक्त वजन, कॅल्शियमची कमतरता यामुळे गुडघेदुखीची समस्या जाणवते, तर काहींच्या हाडांची झीज होऊन गुडघ्यातील वंगण कमी होत असल्याने दुखणे वाढते. यातील बऱ्याच रुग्णांना शस्त्रक्रिया करावी लागते. भविष्यातील हा धोका टाळण्यासाठी नियमित व्यायाम करावा, कॅल्शिअमयुक्त आहाराचा समावेश करावा. तसेच, सतत गुडघे दुखत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष न करता अस्थिरोग तज्ज्ञांना दाखवून उपचार करावा.

**डॉ. आशिष सावरकर, अस्थिरोग तज्ञ**

# महात्मा फुलेंचे जिवन प्रेरणादायी : ॲड.सुलेखा कुंभारे



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ३० :

महात्मा जोतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तसेच महिला शिक्षणाला प्राधान्य देवुन महिलांना शिक्षित करण्याचे महान कार्य केले. महिला व मुलींना शिक्षण देण्यासाठी पुण्यात १७४८ साली शाळा काढली. स्त्री शिक्षणाचा पाया मोकळा केला.

यामुळेच आजच्या स्त्रिया इंजिनियर, डॉक्टर, आयएएस सारख्या उंच पदावर आहेत. त्याचप्रमाणे पंतप्रधान राष्ट्रपती झाल्यात. यांचे खरे श्रेय महात्मा जोतीबा फुले यांना जाते असे विचार बरिएमच्या नेत्या व माजी राज्य मंत्री अँड सुलेखा कुंभारे यांनी महात्मा जोतिबा फुले यांना अभिवादन करतांना व्यक्त केले. महात्मा जोतिबा फुले स्मृती दिवसावर हरदास शैक्षणिक व सांस्कृतीक संस्थेच्या कार्यक्रमात बोलत होत्या. मुख्याध्यापक देवेंद्र जगताप प्रस्तावना तर संचालन दिलीप बोबडे यांनी केले. याप्रसंगी विनोद जुमडे, संजय सुके, प्रफुल वासे, विशाखा पाटील, निशा कापसे, वैशाली अढाऊ, विजय अलोने, अजमल अंसारी सहित अनेकांनी कार्यक्रमात भाग घेतला.

## ज्योतिबा फुले यांना भावपूर्ण श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३० :

साई इंटरनॅशनल स्कूल, शितलवाडी, रामटेकचे विद्यार्थी आणि कर्मचारी सदस्यांनी दिग्गज राजकारणी आणि समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.



विद्यार्थ्यांनी भाषणे करून महात्मा ज्योतिबा फुले यांचे महत्त्व विषद केले. त्यांनीही शाळेला आपले विचार मांडले. मुख्याध्यापक राजेंद्र मिश्रा यांनी शाळेच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि सर्व सहभागींना शुभेच्छा दिल्या.

## संविधान प्रास्ताविक फलकाचे अनावरण

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :

दवलामेटी येथील बौद्ध उपासक संघाच्या वतीने सम्राट अशोक बुद्ध विहारात भारतीय संविधान दिवस निमीत्य भारतीय बौद्ध महासभेचे ग्रामीण प्रवक्ते डी.डी.गजभिये यांच्या हस्ते संविधान प्रास्तविक फलकाचे अनावरण करून सामूहिक वाचन करण्यात आले. सर्वप्रथम अध्यक्ष मनीष वाहने यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



पुतळ्यास माल्यार्पण करून बुद्ध वंदना घेण्यात आली. संचालन सचिव प्रणय पाटील यांनी तर आभार आरती मेश्राम यांनी मानले. आयोजनासाठी रत्नाकुमार रंगारी, शीतल वासनिक, कांचनमाला पाझारे, तनुजा गजभिये, प्रभा थोरात आदींनी सहकार्य केले.

# रामटेक ते बेलदा व टांगला बस फेरी सालई पर्यत वळविण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. ३० :

दि.२८ नोव्हेंबर २०२४ ला रामटेक येथील मुख्य आगार प्रमुख यांना रामटेक ते बेलदा व टांगला बसेस हिवरा बाजार वरून सालई पर्यंत वाढविण्याबाबद निवेदन देण्यात आले. सालई येथील अनेक विद्यार्थी रामटेक येथे शिक्षणा करिता जात असून सध्या रामटेक ते हिवरा बाजार या रस्त्याचे काम चालू असल्यामुळे या मार्गाने बसेस बंद झाल्या आहेत.



परंतू आता सालई येथील विद्यार्थी सालई वरून हिवरा बाजार २ की.मी हे पायदळ प्रवास करून बसनी प्रवास करतात, करिता सायंकाळी अनेक विद्यार्थी यांना घरी यायला अंधार होत असून त्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. करिता हिवरा बाजार वरू पुढे सालई पर्यंत सर्व बसेसची बस सेवा सुरू करावे. या आशयाचे निवेदन दि.२८ नोव्हेंबरला आगार प्रमुख रामटेक यांना निवेदन देण्यात आले. यावेळेस सालईचे सरपंच उत्तम धराडे तथा कुषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक कृष्णा भाल तसेच पंकज कोकोडे व विद्यार्थी उपस्थित होते.

## सोनेगाव जि.प. शाळेत बालविवाह प्रतिबंधात्मक शपथ



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी , दि. २९ :

सोनेगाव ( निपाणी ) जि.. प. उच्च प्राथमिक शाळेत महात्मा ज्योतीबा फुले यांची १३४ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

सर्व प्रथम शिक्षक दीपचंद पेंडकांडे यांनी प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण व महात्मा फुले यांच्या कार्याबद्दल माहिती दिली.तसेच बालविवाह करण्याबाबदचे परिणाम स्पष्ट करण्यात आले.

बालविवाह प्रतिबंधात्मक शपथ घेण्यात आली. संचालन विनया धात्रक यांनी तर आभार शिक्षिका सुजाता भानसे यांनी केले. यावेळी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# सावनेर येथे संविधान दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
सावनेर , दि. २९ :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 26 डिसेंबर रोजी देशाला राज्य घटना बाहल केली त्या दिनानिमित्त युवक जागृती मंडळ व सुधाकर बागडे मित्र परिवाराच्या वतीने बसस्थानक जवळील डॉ. आंबेडकर यांच्या पूणार्कृती येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून मानवंदना व सामूहिक बुद्धवंदना घेण्यात येवुन संविधान उद्देशीकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी भाजप नेते रामराव मोवाडे, माजी नगराध्यक्ष अध्यक्ष अरविंद लोधी, सभापती बाबाराव पाटील, सुधाकर बागडे, मनीष अडागडे, ॲड. युवराज बागडे, राज पाटील, खुपीया प्रमुख सुनील तलमले,



एपीआय विजय मुसनवार प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रास्ताविक युवक जागृती मंडळाचे सचिव विक्की शेंडे यांनी, तर संचालन स्तुप बागडे यांनी केले. आभार उद्देश बागडे यांनी मानले. सोनू गव्हाणे, धनंजय बागडे, होमेश्वर डोंगरे, राजेश बडखाने, लकी पाटील सागर मेश्राम आदींनी सहकार्य केले.

**जाहिरनामा**

कार्यकारी दंडाधिकारी मौदा यांचे न्यायालय, मौदा
Phone No-07115-281128
Mail Id: tahesilofficemoud@gmail.com
क्र. प्रस्तु-१/तह-मौदा/कावि ६८१/२०२४
दिनांक - २८/११/२०२४

वाचा - १) जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३, २) जन्म मत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा-२०२३ (२०२३ चा २०) च्या खंड -१ आणि उपखंड -२, ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११.०८.२०२३ रोजीचे राजपत्र, ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचेकडील सुधारीत आदेश क्र. अका/डि-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१५८/२०२३ आदेश पारीत दिनांक ११.०५.२०२४ अन्वये, ५) पुरुषोतम कारुजी मेश्राम रा. सुकळी ता. मौदा जि. नागपूर

ज्याअर्थी, अर्जदार श्री. पुरुषोत्तम कारुजी मेश्राम रा.सुकळी ता. मौदा जि. नागपुर अर्जदार यांच्या जन्माची नोंद करण्याबाबत यांनी ग्रा. पंचायत झुलुर कार्यालयात दप्तरी घेण्याकरीता निर्देशित करणेकामी अर्ज सादर केला आहे.

सदरहु अर्जदार यांचे जन्म दिनांक ०१/०१/१९७६ ला मौज सुकळी येथे झाला असे अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहु अर्जदार यांचे जन्म प्रमाणपत्र शासकिय तथा खाजगी कामाकरीता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जा मध्ये नमुद केले आहे.

त्याअथी, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, मौदा उपरोक्त वाचा क्र.१ आणि २ नुसार व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारांनी असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देण्याकरीता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावीत आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारासह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, मौदा यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीलामार्फत अुवा अन्य मार्गाने या जाहिरनाम्याच्या दि. २८/११/२०२४ पासुन २१ दिवसाचे आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप /उजर / विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्मनोंदीबाबतचा आदेश निर्गमीत करण्यात येईल.

स्वा/-
कार्यकारी दंडाधिकारी,
मौदा

**जाहिरनामा**

कार्यकारी दंडाधिकारी मौदा यांचे न्यायालय, मौदा
Phone No-07115-281128
Mail Id: tahesilofficemoud@gmail.com
क्र. प्रस्तु-१/तह-मौदा/कावि ७०३/२०२४
दिनांक - २८/११/२०२४

वाचा - १) जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३, २) जन्म मत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा-२०२३ (२०२३ चा २०) च्या खंड -१ आणि उपखंड -२, ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११.०८.२०२३ रोजीचे राजपत्र, ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचेकडील सुधारीत आदेश क्र. अका/डि-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१५८/२०२३ आदेश पारीत दिनांक ११.०५.२०२४ अन्वये, ५) रामचंद्र किसन मेश्राम रा.सुकळी ता.मौदा जि. नागपूर

ज्याअर्थी, अर्जदार श्री. रामचंद्र किसन मेश्राम रा.सुकळी ता. मौदा ता.नागपुर अर्जदार यांच्या जन्माची नोंद करण्याबाबत यांनी ग्रा.पंचायत झुलुर कार्यालयात दप्तरी घेण्याकरीता निर्देशित करणेकामी अर्ज सादर केला आहे.

सदरहू अर्जदार यांचे जन्म दिनांक ०१/०१/१९७६ ला मौजा सुकळी येथे झाला असे अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहु अर्जदार यांचे जन्म प्रमाणपत्र शासकिय तथा खाजगी कामाकरीता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जा मध्ये नमुद केले आहे.

त्याअथी, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, मौदा उपरोक्त वाचा क्र.१ आणि २ नुसार व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारांनी असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देण्याकरीता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावीत आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारासह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, मौदा यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीलामार्फत अुवा अन्य मार्गाने या जाहिरनाम्याच्या दि. २८/११/२०२४ पासुन २१ दिवसाचे आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप /उजर / विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित जन्मनोंदीबाबतचा आदेश निर्गमीत करण्यात येईल.

स्वा/-
कार्यकारी दंडाधिकारी,
मौदा

# बुद्धिमत्ता जीवनाच्या सर्व क्षेत्रात फलदायी असते : डॉ.विजय चांडक

■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. ३० :

बुद्धिमत्ता हा मानवी जीवनातील महत्त्वाचा खेळ आहे. बुद्धिमत्तेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य आहे, बुद्धिमत्तेचा जीवनातील सर्व परीक्षांमध्ये फायदा होतो, असे मत डॉ.विजय चांडक यांनी व्यक्त केले.

दिवंगत के.के. ऑर्किड पब्लिक स्कूल सभागृह, काटोल येथे शनिवार 30 नोव्हेंबर रोजी दिवंगत के.के.चांडक स्मृती बुद्धिबल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते विजेत्या स्पर्धकांना बक्षिस वितरण समारंभात अध्यक्ष स्थानावरून संबोधित करत होते.



डॉ. राजू कलवीट यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. शिक्षण प्रसारक मंडळ काटोलचे कोषाध्यक्ष प्रकाश चांडक, प्राचार्य डॉ.सुरेश मोटवानी, प्राचार्य डॉ.सुजाता गांधी, प्रा.परेश देशमुख, सुनील खोब्रागडे होते. डॉ. राजू कलवीट म्हणाले, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी सर्व शाळांमध्ये बौद्धिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे, त्यामुळे मुलांची आयक्यू पातळी वाढण्यास मदत होते. बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष निरंजन राऊत यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद सदस्य समीर उमप यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे कोषाध्यक्ष प्रकाश चांडक, संचालक योगेश

## दिवंगत के.के. चांडक यांच्या स्मरणार्थ बुद्धिमत्ता स्पर्धा

पांडे, संदीप सरोदे, प्राचार्य डॉ.सुनीलकुमार नवीन, प्राचार्य डॉ.सुरेश मोटवानी, दिलीप चांडक होते. बुध्दीमत्ता स्पर्धेत यशस्वी विदयार्थ्यांमध्ये ऑर्किड पब्लिक स्कूल काटोलचा स्वंयम विवेक भुतडा, बनारसीदास रुईया कॉन्व्हेंट काटोलचा आशय सुनील खोब्रागडे, प्रतिभा स्थळी स्कूल रामटेकच्या पूर्वा शशिकांत पाटील, प्रियदर्शनी विद्यालय नागपूर, अर्णव देवघडे, ऑर्किड स्कूल काटोलच्या जान्हवी चरडे व नागपूर जिल्ह्यातील इतर यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ.राजू काळविट यांच्या हस्ते पदक, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.सुजाता गांधी यांनी केले, कार्यक्रमाचे संचालन स्नेहल काकडे यांनी केले, अरुणा रामधम यांनी आभार व्यक्त केले. यशस्वीतेसाठी प्रणय सहारे, सोपान खुरपुडे, सुवर्णा उपासे, श्वेता पांडे, अंकुश मुळे, मिलिंद चौधरी, दुर्वास कडू, श्रीकांत भांगे, प्रतीक शेंबेकर, सुजाता रेवतकर यांनी सहकार्य केले.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# भक्तिमार्ग

**मर्दानी आणि रांगड्या महाराष्ट्राचा देवही तसाच असायला हवा. मल्हारी म्हाळसाकांतांचं रूप बघितलं की याची प्रचिती येते. अवघ्या महाराष्ट्राचं कुलदैवत असणाऱ्या खंडेरायाचा षड:रात्रौत्सव सुरू होत आहे. चंपाषष्ठीपर्यंत हा उत्सव सुरू राहील. या मंगलपर्वात श्रीक्षेत्र जेजुरीप्रमाणेच घरोघरी खंडोबाच्या नावाचा गजर ऐकू येईल. घरोघरी घट बसले आहेत. ही घटस्थापना आनंद, चैतन्य आणि स्फुर्ती देणारी आहे. मनात भक्तीचा जागर चेतवणारी आहे.**

## जय मल्हार...



अवघ्या महाराष्ट्राचं आराध्य दैवत आणि अनेकांचे कुलदैवत असणाऱ्या मल्हारी म्हाळसाकांतांचं षड:रात्रौत्सव सुरु झाला आहे. घरोघरी मल्हारी म्हाळसाकांतांचे टाक तबकामध्ये विराजमान झाले आहेत. पुढचे सहा दिवस हा उत्सव सुरु राहील. दरवर्षीच चंपाषष्ठीचा उत्सव मोठ्या आनंद आणि भक्तीभावाने साजरा होतो. मार्गशीर्ष महिन्यातला हा उत्सव घरामध्ये चैतन्य आणि मांगल्य देणारा असतो. पुराणातील कथेनुसार या उत्सवासंबंधीची कथा अशी की उन्मत्त मणीसूर आणि मल्हासूर या दैत्यांचा संहार करण्यासाठी मार्तंड भैरव अवतार धारण केला. या अवतारात त्यांनी या दोन दैत्यांना युद्धासाठी आव्हान दिलं. देवाच्या या विजयासाठी सप्तऋषींनी प्रतिष्ठान स्थापलं आणि प्रत्येक विजयासरशी एक एक विजयमाला चढू लागली. घनघोर युद्धानंतर सहाव्या दिवशी मार्तंड भैरवाने या दैत्यांवर विजय मिळवला आणि विजयप्राप्तीनंतर सप्तऋषींनी प्रतिष्ठान विसर्जित केलं. आजही चंपाषष्ठीच्या निमित्ताने प्रतिकात्मक पद्धतीने हा विजयोत्सव साजरा केला जातो. या मंगलपर्वात घरात, देवळांमध्ये, मठांमध्ये बऱ्याच पूजा पार पडतात. घरोघरी कुलाचार पार पाडतात. घराण्यातील परंपरेनुसार हे पूजाविधी संपन्न होतात. पंचामृत अभिषेक, भंडारपूजा, दहीभात पूजा, वस्त्रालंकार पूजा, पुष्पपूजा, तेलवण, जागरण, गोंधळ, नैवेद्य आणि अन्नदान आदी नानाविध पद्धतींनी यथाशक्ती पूजा संपन्न होते. मार्तंड भैरवाने दुष्ट शक्तींचा नि:पात करून सुखसमाधान आणलं. अगदी त्याचप्रमाणे आपल्या आयुष्यातील दुष्ट शक्तींचा पराभव व्हावा, अडथळे दूर व्हावेत, समाधान लाभावं आणि सुख अनुभवायला मिळावं या हेतूने घरोघरी सहा दिवसांचा हा उत्सव साजरा केला जातो. खरं पाहता या उत्सवासाठी घरातील सर्व सदस्यांनी एकत्र येणं अपेक्षित असतं. मोठ्या घरी, घराण्यातील मूळ देव असतील तिथं सर्वांनी एकत्र येऊन हा उत्सव साजरा करावा. पण शक्य नसेल तर प्रत्येकाने आपापल्या घरी उत्सव साजरा केला तरी हरकत नाही. विधीवत घटस्थापना करून नैवेद्य आरती झाल्यानंतर या उत्सवाला प्रारंभ होतो. त्यानंतर चंपाषष्ठीपर्यंत दररोज खंडोबाची प्रार्थना करावी.

या मंगलमय पर्वात खंडोबाच्या आराधनेचं विशेष महत्त्व आहे. म्हणूनच पूजा–अर्चनेत खंड पडू देऊ नये. दररोज सकाळी देवांची पूजा करावी. सुवासिक फुलं अर्पण करावीत. गोडाचा नैवेद्य दाखवावा. बऱ्याच घरांमध्ये ज्येष्ठ सदस्य सहा दिवस उपवास करतात. साहजिकच देवालाही उपवासाच्या पदार्थांचा नैवेद्य दाखवला जातो. ताजी फळं, दूधसाखर आदी नैवेद्यही दाखवला जातो. या दिवसात दररोज फुलांची माळ घटावर लावली जाते. माळ कोणत्या फुलांची असावी याबाबत कठोर नियम नाहीत. उपलब्ध असतील ती ताजी टवटवीत फुलं माळेत गुंफावीत आणि ही माळ घटावर लावावी. आदल्या दिवशीची माळ काढू नये. चंपाषष्ठीच्या दिवशी घट विसिर्जत करताना या सहा माळा काढाव्यात. या संपूर्ण उत्सवकाळात नित्य पूजाअर्चेबरोबरच मल्हारी महात्म्य, मार्तंड विजयग्रंथ यांचं पारायण विशेष शुभसूचक समजलं जातं. त्याचप्रमाणे खंडोबाचं नामस्मरण केल्यासही चित्तवृत्ती शुद्ध होतात.

घरोघरी उत्सवाचा आनंद असताना श्री क्षेत्र जेजुरी येथे अनोखा उत्साह पहायला मिळतो. एरवीदेखील वर्षभर या तीर्थक्षेत्री भाविकांची मोठी वर्दळ असते. लग्नसराईच्या दिवसात तर नवदांपत्य सर्वप्रथम मल्हारी म्हाळसाकांताचं दर्शन घेऊनच संसाराची सुरवात करतात. वर आपल्या नववधूला उचलून घेत गडाच्या पाच तरी पायऱ्या चढतो. त्यांच्याबरोबर जवळचे नातलगही देवदर्शनासाठी येतात. देवाचे आशीर्वाद घेतल्यानंतर जागरण, गोंधळ हे विधी पार पडतात. यामध्ये स्तुतीपर काव्यांवर, गीतांवर पाय आपोआप थिरकतात. अस्सल ग्रामीण बाज असणारं, लोकसंगीतात गुंफलेलं हे भक्तीकाव्य चैतन्यदायी असतं. या धांदलीतच चंपाषष्ठीनिमित्त गडावर येणाऱ्या भाविकांची संख्याही खूप मोठी असते. एकंदरच या दिवसात जेजुरीचा गड भक्तगणांच्या उपस्थितीने फुलून येतो. उपस्थित भाविक मार्तंड भैरवावर भंडाऱ्याची उधळण करतात. 'सदानंदाचा येळकोट' असा गजर करत तळी उचलली जाते. हळदीच्या सोनवर्णात खोबऱ्याचे पांढरे तुकडे मिसळून नैवेद्य वाटला जातो. एक प्रकारे या दिवसात अवघी जेजुरी भंडाऱ्यात न्हाऊन निघते.



चंपाषष्ठी हा एक महत्त्वाचा कुळाचार आहे. खंडोबा हे कुलदैवत असणाऱ्या प्रत्येक घरात हा कुळाचार संपन्न व्हावा. चंपाषष्ठीच्या दिवशी सहा दिवसाच्या उत्सवाची समाप्ती असते. त्या दिवशी प्रात:काळी सुस्नात होऊन पूजा करावी. देवघरातील सर्व देवतांच्या मूर्ती, टाक यांच्यावर पंचामृताचा अभिषेक करावा. दूध, दही, तूप, मध आणि साखर आदी घटकांनी अभिषेक संपन्न झाल्यावर षोडशोपचारे पूजा करावी. या दिवशी खंडेरायाला चाफ्याची फुले अर्पण केली जातात. देवासमोर दिवटी प्रज्वलित करावी आणि दिवटी, बुधली हातात घेऊन देवाला ओवाळावं. या दिवसापर्यंत नंदादीप अखंड तेवत रहायला हवा. त्यानंतर पुरणा–वरणाचा नैवेद्य दाखवावा. एरवीच्या नैवेद्याच्या ताटात सहसा वांग्याचा वापर होत नाही. मात्र चंपाषष्ठीला वांग्याची भाजी, भरीत आणि रोडग्याचा नैवेद्य दाखवतात. रोडगा म्हणजे बाजरीची भाकरी. या दिवशी भरीत आणि रोडग्याचं महत्त्व जास्त आहे. देवाला हा नैवेद्य दाखवावाच पण त्याबरोबर घोडा, कुत्रा आणि गाय यांना घास द्यावा. घरातील पुरुषांनी मोकळ्या जागी येत तळी भंडार करावा. मल्हारी म्हाळसाकांताचा जयजयकार करत उचलली जाणारी तळी ही प्रतिकात्मक रुपात विजयाचा आनंद साजरा करण्याची पद्धत आहे. पितळी कासवावर, देवळामध्ये किंवा मोकळ्या जागेत हा विधी संपन्न केला जातो. देवाच्या चरणी लीन व्हावं, सगळी दु:खं उधळून द्यावीत आणि आनंद पदरी पडावा हाच यामागचा उद्देश आहे. तळी उचलताना सर्व पुरुष तबकाला हात लावतात. त्यानंतर खंडोबाच्या नावाचा गजर करत तबक उचललं जातं. खाली ठेवल्यावर खोबऱ्याच्या वाटीचे तुकडे केले जातात. प्रत्येक वेळी तबक उचलल्यावर खोबऱ्याचे तुकडे होत राहतात. पूर्वी हा विधी सोन्याच्या मोहरांनिशी संपन्न होत असे. सोनमोहोरा उधळल्या जात असत. मात्र कालौघात मोहरांची जागा खोबऱ्यानं घेतली आणि विधी संपन्न होऊ लागला. सरतेशेवटी प्रत्येकाने भंडारा कपाळाला लावून घ्यावा आणि देवाची प्रार्थना करावी.

प्रासंगिक

वर्षभरामध्ये पार पडणाऱ्या अशा कुळाचारांचं आज महत्त्व काय असा प्रश्न अनेकांना पडू शकतो. मात्र असे कुळाचार केल्याने देवकार्य केल्याचं समाधान मिळतं. या निमित्ताने क्षणिक का होईना, देवापाशी बसण्याची, शांतता अनुभवण्याची संधी मिळते. या निमित्ताने कुटुंबातील विखुरलेले सर्वजण एकत्र येतात. याचं महत्त्व थोडं आहे असं वाटतं का? सध्याच्या धावपळीच्या युगात गरज असूनही कोणाला निवांतपणा अनुभवता येत नाही. श्रद्ध असो अथवा नसो, पूजा–अर्चनेने शांतता मिळते हे कोणीही नाकारणार नाही. कारण मूर्तीपूजा असते तशीच मानसपूजाही असते. एखाद्याला हे कुळाचार पाळणं शक्य नसेल तर त्याने मानसपूजा केली तरी हरकत नाही. या निमित्ताने सद्‌विचारांची उजळणी करणं, विवेक जागृत करणं, मेडिटेशन साधलं तरी खूप काही मिळवलं असं म्हणता येईल. त्यासाठी कर्मकांडं करायलाच हवीत असं नाही. शेवटी हे सगळे उत्सव आयुष्यात आनंद निर्माण करण्यासाठी योजले आहेत. चंपाषष्ठीच्या नैवेद्यातही हा अर्थ सापडतो. शेतात बाजरी तयार झालेली असताना ताज्या भाकरीचा पहिला घास देवाला अर्पण करावा हा किती सुंदर विचार आहे त्यामागे... शिवाय हिवाळ्याचा विचार करता शरीराला उष्णता देणारी बाजरी आरोग्यवर्धकही आहे. म्हणूनच कदाचित चंपाषष्ठीपासून भोगीपर्यंत बाजरीच्या भाकरीचं महत्त्व टिकून रहात असावं. हे सगळे सण म्हणजे आयुष्यातील आनंददायी वळणं आहेत. या वळणांवर क्षणभर तरी थांबावं. त्यातून मिळणारा आनंद पुढच्या प्रवासाचा उत्साह वाढवेल यात शंका नाही.

## इथे होते मुस्लिम महिलेची पूजा




भारत देश विविधतेने नटला आहे. विविध धर्मांचे लोक इथे गुण्या–गोविंदाने रहात आहेत. हिंदूधर्मीय एखाद्या दर्ग्यात भक्तीभावाने नतमस्तक होतात तर मुस्लीमधर्मीयही गणपतीची आराधना करताना दिसतात. हिंदू–मुस्लीम एकता अनेक ठिकाणी नांदताना दिसते. गुजरातमधल्या एका गावातलं मंदिर याच एकतेचं उदाहरण म्हणता येईल. अहमदाबादपासून ४० किलोमीटर अंतरावर झूलासन नावाचं एक गाव आहे. या गावात हे अनोखं मंदिर वसलंय. या मंदिरात एका मुस्लीम महिलेची देवीस्वरूपात पूजा केली जाते. डोला नावाच्या मुस्लीम महिलेची या ठिकाणी पूजा होते. यामागे एक कथा सांगितली जाते. सुमारे २५० वर्षांपूर्वी या गावावर काही लोकांनी हल्ला केला. त्यावेळी डोला नावाच्या महिलेने हल्लेखोरांचा प्रतिकार करून गावाचं रक्षण केलं. डोला शहीद झाली. डोलाच्या मृत शरीराचं रूपांतर एका फुलात झालं, असं मानलं जातं. डोलाच्या स्मृतीप्रीत्यर्थ आणि तिच्या बलिदानाचं प्रतिक म्हणून गावकऱ्यांनी डोलाचं मंदिर बांधलं आणि तिची पूजा केली जाऊ लागली. लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे मंदिरात डोलाची मूर्ती ठेवण्यात आलेली नाही. एका रंगीत कापडाने झाकलेला एक दगड ठेवण्यात आलाय. डोला माता मानून या दगडाची पूजा केली जाते. डोलाचं हे मंदिर भव्य–दिव्य आहे. तब्बल चार कोटी रूपये खर्चून ते उभारण्यात आलंय. हे मंदिर वास्तुकलेचा उत्तम नमुना ठरावं. मंदिराचं कोरीव काम इथे येणाऱ्या भाविकांच्या कौतुकाचा विषय ठरतं. मुस्लीम महिलेची पूजा करणारं हे जगातलं एकमेव हिंदू मंदिर असावं.



तीर्थक्षेत्र

## का ठेवली जाते शेंडी?

**पूर्वीच्या काळी ब्राह्मण समाजातले पुरूष शेंडी ठेवत असत. मंदिरांमध्ये पूजा–अर्चना करणारे अनेक ब्राह्मण आजही शेंडी ठेवतात. उत्तर भारतातही शेंडी ठेवण्याची ही परंपरा पहायला मिळते. यामागे धार्मिक कारणं आहेतच शिवाय वैज्ञानिक कारणंही आहेत. या कारणांविषयी जाणून घेऊ...**



शेंडी ठेवल्याने मन:शांती टिकून राहते. मनाची चंचलता कमी होते आणि भक्ताचं मन परमेश्वराच्या चरणी एकाग्र होतं.

✽ शेंडी ठेवली जात असलेल्या ठिकाणी सुषुम्ना नाडी असते. हे स्थान आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचं मानलं जातं.

✽ अंतराळात विद्युत आणि चुंबकीय लहरींचा वास असतो. या लहरी पृथ्वीपर्यंत अगदी सहज पोहोचतात. या लहरींपासून डोक्याच्या या भागाचं रक्षण करण्याचं काम शेंडी करते, असं म्हटलं जातं.

✽ वातावरणातली उष्णता आणि नकारात्मकतेला शेंडीमुळे अटकाव केला जातो. उष्णता डोक्यापर्यंत पोहोचू शकत नाही.

✽ डोक्यात सहस्रार चक्र असल्याचं मानलं जातं. या चक्रामुळे शरीर, मन आणि बुद्धीवर माणसाचं नियंत्रण राहतं.

✽ शेंडी बांधताना त्वचा ताणली जाऊन रक्तप्रवाह मेंदूपर्यंत अगदी सुरळीपणे पोहोचतो.

✽ मानवी शरीरात नऊ दारं असल्याचं म्हटलं जातं. योगशास्त्रात दहाव्या दाराचा उल्लेख आढळतो. याला दशमद्वार असंही म्हणतात. हे द्वार डोक्यापाशी असतं. शेंडीमुळे या दहाव्या द्वाराचं रक्षण होतं.

जाणून घ्या

## मंगळवाराविषयी...

आपल्याकडे प्रत्येक वार एखाद्या देवतेचा मानला जातो. एखाद्या वारी काही गोष्टी केल्याने विशेष लाभ मिळतात, असंही मानलं जातं. हिंदू धर्मात मंगळवार गणपती आणि देवीचा मानला जातो. काही ठिकाणी मंगळवारी हनुमानाची पूजा केली जाते. भारताप्रमाणे इतर देशांमध्येही वारांना महत्त्व दिलं जातं. यासाठी आपण मंगळवारचं उदाहरण घेऊया. मंगळवार आणि मंगळ ग्रहाचा जवळचा संबंध आहे. सौरमालेतल्या ग्रहांवरून वारांना नावं देण्यात आली आहेत. मंगळ ग्रहाच्या जन्मासंबंधीच्या अनेक कथा प्रचलित आहेत. हिंदू धर्मात मंगळवार पवित्र मानला जातो. तर तिकडे स्पेन आणि यूनानमध्ये मंगळवारी कोणतीही शुभ कार्यं केली जात नाहीत. या दोन्ही देशांमध्ये मंगळवार अशुभ मानला जातो तसंच या दिवशी प्रवासाचा प्रारंभ किंवा विवाह न करण्याची प्रथा या देशांमध्ये आहे. जपानमध्ये मंगळवार 'कायोबी' म्हणजे आगीचा दिवस मानला जातो. भारत आणि जपानच्या संस्कृतीत बरंच साम्य आढळतं. मंगळाचा रंग लाल असल्याने हा तापट किंवा उग्र ग्रह मानला जातो. मंगळाच्या या लाल म्हणजे अग्निसारख्या रंगामुळे जपानमध्ये मंगळवार अग्नीचा दिवस मानला गेला असावा. मंगळवाराचं महत्त्व इतर देशांमध्येही असल्याचं यावरून दिसतंय.



धर्मशास्त्रातून

## मुलांना वाढवताना...



आपल्या समाजात कुटुंबव्यवस्थेचं मोठं महत्त्व आहे. एकत्र कुटुंबपद्धती भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग मानली जाते. लग्नानंतर आपलं कुटुंब सुरू होतं. वैवाहिक जोडपं मुलाबाळांचा विचार करू लागतं. मुलांना जन्म देण्याआधी आपण आर्थिक, शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम आहोत का, याचा विचार जोडप्याने करायला हवा. जन्म दिल्यानंतर मुलांना घडवणं सर्वाधिक महत्त्वाचं असतं. लहान मूल मातीचा गोळा असतं. या गोळ्याला आकार देण्याची जबाबदारी आई–वडिल आणि कुटुंबियांची असते. आपलं मूल सुजाण नागरिक व्हावं, यासाठी आई–वडिलांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजेत. ही दोघांची जबाबदारी आहे. आपली मुलं सुसंस्कारी आणि सभ्य असली पाहिजेत. अतिलाड आणि सतत पाठीशी घातल्याने मुलं बिघडतात. यामुळे कुटुंबासोबतच समाजाचंही नुकसान होतं.

मुलांना सुख आणि सुविधा अवश्य द्याव्यात पण त्याचा अतिरेक नको. आपल्याकडे सगळं आहे. कष्ट करण्याची काहीही गरज नाही, अशी भावना त्यांच्या मनात रूजता कामा नये. आई–वडिल मुलांना सगळ्या सुविधा देण्यासाठी झटत असतात पण यामुळे मुलं परावलंबी होणार नाहीत ना, याचा विचार करायला हवा. मुलांना स्वत:चं भविष्य घडवण्याची संधी द्यायला हवी. यासाठी आपण महाभारताचं उदाहरण समोर ठेऊ. कौरव आणि पांडव हे दोघेही भाऊ पण त्यांच्या आचरणात खूप फरक होता. कौरव दुर्गुणी तर पांडव सद्‌गुणी आणि सत्यवादी होते. कौरव महालात, लाडात वाढले. त्यांना कायम पाठीशी घातलं गेलं. यामुळे ते उन्मत्त झाले. दुसरीकडे पांडवांना कुंतीने एकटीने वाढवलं. ते जंगलात वाढले. पण तिने आपल्या मुलांना संस्कार दिले. याच कारणाने पांडवांचा विजय झाला. मुलांना सुख आणि सुविधा जरूर द्या पण जबाबदारीची जाणीवही करून द्या. सुख–सुविधांचा उपभोग घेताना ती उन्मत्त होणार नाहीत याकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

## जपू या मन



वागणूक, आचार–विचार ही मनुष्याची खरी ओळख असते. माणसाकडे कितीही संपत्ती, सत्ता किंवा बुद्धीमत्ता असली तरी समाजात तो कसा वागतो, यावर अनेक गोष्टी ठरत असतात. एखादी श्रीमंत व्यक्ती साधेपणाने राहते तेव्हा तिचं खूप कौतुक होतं. प्रचंड बुद्धीमत्ता असलेल्या व्यक्तीच्या ठायी विनयशीलता, नम्रता हे गुण असतील तर ती गर्दीच्या ठिकाणी उठून दिसते. अहंकारी, मानी व्यक्तीपुढे हुजरेगिरी करणाऱ्यांची कमतरता नसते. पण तिच्या मदतीसाठी धावत जाणाऱ्यांची, हितचिंतकांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच असते. दुसरीकडे सदाचारी व्यक्तीच्या मदतीसाठी अनेकजण धावत येतात. अडचणीच्या काळात अशा व्यक्ती कधीही एकट्या पडत नाहीत. समाजात वावरताना इतरांशी वागण्याची, बोलण्याची पद्धत आपल्याबद्दलचं सकारात्मक किंवा नकारात्मक मन बनवण्यास पुरेशी असते. अहंकारी व्यक्तीचं तोंडावर कौतुक करणारी माणसं पाठीमागे निंदानालस्ती करतात. म्हणूनच आपली वाणी, आचार–विचार आणि वागणूक शुद्ध आणि साधी असली पाहिजे. बंदुकीतून सुटलेली गोळी आणि तोंडातून निघालेला शब्द कधीही मागे घेता येत नाही, असं म्हणतात. मनाला लागेल असं बोलल्याने नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो. आपण कळत–नकळत अनेक गोष्टी बोलून जातो. आपल्या बोलण्याने समोरच्याला किती वेदना होत असतील, याची कोणतीही जाणीव आपल्याला नसते. रागाच्या भरात किंवा इतर कोणत्याही कारणाने अपशब्द वापरल्याने मनात कायमची अढी निर्माण होते. नाती टिकवून ठेवण्यासाठी थोडं नमतं घेणं आणि जीभेवर नियंत्रण ठेवणं गरजेचं असतं. वागण्यातून आपले संस्कार दिसत असतात, शिक्षण दिसत असते. समाजात वावरताना आपण काही नियमांचं पालन करणं गरजेचं असतं. शिष्टाचार पाळावे लागतात.

भक्ती मार्ग

खरं बोलणं, गरजूंची मदत करणं, अपशब्द न वापरणं, मोठ्यांचा आदर करणं या बाबी आयुष्यात जास्त महत्त्वाच्या ठरतात. पैसा आणि प्रसिद्धी यांचा अहंकार कधीही करू नये. जीवनात या गोष्टी कधीही कायमस्वरूपी नसतात. आपलं इतरांप्रती असलेलं आचरण कायम आपल्यासोबत राहणार असल्याची बाब लक्षात घ्यायला हवी. त्यामुळे समाजात वावरताना नैतीक मूल्याचं पालन करत इतरांची मनं जपणं गरजेचं आहे.

## आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी...

**कुटुंबातल्या सदस्यांची सुरू असलेली आजारपणं, आर्थिक अडचणी यामागे वास्तुदोष असू शकतात. घराच्या मुख्यद्वारातून नकारात्मकता आत प्रवेश करते. घराच्या आसपासचं वातावरणही कुटुंबियांच्या जीवनावर प्रभाव टाकत असतं. मुख्य द्वारालगत असलेल्या काही वस्तूंमुळे असे दोष निर्माण होण्याची शक्यता असते. वास्तुदोषांच्या काही कारणांविषयी...**

घराच्या प्रवेशद्वारासमोर मंदिर असेल तर त्या ठिकाणी दैवी शक्ती वास करत नाहीत. याउलट रोगराई आणि दारिद्र्याचा वास राहतो.

✽ दारापुढे वृक्ष किंवा खांब असेल तर मुलांच्या आयुष्यात अडचणी येतात. घरापुढचं झाड किंवा खांब काढून टाकणं शक्य नसेल तर दारावर स्वस्तिक तसंच ओम अशी शुभचिन्हं काढा. यामुळे नकारात्मक ऊर्जा घरात प्रवेश करू शकणार नाही.

✽ दारापुढे रांगोळी काढल्याने, फुलं ठेवल्याने तसंच छोट्या घंटा लावल्याने घरात सकारात्मक ऊर्जा प्रवेश करते.

✽ घराच्या मुख्य दरवाज्यासमोर चप्पल, बूट काढून ठेवणं अशुभं मानलं जातं. तसंच दाराच्या मागच्या बाजूलाही काही अडकवून ठेवू नये.

✽ घरातला कचरा घराच्या ईशान्य कोपऱ्यात किंवा मुख्य दारापाशी ठेऊ नका.

वास्तु भक्ती

✽ घराच्या मुख्य प्रवेशद्वारालगत स्वच्छता ठेवायला हवी. यामुळे सकारात्मक ऊर्जा घरात मुक्तपणे प्रवेश करू शकेल. मुख्य दरवाजा आवाज करत असल्यास घरात भांडणं होण्याची शक्यता असते.



# मेंटेनन्सअभावी वाढले शिवशाहीचे अपघात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३०:

उपराजधानीतून विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, अमरावती अशा कोणत्याही मार्गावर जा, रस्त्यात एकना एक शिवशाही बस बिघडलेल्या अवस्थेत हमखास दिसेलच.

सूपरफास्ट, वातानुकुलित आणि आरामदायी प्रवास देणारी म्हणून प्रवाशांच्या पसंतीला उतरलेल्या एसटी महामंडळाच्या शिवशाही बसेसची अवस्था सद्यःस्थितीत अत्याधिक बिकट आहे. भंगार होवू लागलेल्या या बसेसचे कधी ब्रेकडाऊन होईल, ही बस कधी आगीच्या भक्ष्यस्थानी पडेल आणि कधी उलटेल याचा नेम नाही. या बसेसचे योग्यरित्या मेंटिनन्स केले जात नसल्याचे खुद्द एसटी महामंडळाचे कर्मचारीच सांगतात.

या बसेस वाईट अवस्थेत असतानाही महामंडळाकडून वातानुकुलितच्या नावाने सर्वाधिक प्रवासी भाडे आकारले जाते. गोंदिया जिल्ह्यात



शिवशाही बसला झालेल्या अपघातामुळे एसटी बसच्या वाईट अवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. राज्यात एसटी महांडळाच्या ताफ्यात साध्या, निमआराम, स्लिपर कोच, शिवशाही, ईलेक्ट्रिकसह सर्वप्रकारच्या सुमारे १५ हजार ६०० च्या जवळपास बसेस आहेत. त्यात ८९२ शिवशाही बसेसचा समावेश आहे.

एसटी महामंडळाच्या बसेसच्या अपघातांचे प्रमाण ०.१७ टक्के आहे. म्हणजे, सहा लाख किलोमीटरमागे एक अपघाताची नोंद आहे. यात शिवशाही बसच्या अपघातांचे प्रमाण ०.२९ टक्के आहे.

म्हणजे प्रत्येक ३ लाख ५० हजार किलोमीटरमागे १ अपघात नोंदवला जात आहे. त्यामुळे शिवशाही बसने प्रवास करणाऱ्यांचा जीव धोक्यात असल्याचा आरोप एसटीतील कामगार संघटनेकडून केला जात आहे.

करोना काळात प्रवासी सेवा बंद पडल्यानंतर एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती वाईट झाली. तेव्हापासून सातत्याने महामंडळात बसच्या सुट्या भागांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. दुसरीकडे महामंडळात गरजेच्या तुलनेत तांत्रिक कर्मचारी कमी आहेत. त्यामुळे इतर कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला आहे. याचा शिवशाही बसेसच्या देखभाल-दुरुस्तीवरही परिणाम होत आहे.

एसटी महामंडळाकडून बसेसचे सुटे भाग वेळेवर मिळत नाहीत. तांत्रिक विभागात अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे सेवेवरील कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असून बसेसच्या गुणवत्तेवरही परिणाम होत आहे. त्यामुळेच भंगारस्थितीतील शिवशाही बसेस चालवण्याची वेळ चालकांवर आली असून या बसेसचे अपघात वाढत असल्याचे अनेक चालकांनी सांगितले आहे.

## पुन्हा एका बसचा अपघात



नागपूरहून ते गोंदियाला जाणाऱ्या शिवशाही बसचा शुक्रवारी अपघातात झाला होता. त्यात ११ प्रवाशांचा मृत्यू आणि सुमारे २० प्रवासी जखमी झाले होते.

या घटनेची शाही वाळत नाही तोच गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यातून चिचगडकडे विद्यार्थ्यांना घेण्यासाठी जात असलेल्या साकोली आगाराच्या साकोली ते केशोरी जाणाऱ्या मानव विकासच्या निळ्या बसचा अपघात झाल्याची घटना शनिवारी सकाळी घडली. सुदैवाने ही बस रिकामी असल्यामुळे कुठलीही जीवित हानी झाली नाही.

बस सरळ रस्त्याचा कडेला खाली उतरली. वाहक मंजुषा लांजेवार आणी चालक हिवराज वासुदेव मडावी यांना देवरी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

# बडबोल्या मंत्र्यांना घरचा रस्ता?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

महाराष्ट्रातील सत्ताधारी आघाडी महायुतीला दोन तृतीयांश बहुमत आणि विक्रमी जागा मिळाल्यानंतर भाजपला मंत्रिमंडळातील खातेवाटपाचा नवा फॉर्म्युला आणायचा आहे. म्हणजेच महाराष्ट्राच्या शहरी आणि ग्रामीण भागावर थेट परिणाम करणारे विभाग कोणत्याही किंमतीत स्वतःकडे ठेवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करेल. तर आपल्या सहकारी पक्षांमधील देखील वाचाळ वीरांना मंत्रिमंडळातून दूर ठेवण्याचा नवा फॉर्मुला आणला आहे.

महाराष्ट्र विधानसभेत २८८ सदस्य असल्याने सरकारमध्ये जास्तीत जास्त ४३ मंत्री असू शकतात. त्यातच काही वाचाळवीर मंत्रांमुळे मागच्या सरकारला अडचणीत आणले होते. त्यातील पहिले नाव म्हणजे माजी आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत.राज्याचे आरोग्य मंत्री असलेले तानाजी सावंत यांच्या मुजोर बोलण्यामुळे शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या होत्या. तर कधी हाफकीनच्या विषयावर तर कधी आपल्याच कार्यालयातील वारंवार बदलत असलेल्या सचिव आणि सूर्य सहाय्यकांबाबत केलेल्या वक्तव्यांमुळे मंत्री महोदय नेहमीच अडचणी आले होते.

या क्रमवारीत दुसरे नाव म्हणजे अब्दुल सत्तार.लोकसभा निवडणुकीच्या निकालापासून भारतीय जनता पक्षातील नेत्यांवर आक्रमक शाब्दिक हल्ले करणारे मंत्री अब्दुल सत्तार यांनी जालन्याचे माजी खासदार रावसाहेब दानवे यांच्या पराभवानंतर भाजपवर हल्ला केला होता. हा हल्ला भाजपच्या जिव्हारी लागला आहे. त्यामुळे महायुतीमध्ये राहून अशा प्रकारची भाषा करणाऱ्या मंत्र्यांच्या विरोधात भाजप कडून कठोर भूमिका घेतली जात आहे.

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात यंग ब्रिगेड दिसण्याची शक्यता आहे. मात्र या नव्या मंत्रिमंडळात कुणाला लॉटरी लागणार हे काही दिवसातच पाहायला मिळणार आहे.

### आमदारांचा मुंबईत ठिय्या

राज्यात मुख्यमंत्री पदावरून तिढा निर्माण झाला असून, मुख्यमंत्री पद मिळण्याची शक्यता धूसर झाल्याने काळजीवाहू सीएम एकनाथ शिंदे गावाकडे गेले आहेत. तथापि, ५ डिसेंबर रोजी मंत्रीमंडळ स्थापन होणार असल्याचे बोलले जात असून, महायुतीचे आमदार मुंबईत ठिय्या मांडून बसले आहेत.

भाजपाच्या कोट्यातून मंत्रीपद मिळावे म्हणून विदर्भातील अनेक जुने आमदार निकालाच्या दुसऱ्या दिवसापासूनच मुंबईत डेरेदाखल आहेत . तिकडे शिवसेना शिंदे गटाकडून संभाव्य मंत्र्यांची यादी जाहीर झाली असून, रामटेकचे आमदार ॲड . आशिष जयस्वाल यांचे नाव आहे . मात्र, या गटाचे अन्य आमदारही लवाजमा घेवून मुंबईत मुक्कामी असल्याची माहिती आहे.

## वाघाच्या हल्ल्यात महिला ठार

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ३०:

सावली तालुक्यातील निलसनी पेडगाव गावानजीकच्या जंगलात दबा धरून बसलेल्या वाघाच्या हल्लयात रेखा मारोती येरमलवार (५५) ही महिला ठार झाली. ही घटना शनिवार, ३० नोव्हेबर रोजी सकाळी सात वाजता उघडकीस आली.



रेखा मारोती येरमलवार या शुक्रवारला सकाळी ११ वाजताच्या सुमारास झाडण्या कापण्यासाठी जंगलात गेली होती. नाल्याजवळ झाडण्या कापत असतात दबा धरुन बसलेल्या वाघाने अचानक हल्ला केला. यात रेखा जागीच ठार झाल्या.

आई घरी पोहचवली नाही म्हणून मुलगा महादेव येरमलवार व राकेश येरमलवार तथा गावकरी यांनी जंगलात रात्री शोध घेतला, पण कुठेही ठावठिकाणा लागला नाही. दरम्यान शनिवार ३० नोव्हेंबर रोजी सकाळी सात वाजता वनरक्षक सोनेकर, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष नवनित कातलवार, व गावकरी यांनी जंगलात शोध घेतला असता रेखाचा मृतदेह जंगलात मिळाला. वन विभागाने मृत महिलेल्या कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत दिली. तसेच वाघाचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी गावकरी व नागरिकांकडून केली जात आहे.

# अजितदादांनी बिघडवले शिंदेंचे गणित

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३०:

अजित पवार यांनी निकाल जाहीर होताच देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला पसंती दर्शवली. त्यामुळे एकनाथ शिंदेंची बार्गेनिंग पॉवर कमी झाली. निकालानंतर अजित पवार देवेंद्र फडणवीस यांची जवळीक वाढताना दिसत आहे. त्यामुळे एकनाथ शिंदेंचे सत्तासमिकरणाचे गणित बिघडल्याचे दिसत आहे.

राज्यात भाजपाचे सर्वाधिक आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री कोण, याबाबतचा निर्णय भाजपाचे वरिष्ठ नेते घेतील. आम्ही त्यांच्या निर्णयाला पाठिंबा देऊ, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी गुरुवारी स्पष्ट केली.

त्यांनी याबाबत कोणत्याही अटी शर्ती माध्यमांसमोर घातलेल्या पहावयास मिळाल्या नाही.

त्याचबरोबर अजित पवार यांनी भाजपबरोबर जाण्यासाठी पूर्णता सकारात्मक भूमिका देखील घेतली. परंतु या उलट एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने काही अटी शर्ती घातल्या असल्याचे सूत्रांच्या हवाल्याने माध्यमांमध्ये बातम्या चालवल्या गेल्या.

निकालाच्या दुसऱ्याच दिवसापासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व्हावेत यासाठी त्यांच्या पक्षासोबतच कुटुंबीयांकडून देखील वेगवेगळ्या देवतांना साकडे घातले जात असल्याच्या बातम्या माध्यमांमध्ये पेरल्या गेल्या. हा देखील एक दबाव तंत्राचाच भाग मानला जातो.

असे जरी असले तरी भाजप श्रेष्ठींनी महायुतीच्या सर्व नेत्यांना दिल्लीत बोलवून हा दबाव मोडीत



काढला असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळेच दिल्लीवारीच्या आधी एकनाथ शिंदे यांनी आपले समर्थन देऊन मोकळे झाले. परंतु त्याच वेळेस मुंबईत परतल्यानंतर महायुतीच्या नेत्यांची बैठक घेणार असल्याचे दस्तुरखुद्द एकनाथ शिंदे यांनीच सांगितले होते.

असे असताना देखील महायुतीची बैठक टाळून शिंदे आपल्या मूळ गावी निघून गेले. हा देखील एक दबाव तंत्राचा भाग आहे. परंतु अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपला दिलेले समर्थन शिंदेंसाठी अडचणीचे ठरले आहे. यामुळे त्यांची बार्गेनिंग पॉवर देखील कमी झाली. शिंदेंच्या या दबाव तंत्राला भाजप पक्षश्रेष्ठी किती महत्त्व देतात हा येणारा काळच सांगू शकतो.

## एका बालकाचा बुडून मृत्यू तिघांना वाचविण्यात यश

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ३०:

वैनगंगा नदीच्या बोरमाळा घाटातील पाण्यात चार शाळकरी मुले बुडाली. सुदैवाने यातील तिघे थोडक्यात वाचली. मात्र, एकाचा मृत्यू झाला. ही घटना ३० नोव्हेंबरला दुपारी घडली. जयंत आझाद शेख (१०), रा. गडचिरोली. असे मृत मुलाचे नाव आहे. रियाज शब्बीर शेख (१४), जिशान फय्याज शेख (१५), लड्डू फरसाज शेख (१३), सर्व रा. गडचिरोली. हे बचावले.

चारही मुले बोरमाळा नदीघाटावर गेले होते. सोबत जिशान व लड्डू यांची आई ताजु शेख या देखील सोबत होत्या. वैनगंगा नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह कमी झालेला आहे. पण पात्रातील खोल पाण्याचा अंदाज न आल्याने मौजमजा म्हणून उतरलेली चारही मुले एकापाठोपाठ एक बुडाली.

नदीकाठावर असलेल्या ताजु फय्याज शेख यांनी पाण्यात उडी घेत जिशान, लड्डूया आपल्या दोन मुलांसह रियाज यास वाहेर काढले, पण पाण्याच्या प्रवाहात वाहत गेलेल्या जयंत शेख यास वाचविण्यात त्यांना यश आले नाही. यावेळी मदतीसाठी काही मासेमार धावले. त्यांनी जयंत यास वाहेर काढले. मात्र, दवाखान्यात नेण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. इतर तीन मुले सुखरूप वाचली.

### ईव्हीएम हॅक करता येतं, मी इंजिनिअर.. मला सगळं माहीत..

# माजी मंत्री महादेव जानकर यांनी बॉम्ब फोडला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३०:

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल हा अनेकांसाठी धक्कादायक होता. यंदाच्या या निवडणुकीत अनेक दिग्गजांचा पराभव झाला. अशातच महाविकास आघाडीकडून वारंवार ईव्हीएमवर संशय व्यक्त केला जात आहे.

राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष आणि फडणवीस सरकारमध्ये पशुपालन मंत्री राहिलेले महादेव जानकर यांनीही ईव्हीएमवर संशय व्यक्त केला आहे. तसंच ईव्हीएम हॅक करता येऊ शकतं, असं मोठं विधान महादेव जानकर यांनी केलं. त्यांच्या या विधानाने एकच खळबळ उडाली आहे. तसंच स्वपक्षातील आमदार रत्नाकर गुट्टे यांनाही जानकरांनी इशारा दिला आहे.

अनेक ठिकाणी ईव्हीएममध्ये घोटाळा झाल्यामुळं महायुतीच्या जागा निवडून आल्या आहेत. ईव्हीएमवर माझा आक्षेप आहे. देशभरात आम्ही याविरोधात



आंदोलन करू. ईव्हीएममुळे देशाची लोकशाही धोक्यात आली आहे. ईव्हीएम हॅक करता येतं. मी स्वतः इंजिनिअर आहे. त्यामुळं मला सगळं माहीत आहे. सुप्रीम कोर्ट, निवडणूक आयोग सगळे त्यांचे आहेत. त्यामुळं याला लोकशाही म्हणता येणार नाही. लोकशाहीचा खून करण्याचं काम झालं आहे, असं महादेव जानकर म्हणालेत.

महादेव जानकर यांनी महायुतीतून बाहेर पडत एकला चलो रे ची भूमिका घेतली आहे. त्यावर बोलताना मला महायुतीचा अनुभव खूप वाईट आला आहे. त्यामुळं मी त्यांच्यापासून दूर आहे. काँग्रेसला अजून चाखल नाही. त्यामुळं त्यांच्याकडे न जाता स्वतंत्र पुढे जायची आमची भूमिका आहे, असं महादेव जानकर म्हणालेत.

**जानकरांचा रत्नाकर गुट्टेंना इशारा**

रत्नाकर गुट्टे हा माझ्या पक्षाचा सध्या एकच आमदार आहे. कोणासोबत जायचं याचा अजून निर्णय झालेला नाही. पण जर त्याने पक्षाला न विचारता काही निर्णय घेतला तर त्यावर नक्की आम्ही कारवाई करू.

मला सगळ्या गोष्टीच्या ठेचा लागल्या आहेत. त्यामुळं मी सगळ्या गोष्टी माझ्या ताब्यात ठेवल्या आहेत. त्यामुळं माझा एक आमदार असला तरी तो पक्षावर दावा सांगू शकत नाही, असं म्हणत महादेव जानकर यांनी गंगाखेडच्या आपल्याच पक्षाचे आमदार रत्नाकर गुट्टे यांना इशारा दिला आहे.

# ...त्यांची उपयुक्तता संपली!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३०:

गेल्या अडीच वर्षांपासून मोदी-शाह यांच्या आशीर्वादाने मुख्यमंत्री राहिलेल्या एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या निवडणुकीत बहुमत मिळूनही सत्तेतील सर्वोच पद मिळत नसेल तर तर त्यांचा चेहरा पडणे साहजिकच आहे. एवढेच नव्हेतर यापुढेही शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादीची (अजित पवार) उपयुक्तता संपलेली असेल, अशी खोचक टीका माजी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. ते आज नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.



नवीन सरकारमध्ये एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना उपमुख्यमंत्री बनवले जाण्याचे वृत्त आहे. पण, हे दोघेही मोदी आणि शाह यांच्या आशीवार्दाशिवाय सत्तेत राहू शकत नाहीत. त्यांना सत्तेत सहभागी करून पदे दिली किंवा पदे नाही दिली, तरी ते काहीही करू शकत नाही. त्यांना गुपचूप बसण्यापलिकडे काहीही करता येणे शक्य नाही, असेही वडेट्टीवार म्हणाले.

फडणवीस यांना मुख्यमंत्रीपद दिले जाणार असल्याचे समजते. ही आनंदाची गोष्ट आहे. विदर्भाच्या पुत्राला पुन्हा मुख्यमंत्री बनण्याची संधी मिळत आहे. मुख्यमंत्रीपदी बसल्यानंतर ते विदर्भातील अनुशेष भरून काढतील, अशी अपेक्षा आहे.

त्यांच्यावर सुडाचे राजकारण करण्याचा आरोप आहे. हा आरोप पुसून काढण्याची त्यांना संधी आहे. राजकीय लढाई विचारधारेची असली पाहिजे, वैयक्तिक शत्रुत्वाची लढाई नसावी. त्यांच्याबाबत राज्यात जो गैरसमज निर्माण झाला आहे. तो यावेळी पुसून निघेल. अशी अपेक्षा असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

# काँग्रेसच्या बंटी शेळकेंकडून पराभवानंतरही रॅलींचा धडाका



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३०:

राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकीत मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार बंटी शेळके यांचा भाजप उमेदवार प्रवीण दटके यांनी पराभव केला. सामान्यतः जिंकलेला उमेदवार जल्लोष साजरा करतो. परंतु बंटी शेळके पराभवानंतरही मतदारसंघात रॅली काढत आहेत.

मागील काही दिवसांपासून बंटी शेळके मध्य नागपूर मतदारसंघातील वेगवेगळ्या भागात पायाला भिंगरी लागल्या प्रमाणे रॅली काढत आहे. या रॅली बघून सर्वसामान्य नागरिकांना आश्चर्याचा धक्का बसत आहे. रॅली दरम्यान बंटी शेळके लहान मुलांच्या घोळक्यात बसणे, ज्येष्ठांचा आशीर्वाद घेणे, महिलांशी हितगूज करत त्यांना नमस्कार करीत आहे. अनेक तरुण व ज्येष्ठांची ते गळाभेटही घेत आहे.

हा प्रकार ते मध्य नागपूर मतदारसंघातील नागरिकांनी त्यांना तब्बल ८० हजारावर मतदान केल्यामुळे करत असल्याचे त्यांनी समाजमाध्यमांवर पोस्ट केले आहे. मागच्या (२०१९) निवडणूकीत त्यांना येथून सुमारे ७० हजार मतदान मिळाले होते. यंदाच्या निवडणूकीत त्यांना १० हजारांनी अधिक म्हणजे ८० हजार मतदान मिळाल्यामु?ळे ते येथील जनतेचे आभार मानन्यासाठी रॅली काढत आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) मुख्यालय असलेल्या मध्य नागपुरातील निवडणूक यंदा खूपच चर्चेत राहिली. या मतदारसंघातील मतदानाच्या दिवशी भाजप-काँग्रेस कार्यकर्ते अनेकदा सामोरासमोर आले. प्रचारादरम्यान महालातील बडकस चौकातून प्रियंका गांधींचा रोड-शो सुरू असताना भाजपच्या कार्यकर्त्यांनी पक्षाचे झेंडे दाखवल्यावर गोंधळ उडाला. मतदानाच्या दिवशीही बंटी शेळके यांनी भाजपच्या मत चिठ्ठी मतदान केंद्रावर सापडल्यानंतर अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

मतदानाच्या दिवशी मोमीनपुरात पोलिसांनी नाकाबंदी केल्याचा आरोप करत एका समाजाला मतदानापासून रोखण्यात येत असल्याचा आरोप केला. पोलिसांशी वाद घातला. निवडणुकीच्या दिवशी बंटी शेळके यांच्या कार्यकर्त्यांना पैसे वाटप करीत असल्याच्या आरोपातून ताब्यात घेण्यात आले.

मतदान संपल्यावर बडकस चौकातच काँग्रेस आणि भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. अतिरिक्त ईव्हीएम घेऊन जात असलेली वाहने काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी गैरसमजातून अडवून त्याची काचे फोडली. त्यानंतर काही कार्यकर्त्यांनी आमदार प्रवीण दटकेंना घेरले. धक्काबुक्कीही झाली. त्यामुळे पोलिसांनी बंटी शेळके यांच्यासह काही कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

या सगळ्या घटना बघता मतमोजणीनंतर दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये वाद वाढण्याची शक्यता होती. पण काँग्रेसचे बंटी शेळके स्वतः प्रवीण दटके यांच्याकडे गेले. तेथे त्यांनी प्रवीण दटके यांची गळाभेट घेतली. त्यामुळे वाद निवळला. दरम्यान, नागपूर महानगर पालिकेच्या आगामी निवडणुकीची तयारी म्हणून हा प्रकार सुरू असल्याची चर्चा आहे.

# ईव्हीएम विरोधात बाबा आढाव यांचे आत्मक्लेष आंदोलन

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३०:

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर विरोधी पक्षांनी ईव्हीएमकडे बोट दाखवलं. ईव्हीएममध्ये काही तांत्रिक गोष्टींच्या आधारे महायुतीने हे यश मिळवल्याचा आरोप महाविकास आघाडीकडून करण्यात येत आहे.

अशातच पुण्यात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव ईव्हीएम विरोदात आंदोलन करत आहेत. लोकशाहीच्या वस्त्रहरणाच्या निषेधार्थ आणि राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांच्या संरक्षणार्थ बाबा आढाव पुण्यातील फुलेवाड्यात आत्माकलेष उपोषण करत आहेत.

दरम्यान, यावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अनेक देशांनी ईव्हीएम सोडलं आहे. ईव्हीएममध्ये डीजीटीलाईजेशन झालं आहे. कंट्रोल रूममध्ये बसून हॅकिंग न करता सिम न बदलता काही घडवलं जातं. मी प्रयत्न केला होता. मला गोंधळ कळाला होता. काही संवेदनशील असतात. राजकीय पक्ष आणि निवडणूक आयोगाचे नाते असेल तर आचार संहिता सुरू असताना वाटप होते त्यामुळे मत विकत घेतले जातात, असं मेधा पाटकर म्हणाल्या.





### मतदारांचा कौल बदलला असेल तर आमची काय चूक?

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात गडबड झाल्याचा आरोप करत आत्मक्लेष आंदोलन सुरू केले. आज शरद पवार, अजित पवार यांनी आढाव यांची भेट घेतली.

या वेळी बाबा आढाव यांनी ईव्हीएम मशीन मध्ये गडबड असल्याचा उल्लेख करत, पाच महिन्यात मतदारांचा कौल कसा बदलला? असा प्रश्न उपस्थित केला. यावर अजित पवार यांनी देखील आढाव यांच्या समोरच सर्व परिस्थिती मांडली. या वेळी अजित पवारांनी अनेक उदाहरणे देखील दिली. नागरिकांचे मत बदलले असेल तर त्यात आमची काय चूक? असा प्रश्न अजित पवार यांनी उपस्थित केला.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या जास्त जागा निवडून आल्या. त्यावेळी जनतेने दिलेले जनमत आम्ही मान्य केले. लोकसभा निवडणुकीत मी देखील बारामती मध्ये जो उमेदवार दिला होता त्याचा ४८ हजार मतांनी पराभव झाला. तर दुसरीकडे विधानसभेत त्याच लोकांनी मला एक लाखापेक्षा जास्त मतांनी विजयी केले. त्यामुळे जनतेला कोण प्रश्न विचारावे? त्यांनी ठरवले त्याला निवडून दिले असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

बाबा आढाव यांचं आंदोलन हे फक्त ईव्हीएम पुरता प्रश्न उपस्थित करत नाही. तर संविधान अंमलबजावणी देखील आहे. मूठभर लोकांच्या हातात सगळे पैसे नको.

असं असताना याच्या उलट पाहावं लागतं. राहुल गांधी यांच्या यात्रेने फक्त होणार नाही. ९४ वर्षापासून लढणाऱ्या बाबा आढाव यांना का बसण्याची प्रेरणा मिळाली?, असं मेधा पाटकरांनी म्हटलं आहे.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर मेधा पाटकांनी प्रतिक्रिया दिली आहे. कुठलाही पक्ष जर असेल तर आम्हाला मुद्दे मांडावे लागतात. काय होईल? अस्मिता आणि अस्तित्वाचे प्रश्न आहे. कुणी बंडखोरी करते आणि कोण कुठे जाणार हे सांगता येत नाही. विधानसभा आणि लोकसभेत प्रश्न मार्गी लागत नाहीत, अशी खंत मेधा पाटकर यांनी बोलून दाखवली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण सारख्या योजनांनी प्रश्न पूर्ण सुटणार नाही. १५०० मिळाले असं का वाटावं? जमीन घर हिसकावून घेतलं. त्यांना जे काही मिळेल ते घ्यावं लागतं, असं मेधा पाटकरांनी म्हटलं आहे.

# निकालांनी काय दाखवले?

**महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका संपल्या, निकालांनी उडवून दिलेली राळ शांत झाली. लवकरच नवे सरकार कामाला लागेल. मात्र तरीदेखील पुढचा काही काळ या निकालांचा अन्वयार्थ शोधण्यात जाणार आहे. या निवडणुकीची वैशिष्ट्ये शोधली आणि त्यातून मिळणारे संकेत जाणून घेतले तर राजकारणाचा आणि भविष्यातील राजकीय स्थितीचा चेहरामोहरा समजणे सोपे जाईल.**

वर्तमान

**प्रमोद मुजुमदार**

ज्येष्ठ अभ्यासक

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून काही दिवस उलटल्यानंतर आता राजकीय वर्तुळाबरोबरच सर्वसामान्य आणि जाणकारांमध्ये या घटनेचे अवलोकन सुरू असून या जय-पराजयाचे विश्लेषण आपापल्या पद्धतीने मांडले जात आहे. स्वाभाविकच उद्धव ठाकरे आणि शिंदे सरकारच्या काळाची तुलनाही होते आहे. उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात भाजपच्या कार्यकर्त्यांवर सतत शाब्दिक हल्ला होत होता. अर्थातच भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये याचा प्रचंड राग होता आणि तो पुढेही राहणार आहे. ताज्या निवडणुकीच्या माध्यमातून जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या मनातील तो सगळा राग निघाला असल्याचे प्रकर्षाने लक्षात येते. आता निकाल लागल्यानंतर त्यांच्या नऊ वाजता वाजणाऱ्या भोंग्यामार्फत असेच जहरी वक्तव्य सुरू आहे. यातून मिळणारा संदेश फारसा चांगला नाही. खरे तर त्यांनी खुल्या दिलाने पराभव मान्य करणे गरजेचे होते. मात्र एवढा शहाणपणा आजही त्यांच्याकडे दिसत नाही.

वैशिष्ट्यांबाबत बोलायचे तर या निवडणुकीमध्ये शरद पवार यांच्या पक्षाला अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसपेक्षा २. २८ टक्के अधिक मते मिळाली आहेत. तरीदेखील शरद पवार यांचे अवघे दहा उमेदवार जिंकले तर अजित पवार यांच्या ४१ उमेदवारांना विजयश्री प्राप्त झाली. दुसरी बाब म्हणजे काँग्रेस आणि शिवसेनेच्या (शिंदे गट) मतांची टक्केवारी जवळपास सारखी असली तरी काँग्रेसला केवळ १६ जागांवर विजय मिळाला तर शिवसेनेने (शिंदे गट) ५७ जागा जिंकल्या. या निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरे गटाला शिंदे गटापेक्षा केवळ २.४८ टक्के कमी मते मिळाली आहेत. पण उद्धव ठाकरे गटाचे २० उमेदवार जिंकले तर शिंदे गटाला ५७ उमेदवार जिंकून आणण्यात यश आले. बसपाला समाजवादी पार्टी आणि कम्युनिस्ट पक्षापेक्षा अधिक मते मिळाली असली तरी एकही उमेदवार निवडून आणता आलेला नाही. राज्यभरात १२५ जागांवर आपले उमेदवार उभे करणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला (मनसे) देखील यशाची चव चाखता आलेली नाही. मात्र त्यांना मिळालेल्या मतांची टक्केवारी १.५५ टक्के इतकी आहे. या निवडणुकीत 'नोटा'चा पर्याय निवडणाऱ्या मतदात्यांची संख्या ०.७२ टक्के म्हणजेच तब्बल ४,६१,८८६ इतकी आहे. ही संख्या बीएसपी आणि एसपीला मिळालेल्या मतांपेक्षा अधिक आहे. सपाला दोन जागा मिळाल्या असल्या तरी केवळ ०.३८ टक्के मते मिळाली आहेत. एआयएम आयएमने एका जागेवर विजय मिळवला असला तरी त्यांनाही केवळ ०.८५ टक्के मते मिळाली आहेत.

या निवडणुकीत एका अर्थी मनसेने युती आणि शरद पवार यांना समर्थक दिले, असेही म्हणता येईल कारण महाविकास आघाडीच्या विरोधात त्यांचा एकही उमेदवार निवडणूक लढवत नव्हता. त्यामुळे मनसेचे उमेदवार फक्त शिंदे सेना आणि भाजप यांच्या विरोधात लढून त्यांची मते खाणे, फूट पाडणे असे नुकसान करत होते की काय, असा प्रश्न आता अनेकजण विचारत आहेत. मनसे नसती तर महाराष्ट्रात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला दहा जागाही मिळाल्या नसत्या, असे आता आकडेवारीमधून स्पष्ट होत आहे. या निवडणुकीची ही काही ठळक वैशिष्ट्ये लक्षात घ्यावी लागतील. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने मिळून सरकार स्थापन केले. मात्र, ही आघाडी जास्त काळ सरकार चालवू शकली नाही. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे गट तर त्यानंतर अजित पवार गट महायुतीमध्ये सहभागी झाला. राष्ट्रवादीच्या मतदारांना महायुतीकडे वळवण्यात याने महत्त्वाची भूमिका बजावली. ताज्या निकालाने महाराष्ट्रातील मराठा फॅक्टर आणि बेरोजगारीचा मुद्दा महाविकास आघाडीच्या बाजूने राहिलेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. किंबहुना, मतांच्या ध्रुवीकरणामुळे हे मुद्दे मागे पडले, असेही आपण म्हणू शकतो. त्याच वेळी देशभरात बळकट झालेला हिंदुत्वाचा मुद्दा महायुतीने समोर आणला. महायुतीला अपेक्षेप्रमाणे योगी आणि मोदींच्या घोषणांची मोठी मदत मिळाली. भाजपने योगींचे 'बटेंगे ते कटेंगे' असे बॅनर महाराष्ट्रात लावले तेव्हा तीव्र प्रतिक्रिया उमटल्या कारण उत्तर प्रदेश किंवा हरियाणामध्ये हिंदुत्व प्रचलित आहे तसे महाराष्ट्रात नाही. पण, निकाल समोर आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणातही ध्रुवीकरणाचे पर्व सुरू झाल्याचे स्पष्ट झाले.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने 'संविधान बचाओ'चा नारा दिला होता. ही घोषणा विशेषत: उत्तर प्रदेशातील लोकसभा मतदारसंघात कामी आली. मात्र महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत या घोषणेचा शून्य परिणाम बघायला मिळाला. खेरीज मराठा आरक्षणाचाही मुद्दा काँग्रेस वापरु न शकल्याचे चित्र दिसत आहे. निवडणुकीच्या प्रचारात भाजपला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची महायुतीला मोठी मदत झाली. हरियाणाप्रमाणे येथेही आरएसएसचे लोक सक्रिय होते. किंबहुना, लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये भाजपच्या खराब कामगिरीचे कारण जनसंपर्क कमी पडणे, सर्वसामान्यांपर्यंत कार्यकर्ते न पोहोचणे हे मानले जात होते. मात्र ही चूक सुधारत महाराष्ट्रात संघाचे लोक पुन्हा निवडणुकीत उतरवण्यात आले. संघ स्वयंसेवकांनी आपली शंभर टक्के ताकद भाजपाच्या मागे लावली होती. भाजपालाच मत द्या, असा त्यांचा थेट प्रचार नसला तरी अप्रत्यक्षपणे त्यांनी आपल्याच विचाराच्या भाजपाला मोठे बळ देण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच यंदा गल्लोगल्ली, प्रत्येक वॉर्डमध्ये, प्रत्येक घरात संघाची पूर्ण ताकद दिसली. परिणामी, भाजपाच्या यशाचे पारडे संघाकडे मोठ्या प्रमाणात झुकणारे आहे.



लोकसभा निवडणुकीमध्ये मुस्लीमांची एकगठ्ठा मते उद्धव ठाकरेंच्या पारड्यात टाकली. मात्र आताच्या निवडणुकीत त्याच्या परिणामांची जाणीव करुन देण्यात महायुती यशस्वी ठरली. लोकसभा निवडणुकीनंतर बांग्लादेशमध्ये घडलेल्या घटना जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहिल्या. त्याला प्रतिक्रिया म्हणूनच सिमल्यातील एक अवैध मशिद पाडण्यासाठी तिथला समस्त हिंदू समाज एकवटलेला दिसला. म्हणजेच जातीपातीच्या, प्रांत, भाषेच्या नावाने आपण वेगवेगळे राहिलो तर आपल्यावर अतिक्रमण होईल, हे मत जनतेला पटलेले दिसले. एक राहिलो तर कोणी आपल्याकडे वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही, कोणी हल्ला करणार नाही हा विचार स्विकारल्याचेही जनतेने ताज्या निकालाद्वारे सूचित केले आहे. एकीचा हाच मुद्दा महाराष्ट्रात, विशेषत: ग्रामीण भागात वारकरी संप्रदायानेही दाखवला. त्यांनी छोट्या छोट्या गटसभा घेऊन, अगदी ५०-१०० लोकांच्या सभा घेत हा विचार पोहोचवण्याचे मोलाचे काम केले. एखाद्या देवळात, आवारात पार पडलेल्या अशा छोट्या सभांची संख्यास ६० ते ७० हजारांच्या घरात होती. त्याचाही परिणाम ताज्या निकालावर प्रभावीपणे दिसून येत आहे.

या सगळ्याबरोबरच जनतेच्या डोळ्यासमोर महायुतीचे काम होतेच. मध्य प्रदेशातील भाजप सरकारच्या 'लाडली बहन योजने' नंतर महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही यावर्षी जून महिन्यात 'मुख्यमंत्री-मेरी लाडकी बहीण योजना' सुरू केली. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपये दिले जात आहेत. भाजपच्या दणदणीत विजयात या घटकाचाही मोठा वाटा असल्याचे मानले जात आहे. विरोधकांनी या योजनेला मोठा विरोध केला. काही दिवसांमध्येच महिलांना पैसे मिळणे बंद होईल, सरकारची ही महत्त्वाकांक्षा योजना बंद होईल असे म्हणत एकीकडे त्यांनी अपप्रचार केला. दुसरीकडे महाविकास आघाडीतील मोठ्या राजकीय पक्षांनी जाहीरनाम्यामध्ये आपले सरकार सत्तेत आल्यास महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा करण्याच्या घोषणा केल्या. ही बाबही चाणाक्ष नागरिकांच्या नजरेतून सुटली नाही. एकिकडे लाडकी बहिण योजनेला विरोध करायचा आणि दुसरीकडे तशीच योजना राबवण्याचे आश्वासन द्यायचे, हे मतदारांना कोड्यात टाकून गेले. खेरीज महाविकास आघाडीचा भाग असलेली काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांनी महागाई, बेरोजगारी या मुद्द्यांवर राज्य सरकारला कोंडीत पकडण्याच केलेला प्रयत्नही तोकडा पडला. त्यांना जनतेचा पाठिंबा मिळेल, अशी आशा होती. पण, परिणाम उलटे झाले. महाराष्ट्रात सोयाबीनच्या हमीभावाचा मुद्दाही पुढे आला नाही. एकंदरीत, काहीशी अर्धवट लढलेली लढाई म्हणून महाविकास आघाडीच्या तयारीबद्दल बोलता येईल. निकालाआधी संजय राऊत आणि नाना पटोले यांच्यामध्ये रंगलेला मुख्यमंत्रीपदाचा संघर्षही असाच हास्यास्पद ठरला.

# हा कौल काय सांगतो?

**मतदारांनी दोनशेहून अधिक जागा महायुतीच्या पारड्यात टाकून महाविकास आघाडीला आत्मपरीक्षणाचा सल्ला दिला. शरद पवारांसारख्या योद्ध्याला विधानसभा निवडणुकीतील लढाईत आतापर्यंतच्या सर्वात वाईट पराभवाला सामोरे जावे लागले आहे. अगोदर राज्याच्या आर्थिक शिस्तीचे कारण सांगून विरोध करायचा आणि विरोध अंगलट आला की त्यापेक्षा अधिक रकमेची योजना जाहीर करायची, ही धरसोड वृत्ती काँग्रेसला भोवली.**

दखल

**महेश जोशी**

महाराष्ट्रातील जनतेने सर्व मतदानपूर्व आणि मतदानोत्तर चाचण्यांना तोंडघशी पाडत महायुतीला सत्तेत आणले. दोनशेहून अधिक जागा महायुतीच्या पारड्यात टाकून महाविकास आघाडीला आत्मपरीक्षणाचा सल्ला दिला. शरद पवार यांच्यासारख्या योद्ध्याला विधानसभेच्या निवडणुकीतील लढाईत आतापर्यंतच्या सर्वात वाईट पराभवाला सामोरे जावे लागले आहे. काँग्रेसला सत्ता गेल्यानंतरही शहाणपण येत नाही, हे या निवडणुकीच्या निकालाने पुन्हा दाखवून दिले आहे. गटबाजी, पाडापाडी, एखाद्या विजयाने येणारा उन्मत्तपणा, मित्रपक्षांवर कुरघोडी करण्याचे राजकारण हे कायम यश मिळवून देत नसते, याचा धडा आता तरी काँग्रेसने घ्यायला हवा. एखाद्या निवडणुकीत एक कथ्य (नॅरेटिव्ह) चालले, म्हणजे नंतरच्या निवडणुकीतही तेच चालत नसते. बहुसंख्य आमदार निवडून आणायचे; परंतु त्यांच्या भावना जाणून घ्यायच्या नाहीत, असे केले तर काय होते, हे आता काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाच्या चांगलेच लक्षात आले असेल.

इतरांच्या रेवडी संस्कृतीला विरोध करायचा आणि दुसरीकडे त्याच रेवडी संस्कृतीचा पुरस्कार करायचा, हे या निवडणुकीत सर्वच पक्षांच्या बाबतीत झाले. जी योजना मध्य प्रदेशमध्ये 'गेमचेंजर' ठरली, तीच योजना महाराष्ट्रात 'गेमचेंजर' ठरण्याची शक्यता असताना तिला पर्याय काय द्यायचा, हे अखेरपर्यंत महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या लक्षात आले नाही. अगोदर राज्याच्या आर्थिक शिस्तीचे कारण सांगून विरोध करायचा आणि विरोध अंगलट आला, की त्यापेक्षा अधिक रकमेची योजना जाहीर करायची, ही धरसोड वृत्ती झाली. दीड हजार रुपयांनी काय होणार, असा सवाल करताना गरीब कुटुंबासाठी दीड हजार रुपये किती महत्त्वाचे असतात, हे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या लक्षात आले नाही. उलट, लोकसभेच्या निवडणुकीत आलेल्या पराभवातून जागे होत महायुतीने अतिशय काटेकोर नियोजन केले. मतभेद त्यांच्यातही होते; परंतु त्याचा परिणाम कुठे विजयावर होणार नाही, याची दक्षता महायुतीने घेतली असताना महाविकास आघाडीत मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली. लोकसभेच्या निवडणुकीत मिळालेल्या यशाने अन्य पक्षीयांचा लोंढा सुरू झाला. त्याला सामावून घेताना आपलेच कार्यकर्ते नाराज होतात, याचे भान महाविकास आघाडीच्या नेत्यांना राहिले नाही. पक्ष कार्यकर्त्यांच्या बळावर चालतात; नेत्यांच्या नव्हे. नेते सोईसाठी इकडून तिकडे उड्या मारत असतात. त्यांच्यापेक्षा कार्यकर्त्यांना जपावे लागते. ते न केल्यास कार्यकर्ते लढायला तयार होत नाहीत. मैदानात कार्यकर्तेच नसतील, तर लढाई कशी जिंकायची, हे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या लक्षात आले नाही. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला.

'माझी लाडकी बहीण' योजनेच्या पोर्टलवर उपलब्ध माहितीनुसार या योजनेसाठी एकूण १.१२ कोटी अर्ज आले होते. पोर्टलवर स्वीकारलेल्या अर्जांची एकूण संख्या १.०६ कोटी आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे उद्दिष्ट २.३४ कोटी पात्र महिलांना आर्थिक लाभ मिळवून देणे असे होते. रक्षाबंधनाच्या दिवशी सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा सरकारने महाराष्ट्राच्या पुरवणी अर्थसंकल्पात समावेश केला. या योजनेसाठी राज्याच्या तिजोरीतून वार्षिक ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली. या योजनेंतर्गत महाराष्ट्र सरकारने निवडणुकीपूर्वी महिलांच्या खात्यात साडेसात हजार रुपये जमा केले. त्याअगोदर महिलांना एसटी प्रवासात पन्नास टक्के सवलत दिली. ज्येष्ठांना एसटी प्रवास मोफत केला. ज्येष्ठांसाठी तीर्थाटनाची योजना आखली. एसटीच्या परताव्याची सोय महायुती सरकारने केली. साठ-पासष्ट टक्क्यांपेक्षा अधिक लोकांना अशा लाभाच्या योजनांचा फायदा मिळत असेल आणि दुसरे सरकार येण्याने या योजना बंद होत असतील, तर हेच सरकार पुन्हा निवडून द्यावे लागेल, ही मानसिकता मतदारांमध्ये रुजवण्यात महायुती मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेली दिसते. आक्रमक आणि सकारात्मक जाहिरात मोहिमेमधून महायुतीने मतदारांच्या मनावर जे ठसवले, ते प्रत्यक्षात आले असे म्हणता येते. ही योजना निवडणुकीत सरकारसाठी 'गेमचेंजर' ठरेल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवडणूक प्रचारात सांगितले.

महायुतीने विधानसभा निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यात लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. त्याच वेळी महाविकास आघाडीने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने पाच हमींवर लक्ष केंद्रित केले होते. या जाहीरनाम्यामध्ये महिलांना दरमहा तीन हजार रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र प्रत्यक्षात पैसे ज्याने हातात ठेवले, त्याच्यावर महिलांनी अधिक विश्वास ठेवल्याचे दिसते. राज्यात एकूण ६६.०५ टक्के मतदान झाले. महाराष्ट्रातील या निवडणुकीत ९.७० कोटींहून अधिक मतदार आपला मतदानाचा हक्क बजावण्यास पात्र होते. त्यापैकी पाच कोटी पुरुष आणि ४.६९ कोटी महिला मतदार होते. २०१९ मध्ये महाराष्ट्रात एकूण ६१.४४ टक्के मतदान झाले होते. यंदा गेल्या विधानसभा निवडणुकीपेक्षा राज्यात ४.६१ टक्के अधिक मतदान झाले. या वाढीमध्ये महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे. २०१९ च्या निवडणुकीमध्ये महिला मतदारांची मतदानाची टक्केवारी ५९.२६ टक्क्यांवरून यंदा ६५.२१ टक्के झाली. म्हणजेच ५.९५ टक्के गुणांची वाढ झाली. मुंबई, त्याची उपनगरे आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्येही महिला मतदारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत ठाणे जिल्ह्यात ११ टक्के वाढ झाली. त्यानंतर आदिवासी जिल्हा असलेल्या पालघरमध्ये नऊ टक्के आणि मुंबई महानगर प्रदेशात किमान सात टक्के वाढ झाली.

एके काळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेला महाराष्ट्र हिंदुत्वाचा बालेकिल्ला बनला आहे. खरे तर १९६० मध्ये नवीन राज्य म्हणून स्थापन झालेल्या महाराष्ट्रात १९६२ मध्ये पहिल्यांदाच विधानसभा निवडणुका झाल्या. तेव्हापासून १९९० पर्यंत येथे केवळ काँग्रेसचे नाणे चलनात होते. १९९२ मध्ये बाबरी विद्ध्वंसानंतर मुंबईत झालेल्या जातीय दंगली आणि बॉम्बस्फोटांनी राज्यात प्रथमच हिंदुत्वाचे राजकारण मजबूत केले. यामुळेच १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदाच महाराष्ट्रात हिंदुत्वाला चालना देणारे शिवसेना आणि भाजपचे युतीचे सरकार स्थापन झाले. त्यानंतर २०१४ मध्ये मोदी लाटेत या दोन्ही पक्षांनी पुन्हा एकदा सरकार स्थापन केले; मात्र २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर शिवसेना-भाजपमध्ये मुख्यमंत्रिपदावरून खडाजंगी झाली. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे भाजप सोडून राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसमध्ये सामील झाले, तेव्हा त्यांच्या हिंदुत्वाच्या अजेंड्यावर प्रश्न उपस्थित होऊ लागले. मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी एका निवेदनात आपण हिंदुत्वाचे मुख्याध्यापक असल्याचे म्हटले होते. वचने पाळणे हाही माझ्या हिंदुत्वाचा एक भाग आहे. कालही मी माझे हिंदुत्व पाळत होतो. मी आजही करतो आणि भविष्यातही करत राहीन. मी आजही हिंदुत्वाच्या विचारसरणीसोबत आहे, जी माझ्यापासून कधीही वेगळी होऊ शकत नाही, असे ते सांगत राहिले तरी हिंदुत्वावर भाजपने ठाकरे यांची कोंडी केली होती.

२०२२ मध्ये शिवसेनेत बंडखोरी झाली, तेव्हा एकनाथ शिंदे यांनीही ठाकरे यांच्यावर हिंदुत्वाच्या मुद्द्यापासून विचलित झाल्याचा आरोप केला. लोकसभा निवडणुकीच्या वेळी महाविकास आघाडीची (शिवसेना ठाकरे, राष्ट्रवादी शरद पवार आणि काँग्रेस) कामगिरी चांगली होती. त्यामुळे भाजपच्या युतीच्या दाव्यांचा धुरळा उडाला होता; मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचा 'बटेंगे तो कटेंगे' आणि 'एक है तो सेफ है'च्या नाऱ्याने महाराष्ट्रात हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून राजकारणाला नवी धार दिली. त्याचा परिणाम निवडणुकीच्या निकालात दिसून येतो. निकालात भाजप सर्वात मोठा पक्ष ठरल्याने आता शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाची 'बार्गेनिंग पॉवर' कमी झाली आहे. हे पक्ष आधी 'एनडीए' आघाडीमध्ये ज्या प्रकारे अनेक गोष्टींवर सौदेबाजी करत होते, ती आता करता येणार नाही. भाजप 'एनडीए'मध्ये पूर्वीपेक्षा अधिक मजबूत झाला आहे. एकंदरीत, महायुतीने पूर्ण तयारीनिशी मैदान मारले असे म्हणता येते.



# झारखंडमध्ये महाशक्तीला तडाखा

**महाराष्ट्रात आदिवासी, दलितांनी महाविकास आघाडीला साथ दिली नसली तरी झारखंडमध्ये मात्र दिली. येथे 'कटेंगे तो बटेंगे'पासून रोहिंग्यांपर्यंतच्या अनेक मुद्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी ध्रुवीकरणाचा प्रयत्न केला. समान नागरी कायद्यापासून आदिवासींना दूर ठेवण्याचा शब्द शहा यांनी दिला. त्यांनी झारखंडमध्ये परिवर्तनाची यात्रा काढली. मात्र या प्रयत्नांना मतदारांनी साथ दिली नाही.**

विश्लेषण

**राही भिडे**
ज्येष्ठ पत्रकार

महाराष्ट्रात महायुतीच्या त्सुनामीपुढे महाविकास आघाडीचा पालापाचोळा झाला. शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यासारखे ज्येष्ठ नेते नेते असताना काँग्रेससह महाविकास आघाडीतील तीन पक्षांनी जेवढ्या जागा मिळवल्या, त्याहून अधिक जागा झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेतृत्वाखाली 'इंडिया' आघाडीने मिळवल्या. महाराष्ट्रात आदिवासी, दलितांनी महाविकास आघाडीला साथ दिली नाही; परंतु झारखंडमध्ये मात्र दिली. 'कटेंगे तो बटेंगे'पासून रोहिंग्यांपर्यंतच्या अनेक मुद्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी ध्रुवीकरणाचा प्रयत्न केला. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंत सरमा यांच्यावर झारखंडची जबाबदारी सोपवण्यात आली होती. समान नागरी कायद्यापासून आदिवासींना दूर ठेवण्याचा शब्द शहा यांनी दिला होता. त्यांनी झारखंडमध्ये परिवर्तनाची यात्रा काढली. त्यालाही मतदारांनी साथ दिली नाही. निवडणुकीच्या काळात मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या निकटवर्तीयांवर 'ईडी'चे छापे टाकण्यात आले. त्यांना भ्रष्ट ठरवण्याचा प्रयत्न झाला. त्याअगोदर जानेवारीमध्ये त्यांना कथित गैरव्यवहाराच्या आरोपावरून अटक करण्यात आली. साडेपाच महिन्यांमध्ये त्यांच्याविरोधात एकही पुरावा न्यायालयाकडे देता आला नाही. न्यायालयानेही तपास यंत्रणांवर ताशेरे ओढले. न्यायालयातून सुटून आल्यानंतर आणि त्याअगोदरही झारखंड मुक्ती मोर्चाच्या अनेक आमदारांना आमिषे दाखवण्यात आली. चंपाई सोरेन यांना भाजपमध्ये आणले. त्यात चौहान आणि सरमा यांच्या भूमिका महत्त्वाच्या होत्या. मतदानाला काही दिवस राहिले असतानाही काही माजी आमदार भाजपने गळाला लावले; परंतु याचा कोणताही परिणाम झारखंडच्या निवडणूक निकालावर झाला नाही.

या निवडणुकीपूर्वी भाजपने यंत्रणांचा जेवढा वापर केला, सोरेन यांच्यावर जितका हल्ला चढवला, तेवढ्या ताकदीने भाजपचा हा हल्ला झारखंड मुक्ती मोर्चाने परतवून लावला. मोदी यांच्यासह सर्व फौज झारखंडसारख्या छोट्या राज्यात तळ ठोकून असतानाही काहीच उपयोग झाला नाही. राजकारणासाठी एका आदिवासी मुख्यमंत्र्याला तुरुंगात घातल्याची चीड या राज्यामध्ये पहायला मिळाली. येथे रोहिंग्यांचा उल्लेख वारंवार केला जात होता. आदिवासींना स्थलांतर करायला लावायचे आणि बांगलादेशींना आश्रय द्यायचा, ही मोठी चूक असल्याची टीका भाजप करत होता; परंतु दहा वर्षांहून अधिक काळ देशात भाजपचे सरकार असताना सीमेपलीकडून बांगलादेशी घुसखोर येण्याला झारखंड मुक्ती मोर्चा कसा जबाबदार असू शकतो, या प्रश्नाचे उत्तर भाजपच्या नेत्यांनी दिले नाही; जनतेने मात्र मतदानातून ते दिले. स्थापना झाल्यापासून झारखंडमध्ये कधीही एकाच पक्षाला दोनदा संधी मिळाली नाही; परंतु हा इतिहास हेमंत सोरेन यांनी घडवला. कुटुंबात फूट पडली असतानाही त्यांनी हे घडवून दाखवले. झारखंड विधानसभेच्या ८१ जागांच्या निवडणूक निकालांनी जनतेने हेमंत यांच्याकडे पुन्हा एकदा राज्याची खुर्ची सोपवली आहे. सोरेन यांनी भाजपच्या सर्व दिग्गजांचा जवळपास एकहाती पराभव केला आहे. झारखंड विधानसभा निवडणुकीत त्यांच्या 'जेएमएम'ला ३४ जागा तर त्यांचा प्रमुख मित्रपक्ष असलेल्या काँग्रेसला १६ आणि राष्ट्रीय जनता दलाला चार जागा मिळाल्या आहेत.

झारखंडमध्ये सलग दोन विधानसभा निवडणुकींमध्ये भाजपचा पराभव झाला. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपने सर्वात मोठा पक्ष म्हणून राज्यातील १४ पैकी ८ जागांवर विजय मिळवला तर 'जेएमएम'ला तीन आणि काँग्रेसला दोन जागा मिळाल्या. 'अखिल झारखंड स्टुटंड युनियन' या पक्षाला लोकसभा निवडणुकीत एक जागा मिळाली. लोकसभा निवडणुकीनंतर सहा महिन्यांनीच झालेल्या निवडणुकीत हेमंत यांना एवढे मोठे यश कसे मिळाले आणि भाजपचा मोठा पराभव करण्यात ते कसे यशस्वी ठरले, हा ही प्रश्न आहे. हेमंत यांनी हे सिद्ध केले आहे, की ते आदिवासींचे सर्वात मोठे नेते आहेत. त्यांनी झारखंडमधील आदिवासींचा मुद्दा उपस्थित केला आणि स्वतःचे मातीतला पुत्र म्हणून वर्णन केले. त्यात ते यशस्वी झाले. भाजप जिंकल्यास राज्याची सत्ता दिल्लीतून चालेल, हा संदेश झारखंडच्या जनतेला देण्यातही ते यशस्वी ठरले. झारखंडचे आदिवासी स्वभावाने बंडखोर आहेत. राज्याच्या सत्तेवर बाहेरून कुणाचे नियंत्रण असावे, हे त्यांना मान्य नव्हते. झारखंडमधील विधानसभेच्या ८१ पैकी २८ जागांवर आदिवासी मतदारांचे वर्चस्व आहे. या जागांवर 'जेएमएम'चे तीन दशकांहून अधिक काळ वर्चस्व आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत या २८ जागांपैकी भाजपने फक्त दोन जागा जिंकल्या होत्या. या वेळीदेखील भाजपला झारखंड मुक्ती मोर्चाला आव्हान देता आले नाही. झारखंडमधील आदिवासींना आकर्षित करण्याचा भाजपने सर्वतोपरी प्रयत्न केला. त्यांनी 'जेएमएम'चे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनाही आपल्या गोटात ओढले; पण तरीही हेमंत यांना आदिवासी नेता म्हणून कोणीही आव्हान देऊ शकले नाही.

सोरेन यांच्या विजयात राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांचाही मोठा वाटा असल्याचे मानले जात आहे. हेमंत सरकार १८ वर्षांवरील महिलांसाठी 'मैय्या सन्मान' योजना चालवते. त्याअंतर्गत महिलांना दरमहा एक हजार रुपये दिले जातात. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये जशा लाडक्या बहिणी भावाच्या ओवाळणीला जागल्या, तशाच त्या झारखंडमध्येही जागल्या. झारखंड विधानसभा निवडणुकीच्या अगोदर सुमारे तीन महिने आधी ही योजना जाहीर करण्यात आली होती. याअंतर्गत १६ लाख महिलांच्या खात्यात पैसे येऊ लागले. हेमंत सोरेन यांनी निवडणुकीपूर्वी ते अडीच हजारांपर्यंत वाढवण्याचे आश्वासन दिले होते, त्याचा परिणाम तेथे दिसून आला. झारखंडमधील ८१ पैकी ३१ जागांवर महिलांच्या मतदानाची टक्केवारी पुरुषांच्या मतदानाच्या टक्केवारीपेक्षा जास्त आहे. त्याचा फायदा 'जेएमएम' आणि त्यांच्या मित्रपक्षांना झाला. हेमंत सोरेन यांच्या पत्नी कल्पना यांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान सुमारे १०० सभा घेतल्या. झारखंडमध्ये 'जेएमएम'चा विजय आणि हेमंत यांच्या यशात त्यांच्या त्यांची भूमिका खूप महत्वाची मानली जाते. लष्करी कुटुंबातून आलेल्या कल्पना यांची विचारसरणी खूप व्यापक आहे. त्यांना हिंदी, संथाली आणि ओरिया भाषा येते. त्यांच्या सभांना लोकांची मोठी गर्दी दिसून आली. हेमंत तुरुंगात गेल्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश करत पहिल्यांदाच प्रचार केला.



जूनमध्ये तुरुंगातून बाहेर आल्यानंतर हेमंत यांनी त्यांचे तुरुंगात जाणे ही राजकीय प्रेरित कृती असल्याचे सांगितले. उच्च न्यायालयाने हेमंत यांना जामीन मंजूर करताना कोणत्याही रजिस्टर/महसूल रेकॉर्डमध्ये या जमिनीचे संपादन आणि ताबा यामध्ये याचिकाकर्त्याचा थेट सहभाग असल्याचा उल्लेख नसल्याचे म्हटले होते. 'पीएमएलए'च्या कलम ४५ च्या अटींची पूर्तता करताना, याचिकाकर्ता कथित गुन्ह्यासाठी दोषी नाही असे मानण्याची कारणे आहेत, असे न्यायालयाने म्हटले. हेमंत यांच्या तुरुंगवासाच्या काळात चंपाई मुख्यमंत्री होते, तरी हेमंत यांच्या पत्नी कल्पना पहिल्यांदाच राजकीयदृष्ट्या सक्रिय झाल्या. त्या विरोधी पक्षनेत्यांच्या भेटी घेत होत्या. कल्पना यांनी आपल्या पतीच्या तुरुंगवासाचा मुद्दा बनवला आणि विरोधी सभांमध्ये मांडला. 'जेएमएम'ची स्वतःची मते होती. कल्पना आदिवासी, मुस्लिम आणि इतर काही मते जोडण्यात यशस्वी ठरल्या. झारखंडमध्ये भाजपला मते वाढवण्यात अपयश आले आहे आणि याचा फायदा हेमंत यांना झाला आहे. झारखंडमधील निवडणुकीत महिलांचा सहभाग हेमंत सोरेन यांच्या यशाशी जोडलेला आहे. दुसरे म्हणजे, राज्यातील त्यांच्या मित्रपक्षांनीही चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे हेमंत सोरेन आणि 'जेएमएम' यांना मदत झाली आहे. झारखंडमध्ये २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपला २५, 'जेएमएम'ला ३०, काँग्रेसला १६, राष्ट्रीय जनता दलाला आणि भाकपला प्रत्येकी एक, 'अखिल झारखंड स्टुडंट युनियन'ला दोन आणि बाबूलाल मरांडी यांच्या 'जेव्हीएम' ला ३ जागा मिळाल्या होत्या. यंदा 'जेव्हीएम' भाजपमध्ये सामील झाल्यानंतरही कोणताही मोठा फायदा झाला नाही. सोरेन यांच्या विजयात 'मैय्या सन्मान' योजनेप्रमाणेच सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना राबवण्याचे आश्वासन महत्त्वाचे ठरल्याचे मानले जात आहे. याशिवाय राज्यात दोनशे युनिट मोफत वीज आणि जुन्या वीजबिलाची थकबाकी माफ करणे हेही महत्वाचे मुद्दे ठरले आहे. हेमंत यांना आव्हान देण्यासाठी भाजपकडे कोणताही चेहरा नव्हता. भाजपचे कथनही इथल्या लोकांना अनुकूल नव्हते. उलट, हेमंत आणि कल्पना यांनी झारखंड आणि तेथील लोकांशी संबंधित मुद्दे मांडले. त्याचा फायदा त्यांना झाला. भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात इनकमिंग होऊन आणि मोदी-शहा यांनी निवडणूक प्रतिष्ठेची करूनही महाशक्तीला तडाखा देण्यात सोरेन यशस्वी झाले.

# हिंदुत्वाने तारले...

**महाराष्ट्राच्या निवडणूक निकालाने भाजपला हिंदुत्त्व उपयोगाला येते, हे सिद्ध झाले. मतांच्या ध्रुवीकरणात विरोधकांचा पालापाचोळा होतो, याचीही प्रचिती आली. आता दिल्ली आणि बिहारच्या विधानसभा निवडणुकीतही हिंदुत्त्वाचा मुद्दाच भाजपच्या प्रचाराचा केंद्रबिंदू राहण्याची शक्यता आहे. काँग्रेसला मुस्लिमांकडे अधिक झुकल्याचा परिणाम भोगावा लागतो, त्याचेच भांडवल करून भाजपला हिंदुत्त्वाकडे जावे लागते.**

नोंद

**शिवाजी कराळे**
विधिज्ञ

महाराष्ट्र आणि झारखंडमधील निवडणूक निकालाने भाजपच्या हिंदुत्वाचीही चर्चा सुरू झाली आहे. या मुद्द्यावर विचार करण्यापूर्वी एकदा पंतप्रधान मोदी रेवडी संस्कृतीच्या विरोधात टीका करताना दिसले; परंतु आज काय परिस्थिती आहे? कुठे लाडली बहना चालू आहे तर कुठे लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे ट्रान्सफर करणाऱ्या योजनांची चर्चा आहे. विकासाच्या राजकारणावर बोलणारा, विकासासाठी मत मागणारा भाजप भावनिक मुद्देही साकल्याने मांडत आहे. मोफत योजनांच्या विरोधात बोलणारेही तेच करताना दिसतात. भाजपची 'सबका साथ, सबका विकास' ही घोषणा आता मागे पडली आहे. निवडणुकीला 'लव जिहाद', 'व्होट जिहाद', 'लँड जिहाद'चे स्वरुप देण्यात येत आहे. लोकानुनयाच्या घोषणा, योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेगे तो कटेंगे' आणि मोदी यांच्या 'एक है तो सेफ है!' या घोषणांमुळे निवडणुकीला 'ते' विरूद्ध 'आम्ही' असे स्वरुप आले. हिंदू मतांच्या ध्रुवीकरणाची ही प्रयत्नपूर्वक केलेली खेळी होती, हे लक्षात येत नाही, असे थोडेच आहे. महाराष्ट्रात तुष्टीकरणाच्या विरोधात हिंदुत्ववाद्यांनी दिवाळी साजरी केली. मुंबईतील लोकसंख्येतील बदल आणि संपूर्ण महाराष्ट्रात अलीकडे घडलेल्या घटनांचा परिणाम लोकांवर झाला आहे. पालघरमधली साधूंची हत्या असो वा उद्धव ठाकरेंनी दुर्लक्षित केलेल्या श्रद्धा खून प्रकरणाचा मुद्दा; तथाकथित धर्मनिरपेक्ष त्यांच्या विरोधात काम करत असल्याचे भाजप वारंवार सांगत होता. उद्धव ठाकरे यांनी कितीही ओरडून सांगितले, की आमचे हिंदुत्व खरे आहे; परंतु भाजपने केलेल्या कोडींने त्यांची अवस्था काय झाली, हे निवडणुकीत दिसले.

महाराष्ट्रातील मालेगाव, शिवाजीनगर आणि भिवंडी पूर्व या तीन भागात मुस्लिम मतदारांनी ५१ टक्क्यांची पातळी ओलांडली आहे. या तिन्ही ठिकाणी आता काँग्रेस किंवा इतर तथाकथित धर्मनिरपेक्ष पक्ष नाहीत, तर इस्लामी पक्ष जिंकत आहेत. झारखंडमध्येही एक सोडून सर्व आदिवासीबहुल जागा भाजपने गमावल्या असून तेथे मोठ्या प्रमाणावर धर्मांतरे झाली आहेत. हिंदुत्व हे भाजपचे घर आहे. याआधीही हरियाणासारख्या राज्यांच्या निवडणुकीमध्ये भाजपने हिंदुत्वाच्या मुद्द्यापासून दूर गेल्यास राजकीय महत्त्व गमावून बसल्याचे स्पष्ट झाले. हरियाणा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यापासून खुद्द पंतप्रधानांनीच अनेक तीक्ष्ण विधाने केली. एका विशिष्ट समुदायाचे वर्चस्व असलेल्या भागात सरकारी योजनांबद्दल विचारले जाते, तेव्हा लोकांनी सांगितले की त्यांनी स्वतः, त्यांच्या पत्नी, मुलांनी, संपूर्ण कुटुंबाने त्या सरकारी योजनांचा लाभ घेतला; पण ते कोणत्याही परिस्थितीत भाजपला मत द्यायला तयार नव्हते. या बातम्या पेरण्यातच आल्या आणि भाजपने अशी मते मिळणार नाहीत, असे गृहीत धरून नंतर बहुसंख्याकांचे ध्रुवीकरण करण्यावर भर दिला.

'सबका साथ, सबका विकास' या घोषणेबरोबरच भाजप हिंदुत्ववादाकडेही सरकत आहे. आहे. भाजप संसदेच्या अधिवेशनात पंधरा विधेयके मांडत आहे. त्यातील एक म्हणजे वक्फ बोर्डाशी संबंधित दुरुस्ती. भाजपने ज्या सहजतेने हे विधेयक जनतेसमोर मांडले, त्यावरून यासंदर्भातील तयारी पूर्ण झाल्याचे दिसून येते. याशिवाय वक्फ बोर्ड जमिनी कशा बळकावत आहे, हेही बातम्यांमधून समोर येणाऱ्या घटनांवरून दिसून येते. यावरून भाजप भविष्यात कोणत्या मुद्द्यांवर निवडणूक लढवणार आणि त्यांची निवडणूक रणनीती काय असेल याचीही कल्पना येते. सुमारे दहा वर्षांपूर्वी पंतप्रधान मोदी मजबूत प्रतिमा घेऊन निवडणुकीत उतरले होते. आता त्याच प्रतिमेकडे भाजप परतत असल्याचे दिसत आहे. भारतातील निवडणुकीची पद्धत पुन्हा एकदा बदलाच्या



दिशेने वाटचाल करत आहे. या वेळीही हा बदल कोणत्याही जुन्या भूमिकेतून किंवा विचारसरणीतून झालेला नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे. बदल स्वीकारण्यासाठी एकच पक्ष तयार होत आहे. पुढच्या वर्षी राजकारणाची प्रयोगशाळा म्हटल्या जाणाऱ्या बिहारमध्ये निवडणुका आहेत आणि बिहारमधील सीमांचलला भेट दिल्यानंतर भाजपच्या एका बड्या नेत्याने येथे कोणते मुद्दे उपस्थित केले जातील, याचे संकेत दिले आहेत. गुजरातला एके काळी हिंदुत्वाची प्रयोगशाळा म्हटले जायचे. तेथून मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि हरियाणामध्ये भाजपने हा प्रयोग यशस्वीपणे राबवला. या राज्यांमध्ये जनतेने भाजपला इतके भरघोस मत दिले की तेथे भाजप आता कोणतीही कसूर सोडणार नाही.

अभूतपूर्व विजयासोबतच आता महाराष्ट्रातही भाजपवर मोठी जबाबदारी आली आहे. हिंदुत्व हे भाजपचे घर आहे आणि हिंदुत्व सोडून तथाकथित धर्मनिरपेक्षतेचा पोशाख धारण करणाऱ्या शिवसेनेला मराठा अस्मितेसाठी निवडले नसल्याचे महाराष्ट्रातील जनतेनेही स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रापासून बिहारपर्यंत मतदारांनी घराणेशाहींच्या विरोधात जनादेश दिला आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' आणि 'इंडिया' आघाडीच्या आश्चर्यकारक विजयाच्या पार्श्वभूमीवर सभागृहाचे कामकाज सुरळीत चालावे, यासाठी केंद्र सरकारने राजकीय पक्षांच्या नेत्यांची बैठक घेतली. संसदेच्या अधिवेशनात विरोधक कोणत्या मुद्द्यांवर सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करणार, याचा अंदाज अगोदरच घेण्यात आला होता. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी बैठक बोलावून चर्चा केली. सरकारने संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विचारासाठी वक्फ दुरुस्ती विधेयकासह १६ विधेयके सूचीबद्ध केली आहेत. लोकसभेत प्रलंबित असलेल्या विधेयकांमध्ये वक्फ (सुधारणा) विधेयकाचाही समावेश आहे, जे दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीने लोकसभेला आपला अहवाल सादर केल्यानंतर विचारार्थ आणि पारित करण्यासाठी सूचीबद्ध केले गेले आहे.

अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणाचा तोटा होतो, असे काँग्रेसने मागे म्हटले होते. त्यानंतर काँग्रेसने सौम्य हिंदुत्त्वाचा स्वीकार केला. काँग्रेसच्या अशा धरसोड वृत्तीमुळे काँग्रेसला ना हिंदूंची मते मिळाली ना अल्पसंख्याकांची. लोकसभेच्या निवडणुकीत मात्र मुस्लिम, दलित आणि आदिवासींनी साथ दिल्यामुळे काँग्रेस पुन्हा तुष्टीकरणाकडे वळत असून मतांचे ध्रुवीकरण करत असल्याचे लक्षात आले, तेव्हा भाजपने ब्रम्हास्त्र बाहेर काढले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची 'बटेंगे तो कटेंगे', पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 'एक है तो सेफ है' आणि देवेंद्र फडणवीस यांची धर्मयुद्धाची घोषणा हे सर्व ध्रुवीकरणासाठीच होते. त्याचा परिणाम महाराष्ट्रात चार टक्क्यांनी तर झारखंडमध्ये तीन टक्क्यांनी मतदान वाढण्यात झाला. या भूमिकेचा भाजपला महाराष्ट्रात फायदा झाला. योगी, मोदी आणि फडणवीस यांच्या घोषणांभोवती निवडणूक फिरली आणि काँग्रेस तसेच शिवसेनेच्या ठाकरे गटाचीही कोंडी झाली. काँग्रेस मुस्लिम मतांची विभागणी होऊ नये यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असताना एमआयएम, समाजवादी पक्ष असे वाटेकरी पुढे आले. हिंदू मते मात्र महायुतीच्या बाजूने वळल्याचा निष्कर्ष निघतो. भाजपने हिंदूंमध्ये जातीच्या नावावर फूट पडू नये यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरले.

महाराष्ट्र आणि झारखंडच्या निवडणकीअगोदर भाजपने हरियाणा विधानसभा निवडणुकीत प्रत्येक हिंदू जातीला आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. त्यात या पक्षाला यश आले. त्या निवडणुकीत काँग्रेसला आपल्या विजयाचा खूप विश्वास होता; पण हरियाणा विधानसभेच्या निवडणूक निकालांनी काँग्रेसला मोठा धक्का दिला आणि लोकसभा निवडणुकीत मिळालेला फायदाही शून्य केला. हरियाणातील विजयानंतर भाजपला आपल्या ट्रम्प कार्डमधील सर्वात मोठा एक्का म्हणजे हिंदुत्व कार्ड हे उमगले. मोदी, योगी, शहा यांच्या निवडणूक भाषणाच्या केंद्रस्थानी हिंदुत्व होते. मुस्लिम घुसखोर आणि 'इस्लामिक जिहादचा धोका ते सातत्याने जनतेसमोर मांडत होते. जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशात विधानसभेच्या निवडणुका पार पडल्यानंतर आता कलम ३७० वर भाजप चांगलाच आक्रमक झाला होता. याच मुद्द्यांवरून काँग्रेसला घेरण्यात भाजपला यश आले. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने आपल्या दारुण पराभवाचे आत्मचिंतन केले, तेव्हा मुस्लिमांकडे अधिक झुकल्याचा परिणाम भोगावा लागला, असे मत मांडण्यात आले. ए. के. अँटनी समितीचा अहवालही तसाच होता. त्याचेच भांडवल करून भाजपला हिंदुत्त्वाकडे जायला भाग पाडते. महाराष्ट्राच्या निकालातून आता जातनिहाय जनगणनेचा मुद्दाही मागे पडण्याची शक्यता आहे. भाजपचे मित्रपक्षही बचावात्मक पवित्र्यात गेले आहे. महाराष्ट्रात मराठा विरुद्ध ओबीसी, हिंदू विरुद्ध मुस्लिम, धनगर विरुद्ध आदिवासी अशा संघर्षातून भाजपला बहुसंख्य विरुद्ध अल्पसंख्याकांचे यशस्वी राजकारण करता आले. हा मंत्र भाजपसाठी गुरूकिल्ली ठरणार आहे.

# अजमेर शरीफ आणि नवा वाद

'अजमेर दग्यार्ला संकटमोचन महादेव मंदिर घोषित करावे, ही आमची मागणी आहे. दग्यार्ची कोणत्याही प्रकारची नोंदणी असल्यास ती रद्द करावी. त्याचे एएसआय सर्वेक्षण करून तेथे हिंदूंना पूजा करण्याचा अधिकार द्यावा. हिंदू सेनेचे अध्यक्ष विष्णू गुप्ता यांनी अजमेर येथील न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत ही माहिती दिली आहे. 27 नोव्हेंबर रोजी न्यायालयाने याचिका स्वीकारली. अजमेर शरीफ दर्गा हे शिवमंदिर असल्याचा दावा केला जात असून, देशात आता एका नव्या वादाला फोडणी मिळण्याची शक्यता आहे.

मुळात भारतात अर्धीअधिक लोकसंख्या गरीबीत जीवनयापन करीत आहे. देशात शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, निवारा, सिंचन व्यवस्था, बेरोजगारी, महिलांवरील अत्याचार, जातीय आणि धार्मिक संघर्ष अशा अगणित समस्या असताना त्यासाठी लोकं कोर्टात जाताना किंवा सरकारशी भांडताना दिसत नाही . मुळ मुद्यांवरून लोकांचे लक्ष विचलीत करण्यासाठी असे कोणतेतरी मंदिर, मशिद आणि धार्मिक स्थळांचा वाद निर्माण केला जातो आणि माथी भडकवण्याचे काम होते . तसाच प्रकार आता अजमेर येथील प्रसिद्ध दर्ग्याच्या बाबतीत केला जात आहे .

25 सप्टेंबर 2024 रोजी हिंदू सेनेचे अध्यक्ष विष्णू गुप्ता यांनी अजमेरच्या दिवाणी न्यायालयात याचिका दाखल केली. 38 पानी याचिकेत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्यामध्ये शिवमंदिर असल्याचा दावा करण्यात आला होता. गुप्ता यांनी अजमेर शरीफ दर्ग्यावरील दोन वर्षांच्या संशोधनाचा आणि 'अजमेरः ऐतिहासिक आणि वर्णनात्मक' या पुस्तकाचा उल्लेख केला. दर्ग्याच्या खाली शिवमंदिर असल्याचे सांगण्यात आले.

२७ नोव्हेंबर रोजी याचिकाकर्त्यांचे वकील योगेश सिरोजा यांनी दिवाणी न्यायाधीश मनमोहन चंदेल यांच्या खंडपीठासमोर वस्तुस्थिती मांडली. न्यायालयाने याचिका स्वीकारली. न्यायालयाने अजमेर दर्गा समिती, अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांना नोटीस बजावली आहे. या तिघांकडून 20 डिसेंबरपर्यंत उत्तर मागवण्यात आले आहे.

हिंदू सेनाप्रमुख विष्णू गुप्ता यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसोबत हिंदू सेनेची स्थापना केली. शिवसेना किंवा आरएसएसशी कोणताही संबंध नसतानाही हिंदू सेना अनेक वादात अडकली आहे. विष्णू गुप्ता यांनी याचिकेत तीन युक्तिवाद केले. त्या आधारे चौकशीची मागणी त्यांनी केली.

**हरविलास शारदा यांचे पुस्तक**

निवृत्त न्यायाधीश हरबिलास शारदा यांनी 1911 मध्ये 'अजमेरः ऐतिहासिक आणि वर्णनात्मक' हे पुस्तक लिहिले. १६८ पानांच्या या पुस्तकात 'दर्गा ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती' नावाचा संपूर्ण अध्याय आहे.

**स्वतः दर्ग्याची तपासणी केली.**

अजमेरमध्ये 2 वर्षे संशोधन केल्याचा दावा विष्णू गुप्ता यांनी केला. त्यांनी स्वतः दर्ग्याच्या आत जाऊन चौकशी केली.

**अजमेरच्या लोकांचे मत**

याचिकेत विष्णू गुप्ता यांनी म्हटले आहे की, अजमेरच्या प्रत्येक व्यक्तीला माहित आहे आणि त्यांचे पूर्वजही सांगत आहेत की दर्ग्याच्या खाली शिवलिंग होते. येथे एक हिंदू मंदिर होते.

दुसरीकडे, इतिहासकार डॉ. जहरुल हसन शाहरिब यांचे पुस्तक 'ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती' नुसार मोईनुद्दीन चिश्ती यांचा जन्म इराणच्या इसफान शहरात 1135 मध्ये झाला. 1149 मध्ये ते शिक्षण घेण्यासाठी उझबेकिस्तानमधील समरकंद आणि बुखारा येथे गेले. येथे त्यांनी 1155 पर्यंत शिक्षण घेतले. यानंतर ते चिश्ती ऑर्डरच्या संत उस्मान हरुनी यांच्यासोबत हज करण्यासाठी मक्का-मदीना येथे गेले.

पुस्तकानुसार, तेथे त्यांना प्रेषित मोहम्मद यांचे स्वप्न पडले. त्यांनी मोईनुद्दीन चिश्ती यांना दिल्लीला जाण्याचा आदेश दिला. येथून ते थेट दिल्लीला रवाना झाले. 12 व्या शतकाच्या अखेरीस ते दिल्लीला पोहोचले आणि नंतर अजमेरला गेले. इथे त्यांना नवीन नाव मिळाले 'गरीब नवाज' म्हणजेच गरिबांचे भले करणारा. त्यांच्याकडे सर्व धर्माचे लोक येऊ लागले. त्यामुळे ते दूरवर प्रसिद्ध झाले.

1236 मध्ये मोईनुद्दीन चिश्तीच्या मृत्यूनंतर त्यांची समाधी अजमेरमध्ये बांधण्यात आली. सुरुवातीला ते एक छोटे थडगे होते. कालांतराने वेगवेगळ्या लोकांनी दर्गा बांधला. मांडूचा राजा महमूद खिलजी याने येथे मशीद बांधली. यानंतर मुघल सल्तनतच्या काळातही येथे बांधकामे झाली. मोहम्मद बिन तुघलक आणि शेरशाह सूरी सारख्या सम्राटांनीही दर्ग्यालासंरक्षण दिले.

ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांचा उर्स दरवर्षी इस्लामी रजब महिन्यात साजरा केला जातो. उर्समध्ये सहभागी होण्यासाठी हजारो लोक लांबून येतात. यावेळी दिल्लीतील मेहरौली येथील कुतुबउद्दीन बख्तियार कारी यांच्या दर्ग्यापासून मिरवणूक निघते. ही मिरवणूक 400 किलोमीटर चालल्यानंतर अजमेर शरीफ दर्ग्यात पोहोचते. मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या लोकांना 'कलंदर' म्हणतात.

अजमेर शरीफ दर्ग्याचा उल्लेख 3 प्रसिद्ध पुस्तकांमध्येही करण्यात आला आहे.

1. अकबरनामा

हे पुस्तक 16 व्या शतकात अबुल फजल यांनी लिहिले होते. १५६२ मध्ये अकबर फतेहपूरला जात असल्याचे सांगण्यात आले. मांडकर गावाजवळून जात असताना दर्ग्यातील चमत्कार ऐकून तो दर्गा गाठला. यानंतर हा दर्गा सर्वसामान्यांचे आणि राज्यकर्त्यांचे श्रद्धेचे केंद्र बनले.

2. अजमेरच्या सामान्य आणि वैद्यकीय स्थलाकृतिचे काही खाते

हे पुस्तक आरएच इर्विन यांनी १८४१ मध्ये लिहिले होते. त्यानुसार ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या काळात दर्ग्याच्या जागी पुरातन महादेवाचे मंदिर होते. चिश्ती हिंदू आणि मुस्लिम अशा दोन्ही धर्मांवर विश्वास ठेवत. ख्वाजा मोईनुद्दीन यांनीही मंदिरातील शिवलिंगाला 40 दिवस जल अर्पण केले.

3. अजमेरच्या मुइन अल-दीन चिश्ती यांचे मंदिर आणि पंथ

हे पुस्तक ब्रिटिश इतिहासकार पीएम करी यांनी 1989 मध्ये लिहिले होते. यामध्येही दर्ग्याच्या खाली असलेल्या शिवमंदिराचा उल्लेख आहे. पुस्तकानुसार मोईनुद्दीन चिश्ती यांच्या कबरीखाली शिवलिंग स्थापित केले आहे.

दर्गा हे हिंदू मंदिर असल्याचा मुद्दा यापूर्वीही उपस्थित करण्यात आला आहे. 2021 मध्ये महाराणा प्रताप सेना संघटनेने दर्ग्यात स्वस्तिक चिन्हाच्या जाळीचे फोटो शेअर केले होते. एएसआयच्या पथकाने दर्गा शरीफची तपासणी केली, मात्र पथकाला कुठेही स्वस्तिक चिन्ह असलेली जाळी आढळून आली नाही.

1950 मध्ये देखील येथे एक सर्वेक्षण केले गेले होते, आम्हाला आधीच अरककडून क्लीन चिट मिळाली आहे. यानंतर असे बोलून परस्पर बंधुभाव संपतो. देशातील अनेक राजे येथे पूजा करण्यासाठी येत असत.

इतिहासकार आणि प्राध्यापक नदीम रिझवी म्हणाले की, दर्ग्याच्या खाली मंदिर असण्याची कल्पना चुकीची आहे. अशाप्रकारे दर्ग्याखाली मंदिर असण्याची चर्चा सुरू केल्याने देशाच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम होईल. अजमेर शरीफ दर्ग्यात सर्व धर्माचे लोक येतात.

अजमेर शरीफ दर्ग्याची पुढील सुनावणी 20 डिसेंबरला होईल. यामध्ये अजमेर दर्गा समिती, अल्पसंख्याक मंत्रालय आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण आपले अहवाल सादर करतील.

जेएनयूचे वरिष्ठ प्राध्यापक आदित्य मुखर्जी यांच्या म्हणण्यानुसार, या याचिकेची योग्यता नाही कारण 'द प्लेस ऑफ वॉरशिप ॲक्ट 1991' अंतर्गत कोणत्याही धार्मिक इमारतीत बदल करता येणार नाही. 'द प्लेसेस ऑफ वर्शप ॲक्ट 1991' प्रार्थनास्थळे बदलण्यापासून प्रतिबंधित करते. या कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी ज्या धार्मिक स्वरूपातील प्रार्थनास्थळे अस्तित्वात होती, ती अबाधित राहतील. म्हणजेच स्वातंत्र्याच्या वेळी मशीद असेल तर तिचे नंतर मंदिर, चर्च किंवा गुरुद्वारामध्ये रूपांतर करता येणार नाही. हा कायदा 11 जुलै 1991 रोजी लागू करण्यात आला.

या कायद्याला भाजप नेते आणि अधिवक्ता अश्विनी उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. हा कायदा हिंदू, जैन, शीख आणि बौद्धांना त्यांच्या घटनात्मक अधिकारांपासून वंचित ठेवतो, असे याचिकेत म्हटले आहे. परकीय आक्रमकांनी उद्धवस्त केलेली त्यांची धार्मिक आणि तीर्थक्षेत्रे परत मिळवण्याचा कायदेशीर मार्ग त्यामुळे अवरोधित होतो. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात सुरू असून, त्यावर ४ डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

प्रत्यक्षात या देशात सर्व धर्माचे लोकं गुण्यागोविंद्याने नांदत असताना काहीजण तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने वातावरण कलुषित करण्याचा प्रकार करतात.

■ ■ ■ ■

## अजमेर शरीफ दर्ग्यात तीन दरवाजे

### बलंद दरवाजा



हे सुलतान महमूद खिलजीने 1193 मध्ये बांधले होते. हे गेट वर्षातून एकदा उर्सच्या निमित्ताने उघडले जाते. यावेळी दरवाजाच्या वर एक ध्वजही लावला जातो.

### जन्नती दरवाजा



हे 14 व्या शतकात सुलतान अलाउद्दीन खिलजीने बांधले होते. चांदीचे बनलेले, ते वर्षातून फक्त 4 वेळा उघडले जाते.

### निजाम गेट



हे हैदराबादच्या निजाम मीर उस्मान अली यांनी 1911 मध्ये बांधले होते. दर्ग्यात प्रवेश करण्यासाठी हा एक महत्त्वाचा दरवाजा आहे.

# गुंतलेला श्वास..!

गुंतलेले असणे म्हणजे एखाद्या कामात गुंतून असणे. अशी बरीच कामे असतात. ज्यात स्वतःला गुंतवून ठेवावं लागते.

बऱ्याच गोष्टी अशा आहे कीं जसे गुंतलेले हितसंबंध, गुंतलेले मुद्दे, गुंतलेल्या समस्या, पैसा, प्रॉपर्टी, प्रसिद्धी सर्व गोष्टी एकीकडे आणि मनाला भावनाऱ्या, मनाला हवं असणाऱ्या वस्तूंचं, गोष्टींच, माणसाचं असणं ऐकीकडे. मानवी मन हे वेगळं असते.

आयुष्याच्या प्रवासात जीवनाचं हे गणित सोडवण्याचा प्रयत्न जरी केला तरीही सोडवल्या जात नाही. व्यक्ती जन्माला येते तेव्हापासून तर शेवटच्या क्षणापर्यंत नको त्या गोष्टी करिता मन सतत धडपडत असते. बऱ्याच गोष्टी अशा असतात की त्या हव्याहव्याशा वाटत असतात. पण बरेच प्रयत्न करूनही, हवे ते मिळत नाही. शेवटी मन आतल्या आत झुरत रहाते. आपल्याला जे पाहिजे ते कसलाही प्रयत्न न करता मिळाले तर तो अपल्या नशिबाचाच भाग समजावा. दुसरी बाजू परिश्रम आहे. परिश्रम जीवनाचा भाग आहे. यावरच आपल्या यशाच फळं अवलंबून आहे. जे कष्टानेच मिळणार.

कोणी सोन्याचा चम्मच जरी तोंडात घेऊन जन्माला आला. तरी सुद्धा त्याच्या जीवनात सर्वच गोष्टी मनासारख्या जरी मिळालेल्या असल्या तरी सुद्धा कशाच्या तरी साठी मन झुरणार असतेचं. जस पायाला ठेच लागल्यावर 'आई' हा शब्द न सांगतांना, न विचार करता तोंडातून निघतो. तसचं आपुलकी, प्रेमळ भाव, हा मनात उमटलेला असतो. सुखाचे क्षण असो किंवा दुःखाचे, या क्षणात काही खास व्यक्तींचीच नावे तोंडातून निघतात. कधीही इतरांशी नावे निघत नाही. तसेच

एखादं संकट जरी आपल्यावर आले त्यावेळी नकळतच 'बाबा' हा शब्द तोंडातून निघतो. मनाला वाटणारी भीती, श्वासाची धडधड, स्पर्धेच्या जगात धडपडत असताना 'बाबा' या शब्दांची जादू, त्यांचा आधार, धीर देणारे शब्द येणा?्या संकटाला ही दूर करतात. भीतीमध्ये धडधडणाऱ्या श्वासाला आधार मिळते. आपल्याला जन्म देणाऱ्या आई वडिलांचा आशीर्वाद, त्यांच प्रेम, सतत येणाऱ्या अडचणी, संकटे, तणावातून बाहेर काढते.

आपलं जगणं हे जरी घेत असलेल्या श्वासावर अवलंबून असल. तरीही त्या श्वासात गुंतलेले कितीतरी भाव श्वासात जीव ओतत असतात. कितीतरी ऐशोआरामात आपण असलो तरी देखील मनाच्या गावात असणारी प्रेमाची माणसे ही आठवतातच. मनाच्या गावात हवं त्या ठिकाणी थोडा वेळ विश्रांती घेता येते. स्वप्नाच्या दुनियेत रमता येते. त्या आठवणीत रमलेलं मन नव्याने जगणं शिकवतात. श्वासाची होणारी धडधड, प्रेमाच्या माणसांची सतत आठवण काढत असतात. तारुण्यात होणार प्रेम आणि त्या प्रेमात गुंतलेला तो श्वास, सतत प्रेम मिळवण्यासाठी होणारी धडपड, भेटीसाठी केलेले प्रयत्न, नको ते बहाणे, नजरेचे इशारे तारुण्याच्या टप्प्यात त्या जगण्याला प्रेमाची माया देतात.

तसचं जन्मापासून शेवटच्या क्षणापर्यंत प्रत्येक टप्पा आणि या प्रत्येक टप्प्यात जीवनाच्या सागरात भेटलेली माणसे मनाच्या पटलावर आपली छाप सोडून जातात. संपूर्ण आयुष्य लोकांना समजण्यात, समजून घेण्यात, चांगल्या गोष्टी शिकण्यात खर्ची होतात. रोज नवीन धडा शिकून, त्यातून जे चांगले ते वेचावे लागते. चांगल्या गोष्टी गिरवून यशाचा प्रवास चालू ठेवावा लागतो. येणा?्या अपयशाला पचवावं लागते. मागे बघून मनाला खचू देता कामा नये. नजर निवडलेल्या प्रवासाच्या मार्गावर ठेवावी लागते. जर मागे बघितले तर पश्चाताप, दुःख, अपराधीपणा असले भाव मनात न कळत उत्पन्न होतात. कारण चुका मधून शिकण्याचा प्रवास पुढे चालू असतो.

कोणी आपला हात धरून हव्या त्या ठिकाणी नेईल असं कधीही आयुष्यात घडत नसते. येथे प्रत्येक निर्णय स्वतःच्या हितासाठी स्वतःलाच घ्यावा लागतो. फक्त यश मिळवल्यावर होणारा आनंद आणि त्यात न सांगता सहभागी होणारे जिवलग, मित्रगण, आपले आई-वडील हे यशाचा आनंद द्विगुणीत करतात. जर कोणते अपयश किंवा संकट न सांगता येवून ठेपले, तेव्हा मात्र आधारासाठी, हिम्मत देण्यासाठी ही जवळची माणसे हवीहवी वाटू लागतात. आयुष्याच्या एका टप्प्यावर जिवाभावांच्या लोकांसाठी, भेटीसाठी मन व्याकुळ होते. बाहेर, आपल्या आवतीभोवती जरी सर्व सुख सुविधा दिसत असल्या, कोणी प्रेमाने बोलत असेल, तोंडात प्रेमाने जेवणाचा घास जरी भरत असेल, तरीसुद्धा मनाला हवं त्या व्यक्तीची साथ, आत बाहेर घेत असलेला प्रत्येक श्वास प्रेमाचा माणूसच मागत असतो. कधीतरी या मातीची साथ ही सुटणारी आहे.

आपुलकीच्या माणसाचा साथ सुटणारा आहे. या गोष्टीचा ठाव हा मनाला असतोचं. एखाद्या व्यक्तीत मन गुंतलेलं असते. गुंतलेल्या मनाचा तो श्वास मार्ग मोकळा करत असतो. एका भेटीसाठी, प्रेमळ नजरेसाठी, गप्पागोष्टी करण्यासाठी विरंगुळा, हक्काचा आधार, हवा असलेला प्रेमाचा स्पर्श, चेहऱ्यावर स्मितहास्य, येणाऱ्या श्वासातील स्पंदनांचा मार्ग मोकळा करत असतो. जीवनाचे 'सत्य' आत घेत असलेला 'श्वास'आपुलकीच्या प्रेमळ व्यक्तीत गुंतलेल्या श्वासाला सांगत असतो..!

भेटीला व्याकुळ कधी
कधी कठीण प्रसंग येता
श्वासातून निघतो शब्द
ओठांनी अलगत घेता
गुंतलेल्या श्वासाला लागे
ओढ एकांत भेटण्याची
मनात सतत असतात
ती माणसे आपुलकीची

■ ■ ■ ■

सौ. चैताली संगोपाल वरघट
मूर्तिजापूर, जि अकोला.
9834583685

# मुलांच्या सोशल मीडियावर ऑस्ट्रेलियात बंदी

ऑस्ट्रेलियामध्ये 16 वर्षाखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचे विधेयक संसदेने मंजूर केले. या विधेयकाला पक्ष आणि विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला. असे विधेयक मंजूर करणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिला देश आहे.

या विधेयकानुसार, जर , टिक टॉक, फेसबुक आणि इन्स्टाग्राम सारखे प्लॅटफॉर्म मुलांना खाती ठेवण्यापासून रोखण्यात अयशस्वी ठरले तर त्यांना $32.5 दशलक्षपर्यंत दंड होऊ शकतो. पालकांच्या संमतीसाठी किंवा आधीपासून अस्तित्वात असलेल्या खात्यांसाठी कोणतीही सूट दिली जाणार नाही. कायदा लागू झाल्यानंतर, बंदी कशी अंमलात आणायची यावर काम करण्यासाठी व्यासपीठांना एक वषार्चा कालावधी मिळेल.

पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनीही या विधेयकाचे समर्थन केले. 25 नोव्हेंबर रोजी संसदेत बोलताना अल्बानीज यांनी सोशल मीडियाला तणाव वाढवणारे साधन, ठग आणि ऑनलाइन गुन्हेगारांचे शस्त्र म्हणून वर्णन केले. ते म्हणाले- ऑस्ट्रेलियन तरुणांनी फोन सोडून फुटबॉल, क्रिकेट आणि टेनिस खेळावे अशी त्यांची इच्छा आहे.

ऑस्ट्रेलियाच्या आघाडीनंतर, ब्रिटिश सरकार 16 वषार्खालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा विचार करत आहे. ब्रिटनचे टेक्नॉलॉजी सेक्रेटरी पीटर काइल यांनी सांगितले की, ऑनलाइन सुरक्षितता निश्चित करण्यासाठी ते "काहीही करतील" असे बीबीसीच्या वृत्तात म्हटले आहे. विशेषतः मुलांसाठी.

स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचा तरुणांवर होणाऱ्या परिणामांवर अधिक संशोधन करण्याची गरज असल्याचेही पीटर काइल यांनी सांगितले. सध्या आमच्याकडे याबाबत कोणतेही ठोस पुरावे नाहीत.

भारतासह जगभरातील अनेक देशांमध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून डीपफेक, डिजिटल अटक आणि ऑनलाइन फसवणूक यांसारखी अनेक प्रकरणे समोर येत आहेत.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये भारत सरकारने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी एक सल्लाही जारी केला होता. यामध्ये त्यांना डीपफेक आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सद्वारे पसरवल्या जाणाऱ्या चुकीच्या माहितीबाबत माहिती तंत्रज्ञान (आयटी) नियमांचे पालन करण्यास सांगितले होते.




**किमान 11 सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक भारतीय उपस्थित**

रिसर्च फर्म 'रेडसीअर'च्या मते, भारतीय वापरकर्ते दररोज सरासरी 7.3 तास त्यांच्या स्मार्टफोनवर घालवतात. यातील बहुतांश वेळ ते सोशल मीडियावर घालवतात. तर, अमेरिकन वापरकर्त्यांचा सरासरी स्क्रीन टाइम 7.1 तास आहे आणि चीनी वापरकर्त्यांचा 5.3 तास आहे. भारतीय वापरकर्ते सोशल मीडिया ॲप्सचा सर्वाधिक वापर करतात.

अमेरिका आणि ब्रिटनमधील एका व्यक्तीची सरासरी 7 सोशल मीडिया खाती आहेत, तर एक भारतीय किमान 11 सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आहे.

■ ■ ■ ■

# स्वदेशी जागरणकर्ते : राजीवभाई दीक्षित

राजीवजी दीक्षित हे एक भारतीय समाज सुधारक होते. त्यांनी स्वदेशी चळवळ बळकट केली, आपल्या अनेक व्याखानांतून त्यांनी स्वदेशी उत्पादनांबद्दल जनमानसांत प्रचार केला व लोकांना स्वदेशी वापराचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. ते भारतीय स्वाभिमान आंदोलनचे संस्थापक म्हणून ओळखले जातात. राजीव भाई दिक्षित एक क्रांतिकारी होते. त्यांनी संपूर्ण भारतीय इतिहासाचा अभ्यास केला. ते स्वदेशी जागरणकर्ता होते.

--------------

राजीव दीक्षित यांचा जन्म दि. ३० नोव्हेंबर १९६७ रोजी उत्तर प्रदेशातील, अलिगढ जिल्ह्यातील नाहगावात झाला. त्यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण फिरोजाबाद जिल्ह्यात झाले. त्यांनी एमटेकची पदवी आयआयटी कानपूरमधून प्राप्त केली आणि डॉक्टरेट फ्रान्समधून घेतली.

ते अविवाहित होते. त्यांनी सुरुवातीचे काही दिवस सीएसआयआर आणि फ्रांस टेलिकम्युनिकेशन मध्ये नोकरी सुद्धा केली. एका प्रोजेक्टवर काम करत असताना ते एपीजे अब्दुल कलाम यांच्या संपर्कात देखील आले होते.

स्वदेशी वस्तूंच्या वापरासाठी ते आजीवन झटले, त्यांनी अनेक विदेशी कंपन्यांची पोलखोल केली. तसेच भारताबाहेरील स्वीज बँकेतील भारताचा काळा पैसा भारतात परत अणण्याबाबत आग्रही राहिले. सन २००० ते २००९ या नऊ वर्षात स्वदेशी ओवर विदेशी या हॅशटॅगमुळे ते खूप लोकप्रिय झाले होते. भारत कृषी प्रधान देश असल्याने त्यांनी शेतीला प्राधान्य देऊन ही चळवळ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला.

त्यांनी रासायनिक खतांच्या ऐवजी स्वदेशी खते म्हणजेच गांडूळ खत, शेण खत ही खते शेतीसाठी वापरण्याचा आग्रह धरला. ते आजीवन स्वदेशी वस्तू वापरण्यासाठी आग्रही राहिले, त्यांनी त्यासाठी भारत स्वाभिमान आंदोलन आणि आजादी बचाओ सारखी आंदोलने उभारली. उच्च पगाराची नोकरी सोडून त्यांनी आपले आयुष्य स्वदेशासाठी व्यतीत केले.

स्वदेशीचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी तयार केलेल्या ध्वनिफितींमुळे ते प्रसिद्ध झाले. त्यांनी व्याख्याने ध्वनिमुद्रित करून ती नंतर लोकांना उपलब्ध होतील याची परिपूर्ण काळजी घेतली होती. भारताचा काळा पैसा विदेशी बँकामध्ये अनधिकृतरीत्या कसा फिरतो आहे, हे पण त्यांनी उघड करून दाखवले.

भारतीयांनी गैर मार्गाने मिळवून स्विस बँकांमध्ये जमा केलेल्या सर्व काळ्या पैशाची माहिती उघड व्हावी, यासाठी त्यांनी पाठपुरावा केला.

स्वदेशीचा प्रचार गावोगावी जाऊन केला. जास्तीत जास्त लोकांनी स्वदेशी वस्तू वापरल्या तर देशात रोजगार निर्माण होईल व देशातला पैसा देशातच फिरत राहील हे तत्त्व त्यांनी लोकांसमोर मांडले. ते २० वर्ष व्याख्यान देत देशभर फिरले. राजीवभाई आणि योग गुरू रामदेवजी यांची भेट सन २००९मध्ये झाली. खूप कमी वेळपर्यंत त्यांची ती घनिष्ठ मैत्री टिकली. राजीवभाई आणि योग गुरू रामदेवजी यांचे विचार सारखे होते. आयुर्वेद आणि काळा पैसा याबाबीत त्यांची मते एक होती.



संकलन
एन. कृष्णकुमार जी. गुरूजी.
गडचिरोली.९४२३७१४८८३.

नोव्हेंबर २००९मध्ये योग गुरू बाबा रामदेवजी यांनी राजीव दीक्षित यांची भारत स्वाभिमानी ट्रस्टचे प्रमुख वक्ता व राष्ट्रीय सचिव म्हणून नेमणूक केली होती. ही जवळीक बाबा रामदेव यांच्या निकटवर्तीय लोकांना खुपत होती, असे सुद्धा त्या काळात दबक्या आवाजात बोलले जात होते. पुढे ही मैत्री फार काळ टिकू शकली नाही.

भिलाईमध्ये व्याख्यानासाठी दौऱ्यावर असताना दि. ३० नोव्हेंबर २०१० रोजी त्यांचे अचानक निधन झाले. त्यांचा मृत्यू हृदयविकाराने झाला, असे प्राथमिकरित्या समजण्यात आले होते, परंतु अजूनही त्यांच्या मृत्यूचे खरे कारण अज्ञात आहे.

राजीवभाई यांच्या समर्थकांनी पोस्ट मॉर्टम करून मृत्यूचे नेमके कारण कळावे, अशी मागणी केली होती. पण बाबा रामदेव यांनी ही परवानगी दिली नाही. राजीव दीक्षित यांचे जवळचे मित्र मदन दुबे हे योग गुरू बाबा रामदेवजी यांना भेटले होते. पण त्यांना बाबा रामदेवजी यांना अंतिम संस्कार लवकर व्हावेत यासाठी कमालीची घाई झालेली दिसून आली होती.

मदन दुबे यांच्या मते, राजीव दीक्षित यांच्याबद्दल अंतर्गत लोकांची असलेली मतभिन्नता, जळफळाट हेच राजीव दीक्षित यांच्या मृत्यूचे खरे कारण आहे. मदन दुबे यांना असे वाटण्याचे अजून हे एक कारण होते की, ज्या हॉलमध्ये राजीव दीक्षित यांचे पार्थिव ठेवण्यात आले होते; तेथे योग गुरू रामदेवजी आले आणि त्यांनी हे वाक्य वापरले, पोस्ट मॉर्टम हे हिंदू धर्माच्या विरुद्ध आहे, अंतिम संस्कार लगेच झाले पाहिजे. ते भगव्या रंगात असतात, पण त्यांचा प्रमुख भर हा योग शिकवण्याकडे असतो. पण त्यावेळी रामदेव बाबांनी अशी धार्मिक बाब सांगितली की, जमलेल्या लोकांनी लगेच त्यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला. प्रदीप दीक्षित व मदन दुबे यांची मागणी त्यामुळे पुर्णपणे दुर्लक्षित झाली.

राजीवभाई दीक्षित यांचा मृत्यू नैसर्गिक की घातपात हे कायमसाठी रहाणारे एक गूढ आहे, शवविच्छेदनाला झालेला विरोध, घाईत केलेले अंतिम संस्कार आणि ऐन वेळी प्रदीप दीक्षित यांनी पाळलेले मौन ही यामागची प्रमुख कारणे सांगितली जातात. राजीव दीक्षित यांच्या मृत्यूने त्यांची स्वप्ने अपूर्ण राहिली. राजीव दीक्षित आणि बाबा रामदेवजी हे मिळून सन २०१४ मध्ये एक राजकीय पक्ष स्थापन करणार होते, ज्यामध्ये केवळ प्रामाणिक लोक असतील.

भारत जगात शक्तिशाली देश असेल आणि स्वदेशी आंदोलन देशातल्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचेल.ह्न अशी त्यांची स्वप्ने होती, पण वयाच्या अवघ्या ४२व्या वर्षी त्यांचे निधन झाले आणि ती स्वप्ने अपूर्णच राहिली. त्यांच्या मृत्यूनंतर भारत स्वाभिमानी ट्रस्टचे रूपांतर योग गुरू रामदेवबाबांनी पुढे जाऊन पतंजली केले आणि या पतंजलीमध्ये देशसेवेची ती उर्मी आता राहिली नाही. पतंजली आता एक व्यापारी ब्रँड झाला आहे. !! राजीवभाई दीक्षित यांना त्यांच्या जयंती व स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !!

■ ■

महासागर ग्लॅम वर्ल्ड

रविवार ■ दि. १ डिसेंबर २०२४

# छावाच्या निर्मात्यांनी बदलली रिलीज डेट



विकी कौशलचा छावा आणि अल्लू अर्जुनचा पुष्पा-2 या चित्रपटांमध्ये टक्कर होणार नाही. छावाच्या निर्मात्यांनी त्यांच्या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली आहे. मोठी गोष्ट म्हणजे हा चित्रपट एका आठवड्यानंतर प्रदर्शित होणार असताना निर्मात्यांनी हा निर्णय घेतला आहे. त्याच वेळी, त्याची बॉक्स ऑफिसवर अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा 2: द रुल'शी टक्कर झाली असती.

ट्रेड एक्सपर्ट तरण आदर्श यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये त्यांनी सांगितले की, विकीचा चित्रपट आता 14 फेब्रुवारी 2025 रोजी रिलीज होणार आहे. ही रिलीज डेट खास आहे कारण 19 फेब्रुवारी ही छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आहे. छावा हा बायोपिक असून त्याची कथा छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुत्र, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित आहे. अशा परिस्थितीत, नवीन रिलीज डेट छावासाठी गेम चेंजर ठरू शकते.

विकी कौशलचा छावा हा चित्रपट याआधी पुष्पा-2 सोबत टक्कर होणार होता. दोघांची रिलीज डेट 6 डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आली. मात्र, नंतर पुष्पा-2 च्या निर्मात्यांनी एक दिवस आधी म्हणजेच 5 डिसेंबरला रिलीज करण्याचा निर्णय घेतला.

लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित छावा या चित्रपटात विकी कौशल मराठा योद्धा-राजा छत्रपती संभाजीची भूमिका साकारणार आहे. हा एक पीरियड ड्रामा चित्रपट असून, त्याचा टीझर रिलीज झाला आहे. तर छावा आणि पुष्पा 2 द रुल या दोन्हीमध्ये रश्मिका मंदान्ना मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेत दिसणार आहे.

छावामध्ये रश्मिका छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी येसूबाई भोसले यांची भूमिका साकारणार आहे, तर पुष्पा 2 मध्ये ती पुष्पाराजच्या श्रीवल्लीची भूमिका साकारताना दिसणार आहे.

2021 मध्ये सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट 2021 मध्ये प्रदर्शित झालेला 'पुष्पाः द राइज' हा वर्षातील सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट होता. सर्व आवृत्त्यांसह, या चित्रपटाने लाइफ टाइम इंडियामध्ये 313 कोटी रुपये आणि जगभरात 350 कोटी रुपयांचा व्यवसाय केला. सर्वाधिक कमाई करणाऱ्या तेलगू चित्रपटांच्या यादीत तो सहाव्या क्रमांकावर आहे. ■ ■ ■



## विकी कौशलच्या चित्रपटाचे पुष्पा-2 सोबत क्लॅश नाही

# करीनाने केली नवीन वहिनी आलेखाची आरती

करीना आणि करिश्मा कपूरचा चुलत भाऊ आदर जैन आणि त्याची मैत्रीण आलेखा अडवाणी यांचा रोका सोहळा शनिवार, 23 नोव्हेंबर रोजी झाला. यावेळी कपूर कुटुंबीय उपस्थित होते.

आता या सोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर समोर आले आहेत. करीना तिची नवी वहिनी आलेखाची आरती करताना दिसली, तर रणबीर आणि करिश्माने आलेखाला टिळा लावला.

तारा सुतारियासोबत ब्रेकअप झाल्यानंतर आदर जैन पहिल्यांदाच आलेखा अडवाणीसोबत करिनाच्या दिवाळी पार्टीत दिसला होता. दोघांनीही पापाराझींना पोज दिली. काही दिवसांनंतर आदरने एका पोस्टद्वारे आलेखासोबतच्या नात्याची पुष्टी केली होती. त्याने इंस्टाग्रामवर आलेखाचा हात धरलेला एक फोटो शेअर केला आहे. या पोस्टसोबत त्याने कॅप्शनमध्ये लिहिले झ माज्या आयुष्याचा प्रकाश.


**आदर जैन हा राज कपूर यांचा नातू**

आदर हा रीमा जैन आणि मनोज जैन यांचा मुलगा आहे. रीमा जैन दिवंगत राज कपूर यांची मुलगी आहे. कपूर घराण्याशी संबंधित, ते नेहमीच चित्रपटांकडे झुकत होते आणि त्यांनी अभिनय हा त्यांच्या करिअरचा पर्याय म्हणून निवडला होता.

आदरने 2017 मध्ये कैदी बँडद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. यानंतर तो मोगल आणि हॅलो चार्ली या चित्रपटांमध्ये दिसला. मात्र, आदरच्या तीन चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई केली नाही.

आलेखापूर्वी आदर जैनचे नाव अभिनेत्री तारा सुतारियासोबत जोडले गेले होते. दोघे जवळपास 4 वर्षे रिलेशनशिपमध्ये होते, त्यानंतर त्यांचे ब्रेकअप झाले. आदर आणि तारा एका दिवाळी पार्टीत भेटले होते. दोघींची भेट एका कॉमन फ्रेंडद्वारे झाली होती, त्यानंतर दोघांना अनेकदा अनेक प्रसंगी एकत्र पाहण्यात आले होते. रिलेशनशिपच्या अफवा असल्यापासून तारा कपूर प्रत्येक लहान-मोठ्या कार्यक्रमात कुटुंबासोबत हजेरी लावत असे. पण काही काळानंतर ताराने स्वतः एका मुलाखतीत सांगितले की ती सध्या सिंगल आहे आणि कोणाशीही रिलेशनशिपमध्ये नाही. ■ ■ ■ ■





# लोकांनी वापरले सेकंड हँड असे शब्द



दाक्षिणात्य अभिनेत्री समंथा रुथ प्रभूने नुकताच घटस्फोटानंतरचा अनुभव सांगितला. तिने सांगितले की, घटस्फोटानंतर तिला 'सेकंड हँड' सारख्या गोष्टी ऐकाव्या लागल्या. अभिनेत्री म्हणाली की, घटस्फोटानंतर समाजात महिलांची ओळख आणि मूल्य यावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. या मानसिकतेच्या विरोधात त्यांनी आपले मत मांडत याचा विचार करण्याची गरज व्यक्त केली.

गलाटा इंडियाला दिलेल्या मुलाखतीत सामंथा म्हणाली, 'जेव्हा एखाद्या महिलेचा घटस्फोट होतो तेव्हा तिला खूप लाजिरवाण्या परिस्थितीला आणि टीकेला सामोरे जावे लागते. घटस्फोटित महिलांवर लोक खूप कमेंट करतात. लोक मला सेकंड हँड म्हणतात. इतकेच नाही तर घटस्फोटित महिलेला आपण अपयशी आहोत अशी भावना निर्माण केली जाते कारण तिचे पूर्वी लग्न झाले होते आणि आता नाही.

समंथा म्हणाली, 'माझ्याबद्दल अनेक चुकीच्या गोष्टी बोलल्या गेल्या. खोटे पसरवले गेले. त्यावेळी मला त्यांना उत्तर द्यावेसे वाटले. पण नंतर मला वाटायचे की एका क्षणासाठी हे लोक माझी स्तुती करतील, पण थोड्या वेळाने ते पुन्हा तुमच्याबद्दल टिप्पणी करतील.

सामंथा म्हणाली, 'पूर्वी मला या सगळ्या गोष्टींचं खूप वाईट वाटायचं. एका कोपऱ्यात बसून खूप रडायचे. कसे जगायचे हे मी विसरले होते. पण नंतर हळूहळू मला जाणवलं की माझं आयुष्य संपलेलं नाही. मी सर्वकाही हाताळू लागलो आणि आज मी माज्या आयुष्यात खूप आनंदी आहे. मी खूप शिकले आहे. मी चांगले काम करत आहे आणि मी माझ्या आयुष्याच्या पुढील टप्प्याची वाट पाहत आहे.

**सामंथा आणि नागा चैतन्य यांचा 2021 मध्ये घटस्फोट झाला**

समंथाने 2017 मध्ये साऊथ सुपरस्टार नागार्जुनचा मुलगा नागा चैतन्यशी लग्न केले. पण 2021 मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. यानंतर समंथाला आरोग्याच्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. त्याच वेळी, नागा चैतन्य आणि शोभिता धुलिपाला यांनी 8 ऑगस्ट रोजी लग्न केले. दोघांनीही त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर या खासगी सोहळ्याचे काही फोटो शेअर केले आहेत. ■ ■ ■

# कॅन्सरवर खोटा दावा सिद्धू-कपिलला नोटीस

'द ग्रेट इंडियन कपिल शो' पुन्हा एकदा वादात सापडला आहे. अभिनेत्री रोजलिन खानने नवज्योत सिंग सिद्धू, कपिल शर्मा आणि नेटफ्लिक्सला कायदेशीर नोटीस पाठवली असून, त्यामध्ये तिने सिद्धू आणि शोच्या टीमची जाहीर माफी मागावी अशी मागणी केली आहे. शोमध्ये कॅन्सरशी संबंधित चुकीची माहिती शेअर करण्यात आली होती, ज्यामुळे प्रेक्षकांची दिशाभूल होऊ शकते, असा त्यांचा आरोप आहे.

रोजलिनचे वकील अली कासिफ खान देशमुख यांनी सांगितले की या संपूर्ण प्रकरणामागे काही राजकीय अजेंडा असू शकतो असा संशय आहे.

नवज्योतसिंग सिद्धू यांनी दावा केला होता की, कॅन्सरशी लढा देत असताना त्यांच्या पत्नीने पाण्यात उकडलेली कडुलिंबाची पाने वापरली आणि त्यामुळे तिला या आजारावर मात करण्यात मदत झाली. मात्र, हा दावा पूर्णपणे निराधार आणि वैद्यकीय शास्त्राच्या विरोधात आहे.

स्वतः कॅन्सर सर्व्हायव्हर असलेल्या रोजलिनचे म्हणणे आहे की, असे खोटे दावे कॅन्सरसारख्या गंभीर आजाराने ग्रस्त लोकांची दिशाभूल करू शकतात. टाटा मेमोरियल हॉस्पिटल आणि इतर विश्वसनीय संस्थांनीही हा दावा खोटा ठरवला आहे.

नवज्योतसिंग सिद्धूचे कर्करोगाशी संबंधित दावे राजकीय लाभ मिळवण्याच्या उद्देशाने असू शकतात का? या प्रश्नावर ती म्हणते, होय, असे दावे करून नवज्योतसिंग सिद्धू कर्करोगासारख्या गंभीर आजाराचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत आहेत, असे आमचे मत आहे. त्याचा वापर ते जनतेची सहानुभूती आणि मतदारांना आकर्षित करण्यासाठी करत आहेत. पण हा अतिशय संवेदनशील विषय आहे आणि अशा खोट्या विधानांमुळे लोक वैद्यकीय शास्त्राऐवजी अवैज्ञानिक उपायांवर अवलंबून राहू शकतात.

नेटफ्लिक्स आणि कपिल शर्मा यांना या प्रकरणात का ओढले आहे आणि त्यांचा याच्याशी काय संबंध आहे? असाही प्रश्न उपस्थित होतो.

कपिल शर्मा शोमध्येही हा दावा करण्यात आला होता आणि नंतर तो नेटफ्लिक्सवर प्रसारित झाला होता. आमचा असा विश्वास आहे की जेव्हा असा खोटा मजकूर कोणत्याही शो किंवा प्लॅटफॉर्मवर दाखवला जातो तेव्हा ते लाखो लोकांची दिशाभूल करू शकते. त्यामुळे आम्ही तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत.

1. माफीची मागणीः नवज्योत सिंग सिद्धू आणि कपिल शर्मा यांनी एकाच व्यासपीठाचा वापर करून जाहीर माफी मागावी. 2. कॉंटेन्ट काढून टाकण्याची मागणीः नेटफ्लिक्सने तात्काळ भाग काढून टाकावा ज्यामध्ये हा दावा दर्शविला आहे.3. भविष्यात सावधगिरीः कपिल शर्मा शोने अशा खोट्या दाव्यांची जाहिरात करणे टाळावे. आम्ही त्यांना 14 दिवसांची मुदत दिली आहे. त्यांनी या मागण्या पूर्ण न केल्यास आम्ही हे प्रकरण न्यायालयात नेऊ. भारतात ड्रग्स आणि मॅजिक रेमेडीज कायदा आहे, जो अशा खोट्या आणि चुकीच्या दाव्यांना प्रतिबंधित करतो. कायद्यानुसार तुम्ही जादुई उपाय किंवा खोट्या औषधांचा प्रचार करू शकत नाही. ■ ■ ■ ■



# प्यार का पंचनामा फेम सोनाली सहगल बनली आई



प्यार का पंचनामामध्ये दिसलेली अभिनेत्री सोनाली सहगल आई झाली आहे. एका रिपोर्टनुसार सोनालीने एका मुलीला जन्म दिला आहे. मात्र, सोनाली आणि तिचा पती आशिष सजनानी यांच्याकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

सोनालीने बुधवारी संध्याकाळी सांताक्रूझ येथील सूर्या रुग्णालयात मुलीला जन्म दिल्याचा दावा या अहवालात करण्यात आला आहे. त्यांची प्रसूती नॉर्मल होती. आई आणि मुलगी दोघेही सुखरूप आहेत. सोनाली आणि आशिषचे लग्न 2023 मध्ये झाले होते सोनाली सहगलने जून 2023 मध्ये आशिष सजनानीशी लग्न केले. अभिनेत्रीने या वर्षी ऑगस्टमध्ये तिच्या गरोदरपणाची घोषणा केली होती. सोनालीने 2006 मध्ये मिस इंटरनॅशनल स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले आणि टॉप 12 मध्ये तिचा समावेश झाला. 2011 मध्ये 'प्यार का पंचनामा' या चित्रपटातून तिच्या करिअरची सुरूवात झाली. या चित्रपटात कार्तिक आर्यनही दिसला होता. या चित्रपटाचे दिग्दर्शन लव रंजन यांनी केले होते. यानंतर सोनाली 'प्यार का पंचनामा 2' आणि 'वेडिंग पुलाव' सारख्या चित्रपटांमध्येही दिसली आहे. ■ ■

# रजनीकांतची कन्या ऐश्वर्या आणि धनुषचा अधिकृत घटस्फोट



तमिळ अभिनेते धनुष आणि ऐश्वर्या रजनीकांत यांनी अधिकृतपणे घटस्फोट घेतला आहे. या जोडप्याने 2022 मध्ये जाहीर केले होते की लग्नाच्या 18 वर्षानंतर त्यांना वेगळे व्हायचे आहे.

सन टीव्ही आणि न्यूज 18च्या रिपोर्टनुसार, कोर्टाने धनुष आणि ऐश्वर्याचा घटस्फोट मंजूर केला आहे, कारण दोघांनीही ते एकत्र राहू शकत नसल्याचे म्हटले आहे.

या जोडप्याने 2022 मध्ये वेगळे होण्याची घोषणा केली होती धनुषने सोशल मीडियावर लिहिले होते - आम्ही 18 वर्षांपासून मैत्री, जोडपे, पालक आणि एकमेकांचे शुभचिंतक बनून समजूतदारपणा आणि भागीदारीचा मोठा प्रवास केला आहे. आज आम्ही जिथे उभे आहोत, तिथून आमचे मार्ग वेगळे होत आहेत. आम्हाला स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी वेळ काढायचा आहे.

धनुषने 18 नोव्हेंबर 2004 रोजी सुपरस्टार रजनीकांत यांची मोठी मुलगी ऐश्वयासोबत लग्न केले. यात्रा आणि लिंगा अशी त्यांच्या मुलांची नावे आहेत. धनुष व ऐश्वर्याने दिग्दर्शित केलेल्या '3' या पहिल्या चित्रपटात काम केले आहे. या चित्रपटातील 'कोलावेरी डी' हे गाणे 2011 मधील सर्वात हिट गाणे होते. नयनतारासोबतच्या डॉक्युमेंट्रीच्या वादामुळे धनुष सध्या चर्चेत आहे. वास्तविक, नयनताराने धनुषकडे तिच्या 'ननम राउडी धन' चित्रपटातील गाणी आणि दृश्यांसाठी तिच्या माहितीपट 'नयनताराः बियॉन्ड द फेयरी टेल'साठी परवानगी मागितली होती, परंतु धनुषने तिला परवानगी नाकारली होती. ■ ■ ■